23024

म.ग्रं.सं., वाचनालय शाखा, ठाणे.

विषय ...........

२३०२४

IRBK-0123024

# यक्षिणी आणि चार एकांकिका

रत्नाकर मतकरी

यक्षिणी
आणि चार एकांकिका

डिंपल प्रकाशन

IRBK-0123024

या संग्रहातील कुठल्याही एकांकिकेचा प्रयोग करण्यापूर्वी खालील पत्त्यावर अनुमती घेणे आवश्यक :

सौ. प्रतिभा मतकरी
राधा निवास, टिळक रोड, मुंबई ४०० ०१४.

# यक्षिणी

पूर्वप्रसिद्धी :

यक्षिणी / गांवकरी दिवाळी ७६

सर्व काही हवं, पण – / बागेश्री ७५

गाणे दाणापाण्याचे / हंस ७९

चतुर-सारिकेचा वग / हंस ७७

गजांचे जग / हंस ७२

## अनुक्रमणिका

यक्षिणी

सर्व काही हवे, पण ..

गाणे दाणापाण्याचे

चतुर-सारिकेचा वग

गजांचे जग

प्रकाशक :
रमेश उदारे
१, सिताराम छाया,
चित्तरंजन दास पथ,
रामनगर, डोंबिवली (पूर्व).

मुद्रक :
श्रीरंग प्रिंटर्स
श्रीराम इंडस्ट्रीयल इस्टेट,
वडाळा.

© सौ. प्रतिभा मतकरी

मुखपृष्ठ व मांडणी :
सतीश भावसार

प्रथमावृत्ती : आक्टोबर '८८.

मूल्य : ४० रु.

फोटोटाईपसेटींग :
प्रॉमिस फोटोटाईपसेटर्स, माहिम

**रत्नाकर मतकरी यांचे प्रकाशित एकांकिका संग्रह :**

रत्नाकर मतकरी यांचे प्रकाशित एकांकिका संग्रह :

| | |
|---|---|
| सात एकांकिका | १९६१ |
| एकाच मातीची खेळणी | १९६२ |
| लाल गुलाबांची भेट | १९६४ |
| शय्या | १९७२ |
| अंधारवाडा | १९७७ |
| पोर्ट्रेट आणि दोन एकांकिका | १९८१ |

# यक्षिणी

म. ग्रं. स. ग्राम. वाचनालय शाखा.
वा. क्र. ........ नों. दि. ........
वि. ........ क्र. ........

संध्याकाळची केशरी नारिंगी वेळ, अजून लखलखती, धूसर न होऊ लागलेली.

नगराच्या वेशीजवळचे अरण्य. तिथेच थोडीशी मोकळी जागा. या मोकळया जागेच्या जवळपास दोन वृक्ष आहेत. फुलांनी बहरून गेलेले.

इथेच दोन पौरजन येतात. एक वृद्ध अनुभवी, दुसरा तरुण.

पहिला : (दुसऱ्याला) या नगरीत नवीनच का येतोय्स तू ?

दुसरा : हो – नवीन म्हणजे अगदीच नवीन. नवऱ्या मुलाच्या कपाळावरच्या बाशिंगाइतका कोरा करकरीत. या भागातली मला काडीची माहिती नाही.

पहिला : माहिती मला पुष्कळ आहे. पण त्याने काय झाले आहे ? माहिती असणे म्हणजे ओळखणे नव्हे.

दुसरा : असे कसे म्हणता ?

पहिला : म्हणजे – की हा सारा प्रदेश माझ्या पूर्ण माहितीचा. याच नगरात माझी उमर गेली. पिताजींच्या कडेवरून उतरलो, आणि अनिश्चित धडपडती बोबडी पावल टाकायला सुरुवात केली ती इथेच आणि आज पावलं दमदार रोवून उभा आहे तोही या इथेच. धार्मिक माणसाला जसा रोजच्या पठणाच्या पोथीतला शब्दन् शब्द पाठ असावा, तसा मला इथला प्रत्येक दगडगोटा ठाऊक आहे. पण तरीदेखील काहीकाही गोष्टी अजून ओळखता येत नाहीत. त्यांचे गूढ काही उकलत नाही.

दुसरा : गूढ ? असे गूढ काय आहे ?

पहिला : हे वृक्षच पहा ना. त्याची जात कुणालाच ठाऊक नाही. अरण्यात अनेक वनस्पतीशास्त्रज्ञ येऊन गेले. पण या दोन वृक्षांची नावे काही त्यांच्या शास्त्रात सापडली नाहीत.

दुसरा . कुणीच जर यांना काही नाव दिलेलं नसेल, तर यांना प्रीतीवृक्ष का म्हणू नये ?

पहिला : का म्हणावे ?

दुसरा : प्रीतीच्या गुलाबी रंगाची मोठमोठी फुलं या वृक्षांवर फुलली आहेत म्हणून. असं वाटतं की वृक्ष नुकते वयात आले आहेत, आणि प्रेमाचा वसंतोत्सव साजरा करताहेत.

पहिला . चुकतोस तू. तरुण आहेस म्हणून असे म्हणतोस. तारुण्यात प्रेमाचा एकच गुलाबी रंग ठाऊक असतो, पण नंतर समजते की, प्रेम खरे असेल तर त्याला अनंत छटा असतात. अगदी ज्वाळेच्या मध्यभागी असतो त्या दैदिप्यमान सुवर्णरक्त रंगापासून ते हिमशिखराच्या शुभ्रतेपर्यंत. आणखी तुला ठाऊक आहे का – ही फुले या वृक्षावर बारा महिने अशीच फुलत असतात. प्रेम कधी इतके स्थिर असते ?

दुसरा : बारा महिने अशीच फुलत असतात, म्हणजे आश्चर्यचं आहे!

पहिला : बारा महिने – चंद्रोदयाबरोबर उमलतात आणि सूर्यास्ताला मावळतात. सबंध वर्षभर त्याचे रहस्य मात्र मला माहित आहे.

दुसरा . खरंच ? काय आहे ते ?

पहिला : अरे, या इकडच्या वृक्षावर एक यक्षिणी रहाते आणि त्या वृक्षावर यक्ष. ती दोघे जोवर त्या वृक्षांवर आहेत तोवर ते सदा बहरलेलेच राहणार नाहीत का ?

दुसरा : मग बरोबर! पण ..

पहिला : हा – ते तुझ्या मनातल्या कल्पना तुझ्या मनातच ठेव. त्या इथं बोलू नको. कारण ही यक्ष-यक्षिणी जागृत आहेत. चुकून तुझ्या तोंडून एखादा वेडावाकडा शब्द गेला, आणि लगेच त्यांचा उपमर्द झाला, असं नको व्हायला.

दुसरा : बरं सांगितलंत. आपण इथून जाऊयाच कसे! मला या ठिकाणाची भीतीच वाटायला लागली आहे ? फुलांनी बहरलेले हे वृक्ष कितीहि सुंदर दिसत असले, तरी असल्या चिरंतन सौंदर्याची माणसाला सवय नसते. त्यातून आता संध्याकाळ होईल. – मग काळोख पडेल. कोण जाणे त्यावेळी इथं काय काय घडत असेल. आपण जावं हेच बरं.

पहिला . (हसून) अरे. पाहातापाहता भीतीमध्ये एखाद्या मिठाच्या खडयासारखा विरघळून गेलास! घाबरतोस कशाला ? – मी आहे ना सोबत ? जायचे ते झालेच. पण असे पळत सुटून कसे चालेल ? मला या यक्ष-यक्षिणीला नमस्कार करुं दे. तूही हात जोड. मग जाऊ.

दुसरा हो हो – (हात जोडतो) यक्षदेवा, यक्षिणीदेवी, नगरात नवीन आलो आहे. तुमची कृपा असू द्या. सांभाळून घ्या.

पहिला . (नमस्कार करीत) आजवर लोभ ठेवलात, पुढेहि ठेवा.

(नमस्कार करून दोघेहि जाऊ लागतात, इतक्यात स्त्रीचा स्वर येतो : थांबा –)

दुसरा : (घाबरून) ऐकलंत ? तुम्ही ऐकलंत ?

पहिला : होय. घाबरू नकोस वेडया. यक्षिणी थांबायला सांगते आहे. आपण थांबायलाचं हवं.

यक्षिणी : (प्रकट होऊन) आशीर्वाद देते. कृपा आहेच माझी – तुम्हा दोघांवरहि. तुमचं कल्याण होवो. सदाचारानं वागा. पण नुसत्या सदाचारानं भागत नाही. दुसऱ्याचं मन ओळखावे लागतं. ते फार कठीण आहे. फार थोडयांना साधतं.

पहिला : काही इच्छा ?

यक्षिणी : नगरीचा राजा सुखात आहे ना ? त्याला काही कष्ट नाहीत ना ?

पहिला : नाहीत. तसा रोजचा राज्यप्रपंच आहेच. तो कुठं चुकणार ! पण एकंदरीत राजा सुखात आहे. त्याला काही निरोप ?

यक्षिणी : नाही. निरोप काही नाही.

पहिला : तरीहि, यक्षिणीनं आठवण केली होती, एवढं जरूर सांगेन मी त्याला. आत्ताच वाडयावर जाऊन सांगेन.

यक्षिणी : जा लौकर. सांभाळून जा. आता अंधार पडायला आला. अंधार पडल्यावर निसर्ग स्वतःचा होतो. माणसाचा राहात नाही. माणसानं मग स्वतःची काळजी स्वतःच घ्यायला हवी.

पहिला :

दुसरा · (हात जोडून) येतो आम्ही.

यक्षिणी : या. येत जा. (ते दोघे जातात.) गेले बापडे ! किती कष्टाचं असतं माणसाच जीणं. चालायचं, एका जागेहून दुसऱ्या जागी पोचायचं. एक सारखी दगदग. जागा बदलण्याची, घर मिळालं तर वाढवण्याची. वाढवलेलं जपण्याची आणि जपलेलं तर नेहमीच सोडून जात असतं. वाढवलेलं कोसळत असतं. स्थिर काहीच नाही. आमच्यासारखं असं एका वृक्षावर जन्मभर शांतपणानं राहाणं माणसाला कधीच लाभणार नाही.

यक्ष : कुणाशी बोलते आहेस तू ?

यक्षिणी : कुणाशी असं नाही. आसमंताशी-वाऱ्याशी. आभाळ अजून कुसुंबी रंगाचं असतांनाच स्वतंत्रपणे तो एकटा एक उगवला आहे ना, त्या चिमुकल्या ताऱ्याशी.

यक्ष : माणसांविषयी तुला करुणा वाटते, होय ना ?

यक्षिणी : कधी कधी वाटते. पण कधी कधी त्यांचं वागणं फार घोटाळयाचं असतं. समजेनासं होतं. माणसं छोटीच असतात, आणि ती छोटी वागतात. पण कधी कधी ती स्वतःला मोठं मानून आपल्याच तोऱ्यात वागतात तेव्हा मात्र फार विद्रूप दिसतात.

यक्ष : पण माणसांचा इतका विचार हवाच कशाला ? आपण यक्ष – याच वृक्षावर कायम राहून आपण नुसते बदलते ऋतु पाहायचे. निसर्गाच्या लीला पाहायच्या.

यक्षिणी : निसर्गामध्ये काय बघायचं ? निसर्गाला भावना नसतात –

यक्ष : म्हणूनच तो टिकून राहातो. ओसरला तरी वाढीला लागतो. माणसांच्या भावना नाश ओढवून आणतात.

यक्षिणी : तुझं बोलणं मला आवडतं. ते सारं पटतं देखील. पण मी वेडी आहे. माझं मन तुझ्यासारखं शांत नसतं. स्वस्थ होऊन वृक्षाच्या पर्णसंभारावर त्याच्या हिरव्या कांतीसारखं पसरलेलं नसतं. ते सारखं माणसांभोवती रुंजी घालत बसतं. मन दिसत नाही म्हणून नाहीतर एक पारदर्शक फुलपाखरू त्या नगरीच्या वेशीतून आत जाऊन इकडे तिकडे रुणझुणतांना लोकांनी पाहिलं असतं.

यक्ष : नगरीभर ? छे छे, फक्त राजवाड्यात. तेहि केवळ राजाच्या भोवती.

यक्षिणी . नाकारू कशाला ? माझं मन राजाच्याभोवती घोटाळत असतं हे खरंच आहे.

यक्ष : (हसून) यक्षिणीनं या छोट्या नगरीच्या छोट्या राजाचा विचार कशाला करायचा ? तिला यक्षाची सोबत आहेच ना ?

यक्षिणी · हा विचार शहाणपणाचा झाला. राजाचा विचार वेडेपणाचा. पण वेडेपणावरही अधिकार असतोच ना आपला ?

यक्ष आपला नव्हे – माणसांचा.

यक्षिणी : माणसांचा विचार करकरून माझ्या भावनाही आता माणसांच्याच झाल्या आहेत.

यक्ष : निदान माझ्या भावना माणसाच्या नाहीत हे बरं. (हसून) नाहीतर मी मत्सरानं कधीच जळून गेलो असतो.

यक्षिणी मला कुठं कधी मत्सर वाटतो ? उलट मी तर राजासाठी सुंदर स्त्रिया निवडून पाठवते.

यक्ष : यक्षिणी, फसवायचं असेल तर ते दुसऱ्या कुणाला, मला नव्हे. मी इथल्या फुलांचा अंतर्कोश पाहावा, तसं तुझं अंतरंग जाणतो. तू मोठी लबाड आहेस. सामान्य स्त्रियांचा मत्सर तुझ्यात नसेल – पण यक्षिणीचा धूर्तपणा खास आहे. तसं नसतं तर तू राजाकडून तसं वचन घेतलं नसतंस –

यक्षिणी : हो – मी राजाकडून वचन घेतलं. त्याच्याबरोबर करार केला

(वातावरण धूसर होत होत भूतकाळात जाते. यक्षिणीच्या वृक्षाला वंदन करणारा राजा दिसतो –)

राजा : यक्षिणी, आम्हावर कृपा ठेव. माझ्या प्रजेवर, माझ्या स्वतःवर.

(यक्षिणी प्रकट होते.)

यक्षिणी : राजा – माझी कृपा हवी आहे तुला ?

राजा होय यक्षिणी – त्यावाचून माझं कल्याण कसं होईल ?

यक्षिणी राजा – केवळ शब्द बोलू नकोस. त्यामागचा अर्थ मनात आला तरच त्यांचा उच्चार कर. इतके दिवस मी या वृक्षावर आहे. तुला पाहात आहे. वंदन करताना नेहमीच. कधी एकटाच, तर कधी सारा परिवार घेऊन. परिवारासह करायचं भाषण वेगळं असतं. पण एकटं माणूस अधिक खरं

असतं. त्यातून आज पहिल्याप्रथमच मी स्वतः तुला दिसले आहे. म्हणजे माझ्यापुरती मी, काही काही न लपवता प्रामाणिक झाले आहे. नुसती पूजेची देवता म्हणून नव्हे, तर स्त्री म्हणून. अजूनही तुला नुसंते औपचारिक शब्दच बोलायला हवेत का ?

राजा : नाही यक्षिणी. मीही प्रामाणिक होण्याचा प्रयत्न करतो आहे. पण माझ्यासारख्या राजाला – जनतेच्या सेवकाला मनातलं फार क्वचित बोलता येतं. जिभेला सवय लागून गेलेली असते ती ऐकणाऱ्यावर शब्दांची पुष्पवृष्टी करण्याची. आकर्षक, रंगीत पण पुष्कळदा गंधहीन.

यक्षिणी : तुझं राजेपण या मावळत्या प्रकाशात विसरून जा – आणि केवळ तुझं पुरूषपण जागव. तू माझी कृपा मागितली आहेस. एका पुरुषांनं एका स्त्रीची कृपा मागितली आहे, हे लक्षात ठेव, आणि सांग – मी तुझं काय प्रिय करू ?

राजा : नाही यक्षिणी. मी पुरुष आहे, आणि तू स्त्री आहेस हा हिशेब माझा नाही. माझं राजेपण विसरणं तुला सोपं असलं तरी तुझं दिव्यत्व मी कसा विसरू ?
यक्षिणी, कुठलाही पुरुष स्त्रीजवळ करतो ती याचना मला तुझ्याजवळ कशी करता येईल ?

यक्षिणी : (किंचित निराश होऊन) बरोबर आहे. राजा असलास तरी शेवटी तूही संस्कारांचा गुलाम! मानवी आणि दैवी अस्तित्वाची सीमा तू कुठला इतक्या सहजासहजी ओलांडणार ? तरीही सांगते, माग, तुला हवं असेल ते माग. संकोच न ठेवता, न लाजता, न शरमता माग.

राजा : संकोच न ठेवता मागू ? लज्जा न ठेवता मागू ? देशील तू मला ते ? की माझ्यावर संतापशील ?

यक्षिणी : नाही रे – संतापेन कशी ?

राजा : मी संस्काराचा गुलाम आहेच. पण शरीराचाही गुलाम आहे – तुझ्यासारख्या दिव्य स्त्रीसमोर मी शरीराची ही क्षुद्र गुलामी उघड केली, तर माझ्या त्या करंटेपणाला तू एखादा शाप नाही ना देणार ?

यक्षिणी : नाही राजा – निर्भय हो. परमेश्वरानं तुझं शरीर बलदंड घडवलंय्. कुठल्याही स्त्रीला मोह पडावा, इतकं सुंदर घडवलंय्. त्या शरीराची गुलामी हे करंटेपण नव्हे – उलट विधात्याच्या कलेचा हा गौरव आहे. तुझ्या शरीराच्या सुखासाठी तू मागशील ते देईन. काही हातचं राखून न ठेवता. काही स्वतःसाठी शिल्लक न ठेवता. तुझ्या शरीराच्या आगीत जळून जायला मी – मी स्वतः तयार आहे!

राजा : नाही यक्षिणी, इतकी विलक्षण मागणी मी करणार नाही. तुझ्या दिव्य आकाराशी संग करताना माझं मन सुखावणार नाही. उलट भयानं त्याच्या चिंधड्या चिंधड्या उडतील. माझी मागणी यापेक्षा कितीतरी क्षुल्लक आहे.

यक्षिणी : (निराश होऊन) बोल-बोलून टाक एकदा.

राजा : मी शरीरसुखासाठी सतत तहानेला असतो. यक्षिणी, एखाददुसऱ्या सुंदरीनं दिलेल्या सुखानं माझी तहान विझत नाही. विझली असं वाटता-

वाटताच ती परत उसळून उठत आणि नवं संजीवन मागते. त्यासाठी, मला शयन मंदिरात सतत नवीन तरुण स्त्रिया हव्या असतात.

यक्षिणी : (किंचित भयस्थ) मग ? नवीननवीन सुंदरी हुडकून आणण्यासाठी तुझे सैनिक प्रयत्नशील नाहीत का ?

राजा : नाही यक्षिणी. त्यांचे प्रयत्न अपुरे पडतात. शिवाय राकट रानवट सैनिकांना सौन्दर्यातलं काय कळतं ? अडाणी माणसानं रानातून कशीबशी फुलं ओरबडून आणून पूजा बांधावी, तसं ते करतात. शिवाय त्यांच्या या अत्याचारानं प्रजा घाबरुन जाते. आपल्या कन्याभगिनी सुरक्षित नाहीत असं जर प्रजेला वाटत राहिलं तर राज्यात बंड माजेल. माझे राजेपणच धोक्यात येईल.

यक्षिणी : माझ्याकडून तुझी काय अपेक्षा आहे ?

राजा : नगरात जाणाऱ्या अनेक प्रवाशांना याच अरण्यातून मार्ग क्रमावा लागतो. दररोज निदान एक तरी स्त्री इथून जातेच. या स्त्रियांना संमोहित करून तू माझ्याकडे पाठवलंस तर –

यक्षिणी : तथास्तु. तुझ्यासाठी केवळ – केवळ तुझ्यासाठी मी हे करीन. तुम्हा माणसांविषयी मला करुणा वाटते, आणि इथून जाणाऱ्या प्रवाशांवर असा प्रसंग आणणं दुष्टपणाचं होईल. पण मी तुला वचन देऊन बसले आहे. आता तुझ्या शरीरसुखासाठी हा दुष्टपणा करणं मला भाग आहे. पण एक लक्षात ठेव हे सारं मी एका अटीवर करीन.

राजा : अट ? कुठली ?

यक्षिणी : या स्त्रियांपासून तू केवळ शरीरसुख घ्यायचं. त्यांच्यावर प्रेम करायचं नाही.

राजा : एवढंच ना ? मग ते माझ्या सोयीचच आहे. आजवर मी कधीच कुणावर प्रेम केलं नाही. जवळ घेतलेलं शरीर जसं बाजूला करता येतं, तसे मनाचे बंध तोडता येत नाहीत, असं म्हणतात. मी राजा आहे – मला कसलेहि बंध नकोत. म्हणून तर आजवर या नगरीला राणी आली नाही. काळजी नको यक्षिणी. मी फक्त शरीरसुखच घेईन. कुणावर प्रेम करणार नाही.

यक्षिणी : वचन देतोस ?

राजा : वचन देतो.

यक्षिणी : मग जा. (काहीशा खिन्नपणे) तुझं कल्याण होवो. तुझं शरीर सुखानं अधिकाधिक मत्त होईल, त्यायोगानं तू राज्यकारभार अधिक समर्थपणानं करशील आणि तुझी कीर्ति दिगंत पसरेल . .

(राजा जातो )

यक्ष : का यक्षिणी, खिन्न झालीस ?

यक्षिणी . छे – मी का खिन्न व्हावं ? त्यानं कितीहि स्त्रियांकडून शरीरसुख घेतलं, तरी त्याचं मला काहीच वाटणार नाही. प्रेम न देता नुसतं शरीर घेणं म्हणजे काहीच न घेणं. कारण मनावर राहातात, तशा काहीच खुणा राहात नाहीत ! मला वाटलं, तो काहीतरी कठीण मागेल. स्वतःच्या मनासाठी –

यक्ष : म्हणून तू त्याच्याकडून वचन घेतलंस ?

यक्षिणी : हो – म्हणून मी वचन घेतलं. त्याच्याबरोबर करार केला ... त्याला स्त्रिया पाठवण्याचा – त्या स्त्रियांवर प्रेम करायचं नाही या अटीवर –

(हे बोलेपर्यंत प्रकाशात बदल झालेला. भूतकाळ विरून गेलेला.)

यक्ष : हे चांगलं नाही यक्षिणी. यक्षानं मातीशी मिसळू नये. त्यानं जग पहावं केवळ वृक्षावरून. माणसांच विश्व वेगळं. यक्षाच वेगळं. माणसांबरोबर खेळू नये यक्षानं. तो खेळ धोक्याचा ठरेल.

यक्षिणी : धोक्याचा खेळ खेळण्यासारखा असतो –

यक्ष : (चाहूल घेऊन) कुणीतरी येतय् वाटतं. आपण त्यांच्या दृष्टीला पडता कामा नये –

(एक तरुण जोडपे येते.)

तरुण : आता लौकरच अंधार पडेल. त्याच्या आधी नगराच्या वेशीपर्यंत पोचायला हवं.

तरुणी : नाही पोचलं तरी चालेल. तू आहेस ना बरोबर ? मग मला कशाचीच भीती वाटणार नाही. अंधाराची देखील.

तरुण : (हसून) वेडी कुठली ! अगं अंधार पडला तर मी सोबत असून काय होणार ? मी थोडाच प्रकाश पाडू शकणार आहे ?

तरुणी : हो – नुसता प्रकाश नाही. चांदणं. तू माझा चंद्र आहेस ना ?

तरुण . नुकतंच आपलं लग्न झालं, म्हणून म्हणतेय्स असं. थोडे दिवस लोटले की कंटाळशील. चंद्र नव्हे – मला मध्यान्हीचा सूर्य म्हणायला लागशील –

तरुणी : नाही रे. माझं तुझ्यावरचं प्रेम कधीच कमी होणार नाही – सगळे सांगत होते, नवीन नगरीत एवढ्यात जाऊ नकोस त्याच्या बरोबर. त्याला तिथं स्थायिक होऊ दे. मग जा. आता गेलीस, तर तुला कष्ट पडतील. पण मी कुणाचंही न ऐकता आलेच की नाही तुझ्या बरोबर ?

तरुण : तू थकली असशील. थांबायचं का इथं थोडावेळ ?

तरुणी . माझ्या थकण्याचा नको विचार करू. काळोख पडायच्या आत नगर गाठायचंय् ना तुला ? मग लौकर लौकर पाय उचललेच पाहिजेत आपल्याला. (विलक्षण गूढ संगीताचे स्वर – यक्षिणीचे झाड प्रकाशित होत जाते.) ऐकलेस तू ? ऐकलेस ते स्वर ?

तरुण : ऐकले. या अशा वेळी रानातून संगीताचे स्वर ऐकू येणं चांगलं नसतं. कुठली तरी शक्ति त्या स्वरांचे तीर करून ते काळजावर मारीत असते. काळीज फुटेपर्यंत. चल – चल लौकर – त्या स्वरांची हद्द जिथे संपते तिथवर. शक्य तेवढ्या लौकर पोचलंच पाहिजे आपल्याला.

तरुणी : हो रे – मला समजतं पण पाय उचलत नाहीत. इथंच खिळल्यासारखे झाले आहेत –

तरुण . तसं होऊन चालायचं नाही. चल – सारा निश्चय एकत्र कर आणि इथून चल –

तरुणी : हे झाड किती सुंदर आहे पाहिलंस ? त्याच्या फुलाचा रंग बघ. हळूहळू अधिकाधिक आरक्त होत चाललाय् –

तरुण : आपल्याला वेळ नाही त्या झाडाकडे पाहायला.

तरुणी : एवढं एकच झाड मला दिसतंय. बाकी सारं अरण्य काळोखात नाहीसं होतंय् – पण हे एक झाड – हे एकच झाड – हे नजरेतून दूर होतच नाही – (संगीताचे स्वर वाढतात.)

तरुण : हो – आता मलासुद्धा त्या झाडाकडं पाहावंसं वाटतंय्. अगदी टक लावून पाहावंसं वाटतय्.

तरुणी : लाल लाल नक्षत्र उगवलीत त्या झाडावर. पाहिलंस ?

तरुण : नाही – ती नक्षत्रं नाहीत. हे झाड रक्ताळलं आहे. त्या जखमा आहेत. अरण्याला झालेल्या. कुणी केल्या जखमा ?

तरुणी : तू थांब – तू इथंच थांब. या झाडाकडे पाहात थांब. मी जाते राजमहालात जाते.

तरुण : (भ्रमिष्टपणे) राजमहालात – ? कशाला ?

तरुणी : तू ऐकलं नाहीस ? ते स्वर काय सांगत होते ? ही फुलं कुठल्या दिशेकडे पाहताहेत ? राजमहालातून मला बोलावणं आलंय् – मला जायला हवं – मला जायलाच हवं – (जाऊ लागते. येवढ्यात राजा येतो.)

राजा : थांब – चाललीस कुठं ?

तरुणी : राजमहालात. मला कुणीतरी बोलावत होतं.

राजा : आता तिथं जायची गरज नाही. मी स्वतःच इथं आलोय्.

तरुणी : तुम्ही ? तुम्ही कोण ?

राजा : मी या नगरीचा राजा आहे. इथल्या यक्षिणीनं एका पौरजनाकडे माझी आठवण काढली, म्हणून वंदनाला आलो.

तरुणी : मग मी राजमहालात जाऊ नको ?

राजा : नको.

तरुणी : मग तुमची सेवा मला कुठं करता येईल ?

राजा : कुठंही – हे सारं अरण्य आपलंच आहे.

तरुण : (आता तो पूर्ण भ्रमिष्ट झालेला.) हे अरण्य नाहीच. हा फक्त एक वृक्ष आहे. लाल लाल वाहत्या जखमांनी पिडलेला. याला तुम्ही अरण्य का म्हणता ?

राजा : मला वाटतं हा भ्रमिष्ट झाला –

तरुणी : तो भ्रमिष्ट झाला ? तो भ्रमिष्ट होऊन चालायचं नाही –

राजा : का ?

तरुणी : कारण तो माझा चंद्र आहे. त्याच्या चांदण्यात तर मी वाट चालते. चंद्र ढगात जाऊन कसं चालेल ? मला वाट कोण दाखवील ?

राजा : मी दाखवीन. मी इथला राजा आहे.

तरुणी : माझ्या मनातल्या मनात कुणीतरी मला सांगत आहे की तू राजाची सेवा कर – पण मला भीती वाटते हो – फार भीती वाटते – असं वाटतं की मी एका काळ्याकुट्ट काळोखानं भरलेल्या विहिरीच्या तोंडाशी उभी आहे

आणि आत पाऊल टाकू पहातेय्. त्या काळोखात जिथून मला माझा चंद्र कधीही दिसणार नाही अशा काळोखात.

राजा : फार प्रेम दिसतंय् तुझं आपल्या नवऱ्यावर.

तरुणी : कोण जाणे! या क्षणी तरी मला काहीच समजत नाही, मला काहीच आठवत नाही. या क्षणी मी फक्त तुमची आहे. तुमची सेवा करायची, एवढाच माझा धर्म. तुम्ही – तुम्ही मला जवळ का घेत नाही ?

राजा : खरंच – मी तुला जवळ का घेत नाही ? हा तुझा भ्रमिष्ट नवरा इथं आहे म्हणून का ?

तरुणी : तुम्हाला त्याची अडचण होते आहे का ? मग आपण त्याला जायला सांगू. नाहीतर राहू दे ना इथंच त्याला. तो तुम्हाला काही करायचा नाही. कारण त्यांच माझ्यावर फार प्रेम आहे – आणि जे मला हवं ते सारं तो या प्रेमापोटी देतो. या क्षणी मला तुम्ही हवे आहात ना ? म्हणून तो तुम्हाला काही करायचा नाही. पण एक सांगू ? माझी सेवा घेऊन झाली की मग तुम्ही त्याला बरे कराल ? त्याचा भ्रम दूर कराल ? – नाही हो – त्याला असा भ्रमिष्ट राहू देऊन नाही चालणार. कराल ना तुम्ही त्याला बरा ? कराल ना ?

राजा : करीन – तू म्हणतेस तर करीन. तू इतकी छोटीशी आहेस की तुला मी आणि तो यांच्यात फरकच नाही दिसत. माझी सेवा करून तू त्याला बरा करणार आहेस. तू इतकी नाजूक आहेस – गवतावरच्या एखाद्या चिमुकल्या फुलासारखी आहेस तू. माझ्या सेवेला यक्षिणी पाठवते ती फुलं टपोरी ऐटबाज असतात. स्वतःच्या सुगंधाचा त्यांना गर्व असतो. तुझ्यासारख्या साध्यासुध्या चिमुकल्या फुलाचं मी काय करू ?

तरुणी : हे काय ? तुम्ही मला दूर लोटता ?

राजा : हो – कारण तू भानावर असतीस तर स्वतःच माझ्यापासून दूर पळाली असतीस. पण आता तू स्वतःची राहिलेली नाहीस. तुझ्यावर मोहिनी टाकली आहे यक्षिणीनं. तुझ्या मवऱ्यावरही.

तरुणी : का इतर गोष्टी बोलता ? मला क्षणाक्षणाला अधिकच वाटतंय् की तुमची होऊन जावं. तुमच्यात मिसळून जावं.

राजा : थांब. मी सांगेन. यक्षिणीला सांगेन तुझ्यावरचा मंत्र काढून टाकायला. यक्षिणी – यक्षिणी –

यक्षिणी : (प्रकट होऊन) मी आले आहे.

राजा : यक्षिणी – दया कर – या मुलीवर दया कर – तिच्यावरचं संमोहन काढून घे –

यक्षिणी : कशासाठी ?

राजा : ती इतकी लहान आहे, इतकी निष्पाप आहे की तिनं संमोहनाखाली मला वश व्हावं हे नकोय मला.

यक्षिणी : आणखी ?

राजा : नुकतंच तिचं लग्न झालं असेल. तिच्या या नवऱ्यानं संमोहनाखाली

भ्रमिष्ट व्हावं हेदेखील नकोसं वाटतं.

यक्षिणी : नकोसं वाटतं कुणाला ?

राजा : मला. कारण तिला ते नकोय्. या क्षणी तिला कळत नाही – पण तिचं फार प्रेम आहे आपल्या नवऱ्यावर –

यक्षिणी : मी आजवर संमोहन घालून तुझ्याकडे स्त्रियांना पाठवत आले तुझ्याच मागणीवरून. आणि आता तूच मला सांगतोस की मी या मुलीवरचं संमोहन काढावं –

राजा . हो – यावेळी. फक्त एकदाच. मलाच हवं म्हणून. मला कल्पना आहे – तुला कष्ट –

यक्षिणी · उगाच अर्थहीन शब्दांची झगमगीत तोरणं लावू नकोस. तुला कल्पना नाही. तुला कसलीच कल्पना नाही. त्यावेळी तू काय मागितलंस याची नाही, की आज काय मागतोस याची नाही. ठीक आहे. तुझा दांभिकपणा एक क्षणात उघडा पडेल. मी त्या दोघांवर घातलेला संमोहन मंत्र मागे घेईन. पण तुला त्याची किंमत मोजावी लागेल. आहे तयारी ?

राजा . हो – माझी कशालाही तयारी आहे.

यक्षिणी : मग राजा – त्या दोन मंत्रांची किंमत म्हणून मला तुझ्या दोन्ही डोळ्यांतलं तेज मला हवं. आहेस तयार ते द्यायला ?

राजा : या मुलीच्या सुखासाठी मी काहीही करायला तयार आहे.

यक्षिणी : तिच्यासाठी आपली दृष्टी द्यायला तयार आहेस तू ?

राजा . हो – सांगितलं ना एकदा – मी तयार आहे.

यक्षिणी मग जा – जा त्यांना घेऊन – ती दोघंही क्षणार्धात पूर्ववत् होतील. (संगीताचे स्वर.)

तरुण : मी कुठं आहे ?

तरुणी . आपण – मला वाटतं आपण या भयाण अरण्यात वाट चुकलो होतो. चला काळोख पडला. आपल्याला नगराच्या वेशीपर्यंत पोचायला हवं. (तरुणाला घेऊन जाते.)

राजा : किती सुंदर दिसतेय् ती या वेळी आपल्या नवऱ्याला सांभाळून नेताना. मघा ती माझ्याजवळ असतांनाहि इतकी सुंदर दिसली नव्हती आणि मी – मी अजून तिला पाहू शकतो ? मला दृष्टी आहे ? अजून ? यक्षिणी – तू दयाळू आहेस. तू माझ्यावर अतर्क्य उपकार केलेस तू –

यक्षिणी (विलक्षण संतप्त) मूर्ख माणसा, मी तुझ्यावर उपकार केले नाहीत. उपकार करायची किंवा वैरही करायचीहि तुझी लायकी नाही. मी तुला अंध केलं नाही – कारण त्यात काही अर्थ नव्हता. तुझी दृष्टी घेऊन मला काय उपयोग ? मला फक्त इतकंच माहित करून घ्यायचं होतं की झाडझोडाऱ्याच्या लायकीच्या त्या क्षुल्लक पोरीसाठी तू काय वाटेल ते करु शकतोस ! काहीहि करू शकतोस ! – मला दिलेलं वचनहि मोडू शकतोस !

राजा : वचन ? मी कुठलं वचन मोडलं ?

यक्षिणी तू तिच्या प्रेमात पडलास – क्षुद्र माणसा – तू तिच्या प्रेमात पडलास ! तुम्हा

माणसांचा हाच तर घोटाळा असतो. कुठलीहि गोष्ट तुम्हाला शुद्ध राखता येत नाही – त्यांत दुसरं काहीतरी मिसळलं जातच! तू कायम वासनेचा पुजारी राहीन असं कबूल केलं होतस. मग आज – आज का तू त्या मुलीसाठी व्याकुळ झालास ? माझ्याकडे याचना करीत आलास ? म्हणे मला तिनं संमोहनाशिवाय वश व्हायला हवं! खोटं बोललास तू! ते खरं असतं तर आज तू तिला नवऱ्याबरोबर जातांना पाहून सुखी झाला नसतास. केवळ तिच्या सुखाचा विचार करायला लागला नसतास. केवळ तिच्या सुखाचा विचार करायला फार-फार शुद्ध-वासनाविरहीत प्रेम करायला लागलास तू तिच्यावर! निष्कारण! खऱ्या प्रेमाला कारण नसतंच म्हणा! – पण हे करताना तू माझ्याशी केलेला करार मोडलास! तू नुसत्या शरीरसुखावर समाधान मानलं नाहीस. तुला प्रेम हवंस वाटलं.

राजा : मी – मी तू सांगशील ते प्रायश्चित्त घेईन.

यक्षिणी : (व्याकुळ होऊन) कधीच – कधीच का तू मला समजू शकणार नाहीस ? प्रायश्चित्त तू कसल घेतोस ? प्रायश्चित्त मला घ्यायला हवं – तुझ्यावर प्रेम केल्याचं प्रायश्चित्त! मला वाटलं तुझं शरीर कुणाचहि होवो – शरीराचं काय महत्त्व ? पण तुझं मन – तुझं मन मात्र तू दुसऱ्या कुणालाच देणार नाहीस. म्हणून मी ती अट घातली – पण नाही – तू अट मोडलीस – अट नाही मोडलीस तू – माझ्या साऱ्या जिण्याचा अर्थ संपवलास! सुखी रहा तू – मी येते!

(अचानक अग्नी प्रज्ज्वलित होतो आणि त्यात यक्षिणीचा वृक्ष जळू लागतो ... राजा हतबुद्ध होऊन कोसळतो. एकटा यक्ष तेवढा विचारात.)

यक्ष : यक्षिणी-यक्षिणी ... तू गेलीस ... नेहमी सारखी फक्त स्वतःचा एकटीचाच विचार करून गेलीस. स्वतःसाठी जगलीस ... स्वतःसाठीच जळून गेलीस ... असा विचारसुद्धा तुझ्या मनाला शिवला नाही – की या सबंध अरण्यात ... तुझ्यावाचून ... मी एकटाच राहीन ? मी एकटाच राहीन ... ?

(चंद्रोदय होतो. पण यक्षाच्या वृक्षावरची फुले मात्र उमलत नाहीत.)

# सर्व काही हवे, पण . . .

सूचना : ही एकांकिका पटकथेच्या अंगाने लिहिली असून तिच्यात श्राव्य सूचना तेवढ्याच दिलेल्या आहेत. रंगमंचावर तिचे संकल्पन कल्पक दिग्दर्शकाने कुठल्याही पद्धतीने केल्यास चालू शकेल.

(वर्ग चालू आहे.)

शिक्षक : तेव्हां मुलांनो, माझ्या म्हणण्याचा सारांश तुमच्या लक्षात आलाच असेल. स्मगलर्स ही आपल्या देशाला लागलेली कीड आहे. कोट्यावधि रुपयांचा माल त्यावरची जकात बुडवून कस्टम अधिकाऱ्यांचा डोळा चुकवून इतर देशांतून आपल्या देशांत आणला जातो. हा असा चोरटा व्यापार करणाऱ्या या चोरांनी देशाला आजवर लुबाडलं आहे, नाडलं आहे. यासाठी आपण साऱ्यांनी स्मगलिंग करणाऱ्या मंडळींना देशाचे शत्रू समजलं पाहिजे. चोर, लुटारू समजलं पाहिजे. तुमच्यासारख्या शाळकरी विद्यार्थ्यांनी देखील एव्हांपासूनच ध्यानात ठेवलं पाहिजे की, देशाला आतून बाहेरून पोखरणाऱ्या या घुशींशी आपलं वैर आहे. त्यांच्या श्रीमंतीला भुलून न जातां आपण त्यांना तुच्छ लेखलं पाहिजे. त्यांच्याशी कसल्याही प्रकारचा संबंध तर ठेवता कामा नयेच. पण त्यांना पकडून देण्यासाठी सुरक्षा खात्याला मदत केली पाहिजे. मुलांनो, आजचा सामान्य ज्ञानाचा सारा तास मी या विषयासाठी खर्च केला याचं कारण एवढंच की, तुम्ही विद्यार्थीच भारताचे पुढले नागरिक आहांत – तुम्ही मनावर घेतलंत तर देश बलवान होईल – चोराचिलटांना मग त्यात थारा रहाणार नाही!

(घंटा होते. मुलांचा गलबला.) (गलबल्यांतूनच)

एक मुलगा : सर – तुम्ही म्हणालांत स्मगलर्सना पकडायला आम्ही मदत केली पाहिजे!

दुसरा मुलगा : मग सर – आम्ही नांव सांगितलं तर तुम्ही सुरक्षा अधिकाऱ्यांना कळवाल ?

शिक्षक : तुम्ही – ? तुम्हाला काय माहित ?

एक : आम्हांला माहितेय् सर – आपल्या वर्गातला कारंजकर आहे ना कारंजकर –

दुसरा : विवेक कारंजकर सर –

एक : त्याचे वडील स्मगलर आहेत!

शिक्षक : पुरे –! उगाच नावं घेऊ नका.

दुसरा : पण सर – तुम्हीच तर सांगितलंत –

शिक्षक : असूंदे. पळा खेळायला! – बोलत बसलात तर सुट्टी संपून जाईल!

(क्षणभर संगीत. वर्गाच्या कोपऱ्यात –)

तिसरा मुलगा : कारंजकर – अरे खेळायला चल ना! नाहीतर आत्ता सुट्टी संपून जाईल! ए कारंजकर – बोल ना रे! असा घुम्म काय बसून राहिलायस ?

विवेक : तू जा खेळायला मी नाही येत.

तिसरा : मला माहितेय् तू कां येत नाहीस ते! सरांचं भाषण भलतंच मनाला लावून घेतलंय्स तू!

विवेक : तू जातोस की नाही –

तिसरा : खरंच सांगतो. तू लक्ष देऊ नकोस. त्यांना काय, आज भाषणात शिव्या देतील तुझ्या बाबांना – पण उद्या शाळेसाठी डोनेशन मागायला –

विवेक : काय म्हणालास ? माझ्या बाबांना शिव्या देतील ? बाबांचा काय यात संबंध ?

तिसरा एहेरे! जसं काही आम्हाला माहितच नाही की, तुझे वडील स्मगलर –

विवेक . (ओरडून) जोशा तोंड सांभाळून बोल!

इतर मुले : आयला – कारंजकराचा रुबाब बघा –

विवेक : माझ्या बाबांना कुणी कांही बोलू तर दे – नाही लोळवला त्याला जमिनीवर तर बघा!

(संगीत.)

(घरी –)

विवेक आई – मी उद्यापासून शाळेत जाणार नाही.

अपर्णा विवेक – काय झालं ?

विवेक : बाबा वाट्टेल तसं वागतात आणि आमची अब्रू जाते!

अपर्णा (हसण्यावारी नेऊन) आज भारीच मोठ्या माणसासारखं बोलतंय् एक बाळ!

विवेक (चिडून) हसू नकोस. मी आता बाळ नाही. मला सगळं समजतंय्.

अपर्णा : असूदे. तू आधी हातपाय धू आणि तुझ्यासाठी पुडींग केलंय ते खाऊन घे बरं! –

विवेक : मला कांही खायचं नाही.

अपर्णा असं काय वेड्यासारखं करायचं ? माणसानं खाण्यावर कध्धी राग काढू नये.

विवेक आई, तू रोज मला उंची उंची पदार्थ खायला देतेस. कधी पुडींग, कधी पेस्ट्री, कधी समोसे – आई माझ्या वर्गातल्या इतर मुलांना असलं खाणं रोजरोज मिळत नाही. मी विचारून पाहिलंय.

अपर्णा . मग काय झालं ? तुझ्या वडिलांना नोकरीत चांगला पैसा मिळतो –

विवेक : नोकरी ? – आई तू स्वतःला फसवतेयस्. मला फसवतेयस्. बाबा कसली नोकरी करतात हे कधी तू स्वतः जाऊन पाहिलंयस् ? कधी बघितलंयस् त्यांचं ऑफिस ?

अपर्णा विवेक! – आज हे काय घेतलंयस् डोक्यात ?

विवेक बरोबर सांगतोय आई मी. बाहेर लोक त्यांच्याविषयी वाईट वाईट बोलतात. सगळी मुलं मला चिडवतात. 'तुझा बाप स्मगलर' म्हणतात! मास्तर आज वर्गात सांगत होते – सगळ्या स्मगलर्सना आता तुरुंगात जावं लागणार आहे! कारण ते चोर आहेत! बदमाष आहेत! चोर आहेत! – माझे बाबा चोर आहेत! (बोलता बोलता ओक्साबोक्सी रडू लागतो.)

अपर्णा रडू नकोस विवेक – विचार कर! तुला कांय कमी आहे ? सगळं कांही आहे! सुखसोयी आहेत.

विवेक (रडत) मला नकोत सुखसोयी! मला नको हे उंची खाणं ? हे अुंची कपडे! माझे बाबा फक्त इतर चार चौघांच्या बाबासारखे असते तर – चोर नसते तर – प्रामाणिक असते तर – (रडत सुटतो.)

अपर्णा : (असहाय) कशी समजूत घालायची विवेक तुझी ? मी तरी काय करू ? –

(संगीत – शाळेत –) (मुलांचा गलबला.)

विवेकचा मित्र: ए प्लीज – हे काढून टाका ना रे –

एकजण काय म्हणून काढून टाका ? हा बुजगावण्यासारखा स्मगलर छान दिसतोय खिडकीत टांगलेला!

दुसरा : हो – आमच्या नाक्यावर पण असलाच जुन्या कपड्यांचा स्मगलर फाशी दिलाय्!

तिसरा हो – फाशीच दिलं पाहिजे या लोकांना!

विवेकचा मित्र: अरे पण विवेकला काय वाटेल ? निदान त्या बुजगावण्यावर लावलेलं 'विवेक कारंजकरचे वडील' हे लेबल तरी काढून टाका!

सगळे (एकदम गलका करीत) कांही नाही ह – असंच छान दिसतंय – मोठा आला विवेकची बाजू घेणारा –

एकजण : ए, गप्प बसा ए – विवेक आला –

(सगळे गप्प. क्षणभर शांतता. मग –)

विवेकचा मित्रः विवेक – नेव्हर माईड – नुसती गंमत करताहेत ते – नुसती गंमत!

विवेक : (संथपणे) हो ना – खूप गंमत वाटतेय!

(शाळेची घंटा होते. गलबला. मग हळूहळू शांतता.)

शिक्षक : गप्प बसा. (डस्टर वाजवतात – पूर्ण शांतता.) अभय रानडे – (एक आवाज : "हजर" – ") सुब्रत प्रभु – ("हजर" – ")

विवेक : सर – मी मी पाणी पिऊन येऊ ?

शिक्षक : जा.

विवेकचा मित्रः सर – थांबवा त्याला. जाऊ देऊ नका.

शिक्षक : कां ?

विवेकचा मित्रः का कुणास ठाऊक सर! पण त्याचा चेहरा चमत्कारिक – मी जातो सर. त्याला बघून येतो –

(वाढती एक्साईटमेंट) सूचित करणारे संगीत.

प्रतिध्वनि झाल्यासारख्या दूरवरून हाका ऐकू येतात –)

विवेकचा मित्रः विवेऽक – विवेऽक – थांब-विवेक – कठड्यावर कशासाठी चढलायस् ? खाली उतर विवेक – खाली उतर –

विवेक : (दूरवरून आवाज येतो.) मला थांबवू नकोस – मी चाललो –

मित्र (किंचाळत) वि वे ऽ क –

(तारस्वरांतील संगीत. मग, लोकांचा गलबला.)

काही आवाज · ॲम्बुलन्स बोलवा – बापरे, बघवत नाही – चुकून पडला की काय ? असा कसा जिवाला कंटाळला ? आत्ता तर बरा होता – डॉक्टरना फोन केला का ?

मित्र (स्फुंदत) मी – मी पाहिलं त्याला पडतांना . नाही – चुकून नाही पडला त्यानं उडी टाकली तिसऱ्या मजल्यावरून – मला म्हणाला ... मी चाललो ... आणि मी त्याच्यापर्यंत पोचण्याआधीच . गेले काही दिवस त्याचं चित्त ठिकाणावर नव्हतं – मुलं त्याला 'स्मगलरचा मुलगा' चिडवायची म्हणून. तरी आज सकाळी मी सांगत होतो सर्वांना — त्याची भलती मस्करी करू नका म्हणून –

(त्याच्या हुंदक्यातच ॲम्बुलन्सचा आवाज मिसळतो. कांही वेळ नुसता ॲम्बुलन्सचा आवाज. मग, वाढते हुंदके, अपर्णाचे. हॉस्पिटलमध्ये –)

अपर्णा डॉक्टर, वाचेल का हो माझा बाळ ?

डॉक्टर शांत व्हा अपर्णाबाई. आमच्याकडून प्रयत्नांची शिकस्त चाललीच आहे. पाहू काय होतं ते. मी तुम्हाला खोट्या आशेवर ठेवणार नाही. पण मला वाटतं तो जगेल. नक्कीच जगेल.

अपर्णा : त्याला वाचवा, डॉक्टर. कसंही करून वाचवा. माझा एकुलता एक बाळ आहे तो, – आयुष्यांत ही एवढी एकच आशा आहे माझी – त्याला वाचवा. शक्य असतं तर माझे प्राण देऊन मी त्याला वाचवायला सांगितलं असतं.

डॉक्टर : प्लीज डोन्ट बी एक्साइटेड आईचं मन मी समजू शकतो, पण तो मला स्वतःला मुलाच्या ठिकाणी आहे असं समजा, आणि निर्धास्त राहा. या क्षणी त्याच्या प्राणांसाठी आमच्या हॉस्पिटलमध्ये दोन निष्णात डॉक्टर झुंजताहेत. त्यांच्या हाताला यश आल्याशिवाय राहाणार नाही –

अपर्णा : तुमच्या तोंडून देवच बोलतोय डॉक्टर.

डॉक्टर : पण मला नवल वाटतं – एवढा लहान मुलगा – आणि त्याला जगणं असह्य व्हावं –

अपर्णा काय सांगू डॉक्टर तुम्हांला ? मनानं भारी हळवा आहे तो. एकच एक डोक्यात घेऊन बसतो त्याच नादात राहातो –

डॉक्टर · कसला नाद घेतलाय त्यानं ?

अपर्णा : त्याच्या डोक्यानं घेतलंय् की आपले वडील – आपण – (एकदम गप्प होते.) काही नाही हो. पोरांचं चिडवणं यानं मनाला लावून घेतलं.

डॉक्टर . त्याचे वडील नाही आले ?

(अपर्णा काहीच बोलत नाही.)

नर्स (एकदम येऊन) डॉक्टर – दॅटस् बॉय इज लकी. नाडी नीट चालायला लागली.

अपर्णा : खरचं ? सिस्टर वाचेल ना हो माझा बाळ ?

नर्स : आता काळजीचं कारण नाही. पण अजून शुद्धीवर यायला वेळ लागेल.

अपर्णा : (कातर आवाजात) सिस्टर, परमेश्वराला देखील काळजी असेलच नाही ?

डॉक्टर : रिलॅक्स नाऊ. जरा शांत बसा. नाही तर तुमचाच नर्व्हस ब्रेकडाऊन होईल

•

(संगीत.)

नर्स : या, आत. आता थोडा थोडा शुद्धीवर यायला लागलाय्.

अपर्णा : विवेक – विवेक –

विवेक : (अर्धवट शुद्धीत) आ-ई –

अपर्णा : मी आलेय बाळ.

विवेक : आई ... बाबा चोर आहेत ... मी वर्गात रडलो ... मला फाशी दिलंय्. . दोर सुटला ... मी चाललो ...

अपर्णा . विवेक – माझा विवेक –

डॉक्टर : मुलाचे वडील नाही आले ?

अपर्णा : ते कालपासून बाहेरच गेलेत. निरोप ठेवलाय्. पण कधी येणार काहीच सांगितलेलं नाही. एखादवेळी दोन दोन दिवसदेखील घराच्या बाहेरच असतात.

डॉक्टर : कसलं काम करतात ते ?

अपर्णा : नोकरीला असतात. मुजावरभाई म्हणून एक व्यापारी आहे. त्याच्याकडे हिशेब वगैरे पहातात.

डॉक्टर : आश्चर्य आहे! माझी कल्पना अशी होती की ते कुठंतरी मोठ्या हुद्यावर –

अपर्णा : मला सारं सांगून टाकायचंय् डॉक्टर. कुणाकडे तरी बोलून टाकल्याशिवाय माझ्या मनाला चैन नाही पडणार – फार-फार वेळ मी हा कोंडमारा सहन करीत आलेय्. आता बोलले नाही तर खरंच मला वेड लागेल. मी सुद्धा विवेकसारखंच काहीतरी करून बसेन –

डॉक्टर : बोला तुम्ही. स्वस्थपणानं बोला. मला वेळ आहे आज. आपण माझ्या ऑफिसमध्ये जाऊ. बॉय, माझ्या ऑफिसवर कॉफी पाठव.

(क्षणभर संगीत.)

अपर्णा : यांच्याशी माझं लग्न झालं तेव्हां हे रेल्वेच्या गुडस् ऑफिसमध्ये एक कारकून होते. माझं शिक्षण बेताचं, आणि माहेर गावात. यांच्यासारखा रुपवान शहरी माणूस मिळाला म्हणून आनंदानं हरखून गेले मी. संसार उत्साहानं, हसतमुखानं करायचा असं मनाशी ठरवलं ...

(संगीत.)

– आज उशीर झाला ?

महेश : कुठं – रोजच्याच वेळी तर आलो.

अपर्णा : खोटं! मी किती वेळ वाट पाहिली तुमची.

महेश : तुला धंदा नसतो. चार वाजल्यापासून माझी वाट बघत बघतेस. त्याला मी काय करणार ?

अपर्णा : लौकर यावं.

महेश : हं! रेल्वेचे जावई नाही आम्ही. पूर्णवेळ काम करतो तरी साहेबांच्या शिव्या खाव्या लागतात.

अपर्णा : मी चहा आणते.

महेश : मी पाहिलंय् अपर्णा, मी नोकरीविषयी बोलायला लागलो रे लागलो की तू बदललासच विषय!

अपर्णा पण मी म्हणते, इतकं दमून आल्यानंतर बोलायचंच कशाला ? अं ?

हं – हा घ्या चहा. आणि वड्या कशा झाल्यायत ते सांगा.

महेश . हे काय! माझा एकट्याचाच ? तुझा चहा कुठाय ?

अपर्णा . मी घेतला मघा

महेश : तरी पण माझ्याबरोबर –

अपर्णा : अधिक चहा घेतला, तर मला झोप येत नाही –

महेश : दुसऱ्या शब्दांत – चहा आणि साखरेची मी बचत करते आहे. मग साखरेच्या वड्या कशाला केल्यास ?

अपर्णा . तुम्हाला आवडतात म्हणून. थोडी साखर बाजूला काढून ठेवली होती!

महेश : अपर्णा – माझ्यावर किती प्रेम करते तू! माझी लायकी तरी आहे का तेवढी ?

अपर्णा : झाली तुमची कांहीतरी वेडं वाकडं बोलायला सुरुवात!

महेश : खरंच सांगतो अपर्णा. तुझ्यासारख्या लक्ष्मीला सोन्याच्या मखरात ठेवायला हवी. पण इथं तू कचऱ्यात दिवस काढतेय्स! चहासाखरेचे कण वाचवीत!

अपर्णा : आज ना उद्या दिवस पालटतील! ही परिस्थिती थोडीच कायम रहाणार आहे ?

महेश . ही आशा खोटी आहे अपर्णा. आपण या गरिबीतच पिचून सडून जाणार!

अपर्णा : असू दे गरिबी. तुमच्याबरोबर संसार करताना मला नाही तिचं काही वाटणार.

महेश : आज म्हणतेय्स अपर्णा – अजून थोडी वर्ष जाऊं देत. मग हीच अपर्णा खंगलेली, कातावलेली, चिडचिडलेली दिसेल. मला शिव्याशाप देईल. माझ्या गरिबीनं बळी घेतला म्हणून तिचा तळतळाट होईल.

अपर्णा : किती भयंकर बोलता तुम्ही ?

महेश : वस्तुस्थिती भयंकरच असते अपर्णा, स्वप्नामधून जागी हो. गरिबी किती भयंकर असते हे मी प्रत्यक्ष अनुभवलंय्. आणि आजही अनुभवतोय्. दोन वेळचं जेवणसुद्धा नियमित न मिळता मी लहानाचा मोठा झालो – हा असा गुड्सच्या धुळीत पडून महिन्यांची दोन टोकं जुळवण्याची कसरत करण्यासाठी. हेच आयुष्य तुझ्यासुद्धा वाट्याला यायला नकोय् मला अपर्णा. तुझं हे सुंदर रुप या धगीनं कोमेजायच्या आधी या गरिबीतून बाहेर पडायचंय् मला.

अपर्णा . नुसत्या पैशामधे थोडंच सुख असतं ?

महेश : पैशामध्येच असतं अपर्णा. पैशामधेच असतं. गरिबीचे गोडवे नाटकासिनेमात गायला ठीक. पण प्रत्यक्षात विचारशील तर सुखाचं दुसरं नाव आहे पैसा पैशामागूनच सारी सुखं येतात, आणि हाती पैसा असतो तोवरच ती टिकतात

अपर्णा पुढचं पुढं – आज तर आपण सुखी आहोत!

महेश	तू असशील ! मी नाही ! चहादेखील न पितां तुला संसार करावासा वाटत असेल, पण माझी आयुष्याची कल्पना इतकी क्षुद्र नाही ! मला कायम त्या धुळीतला कारकून राहायचं नाही. तुझ्या माझ्यासारख्या देखण्या जोडप्याला राहायला एक सुंदर बंगला हवा – फिरायला गाडी हवी – हवा पालटायसाठी काश्मीर हवं – मनोरंजनासाठी नाइटक्लब हवेत – आणि खूप काय काय हवं ! जे जे सुंदर आहे ते ते सर्व कांही हवं !

अपर्णा .	तुमच्या इतकं जर मनात आहे तर मिळेल ते आपल्याला !

महेश	या नोकरीत काय मिळणार आहे ? धुळीत वळवळणाऱ्या गांडुळासारखा सारा जन्म वाया जाणार आहे ! आजचंच बघ. एका नालायक माणसानं केवळ वरिष्ठ म्हणून आज मला वाटेल तसं हेलपाटलं. वाटलं या क्षणी नोकरी सोडावी. नाहीतर पाण्यात उडी टाकून जीव द्यावा !

अपर्णा :	असे भलते सलते विचार करायचे नाहीत हं आता ! आता तुम्ही किनई –

महेश :	अपर्णा ?

अपर्णा	कसं सांगू ? तुम्ही-तुम्ही आता बाप होणार आहांत !

महेश :	खरंच ? (क्षणभराने) नाही अपर्णा. या बातमीचा मला नाही आनंद होत. आनंदावर आपला अधिकारच राहिलेला नाही. वाटतं आपण आणखी एका जिवाला या गरिबीत पिचण्यासाठी आपल्याबरोबरच ओढतोय ! तसं करणं हे पाप आहे पाप !

अपर्णा :	(घाबरून) काहीतरी अभद्र बोलू नका1 !

महेश :	उद्या आपला मुलगा मोठा झाल्यानंतर म्हणेल – माझ्या बापानं मला दारिद्र्याखेरीज कांहीच ठेवलं नाही. मला माझ्या बापाची शरम वाटते !

(संगीत.)

डॉक्टर :	दिवसेंदिवस त्यांची गरिबीची खंत वाढत गेली. विवेक मोठा होत चालला होता. यांचं पैशाचं वेडही वाढत चाललं होतं . (संगीत.)

अपर्णा :	किती उशीर केलात आज ! मी आणि विवेक – आम्ही दोघंही वाट पाहात बसलो होतो. होय की नाही रे विवेक ?

महेश :	अपर्णा, मी नोकरी सोडली.

अपर्णा :	नोकरी सोडलीत ?

महेश .	मला तिथलं वातावरण असह्य झालं अपर्णा. तिथली टोचून बोलणारी पैपैशांचे हिशेब करणारी, दीडदमडीची माणसं मला सहन होईनात.

अपर्णा :	मी पाहू का कुठं काम ? कसलं मिळेल तसलं –

महेश :	तूं ? (चिडून) तू कुठं काम पाहाणार आहेस ? भांडी घासण्याचं की धुणी धुण्याचं ? तुझ्यापेक्षा किती तरी अधिक शिकलेल्या पुरुषांना कुणी नोकऱ्या देत नाहीये आजकाल.

अपर्णा : तुम्ही रागावू नका ना. उगाच माथं भडकवून घेण्यात काय अर्थ आहे काही तरी मार्ग निघेल.

महेश : (अधिकच संतापून) तुझ्या या – या थंडपणाचाच मला संताप येतो! तुझी ही अल्पसंतुष्ट वृत्तीच आजवर आड येतेय्! जे असेल त्यात भागवायचं! अधिक काही हवं म्हणायचं नाही! म्हणूनच इतकी वर्षं आपण दारिद्र्यात काढली. तू टोचणी लावली असतीस तर मी पूर्वीच पैसा मिळविण्याचा मार्ग शोधला असता!

अपर्णा · चुकतं माझं – मला काही समजत नाही. पण तुम्ही शांत व्हा ना. जेवायला वाढू का ?

महेश : इतके दिवस मी ती भिकार नोकरी केली! – तरी तुला त्यात आनंद! आज नोकरी सोडल्याचं सांगतोय् – तरी तू समाधानी! एकदा आरशांत बघ कशी लंकेची पार्वती दिसतेयस्. इतका गोजिरवाणा आपला पोरगा! – पण त्याच्या अंगावर ठिगळं लावलेले कपडे! या असल्या दारिद्र्यात तुझा आनंद! पण मी जिवंत नाही राहू शकत या असल्या परिस्थितीत! गुदमरून जायला होतंय् मला! सुखाची, चैनीची स्वप्नं पडतात मला रात्रंदिवस! मी दुसरीकडे नोकरी धरलीय् उद्यापासून!

अपर्णा . दुसरीकडे ? एवढ्यात मिळाली सुद्धा ? म्हणजे देवच पावला!

महेश : बस! झाली खूष! नोकरी कसली आहे, काय आहे, चौकशीदेखील नाही!

अपर्णा : मला नाही करायची चौकशी! माझ्यासारख्या अडाणी बाईला काय कळतंय् नोकरीतलं ? तुम्ही शोधलीत म्हणजे ती चांगलीच नोकरी असणार ? पण आता तरी तुमच्या जिवाला सुख लागलं म्हणजे पुरे! माझं नि विवेकचं सुख तुमच्यातच आहे!

(संगीत.)

अपर्णा : मी असं म्हटलं खरं, पण ते हळूहळू खोटं ठरायला लागलं. हे बराचसा वेळ बाहेरच असायचे. जेव्हा घरी येत तेव्हा विचारात दिसायचे. कधी काळजीतही असत; पण पूर्वीसारखं चिडचिडणं मात्र त्यांनी सोडून दिलं. स्वत:विषयी तुच्छतेनं बोलणं कमी केलं. आम्ही चाळीतली जागा सोडून मोठा ब्लॉक घेतला हळूहळू तो एकेका उंची वस्तूनं भरला जाऊ लागला. रेडिओ आला, सोफासेट आला, फ्रिज आला, टेलिफोन देखील आला. आमचा सगळा संसार बदलूनच गेला. पहिल्या पहिल्यानं मला खूप आनंद झाला. वाटायला लागलं की आयुष्याचं सार्थक होणार. पण हळूहळू माझा आनंद कमी होऊ लागला. त्याची जागा एक प्रकारच्या भीतीनं घेतली.

(महेशचे हसणे.)

महेश आता कशी राजाची राणी शोभतेस! खरंच, हा सोन्याचा कोल्हापुरी साज इतका सुंदर आहे! हे तो तुझ्या गळ्यात घालेपर्यंत मला समजलं

नव्हतं!

अपर्णा काहीतरीच!

महेश : का ? आवडला नाही ?

अपर्णा आवडणार कुणाला नाही ? पण कशासाठी आणलात ? परवाच तर मला शालू आणलात!

महेश : परवा आपल्या लग्नाचा वाढदिवस होता!

अपर्णा . पण आज तर काही नाहिये! मग ?

महेश : कारण कशाला हवं ? तुझ्यासारखी गुणी बायको हेच हौस मौज करायला पुरेसं कारण आहे!

अपर्णा . पुरे हं! अलिकडे भारीच् वाढलंय कौतुक!

महेश खरंच अपर्णा, इतकी वर्ष तुझी राहून गेलेली हौस फेडायचा जमेल तेवढा प्रयत्न करतोय् मी!

अपर्णा : पण हे कशाला ? माझी हौस कधीच अपुरी राहिली नाही. कधी कधी वाटतं की आपल्या त्या गरिबीच्या दिवसातच मी पूर्वीपेक्षा अधिक सुखी होते.

महेश : उगाच दळभद्रीपणाचं बोलू नकोस!

अपर्णा : तुम्हाला पटायचं नाही पण खरंच सांगते. आजकाल तुम्ही मला भेटतसुद्धा नाही. सारखं पैशाच्या मागे लागून काय दशा करून घेतलीयत् तुम्ही स्वतःची! मलादेखील तुमची काळजी घेता येत नाही; कारण तुम्ही घरातच नसता. तुम्ही कसलं काम करता तेही मला कळत नाही!

महेश (नकळत त्याचा स्वर कठोर होतो.) मी कसलं काम करतो ते तुला कळायची गरज नाही. समजलं ? तुला लागेल तेवढा पैसा, हव्यात त्या वस्तू मी आणून देतो ना – मग बस्स्! पुन्हा माझ्या व्यवहारात नाक खुपसू नकोस! आणि जरा आनंदी राहा! तुझ्यावरती मी जो पैशाचा पाऊस पाडतोय् तो तू दिवसेंदिवस कोमेजून जावीस म्हणून नाही!

(एकदम फटाके फुटल्याचे आवाज. पुढील संवादात ते ऐकू येतच रहातात .)

अपर्णा दिवाळीचे दिवस होते . माझा मावसभाऊ भाऊबिजेसाठी आला होता

भाऊ अपर्णा, मी एकट्यानेच जेवायला बसायचं ? महेश कधी येणार ?

अपर्णा . त्यांचा काही नेम नसतो. विवेक बसेल तुझ्याबरोबर.

भाऊ आज दिवाळीला कसलं काम काढलंय् एवढं ?

अपर्णा : त्यांचं ऑफिसचंच आहे काही तरी.

भाऊ दिवाळीला देखील ? कुठे आहे महेश नोकरीला ?

अपर्णा : मुजावरभाई म्हणून एक व्यापारी आहे आज त्यांचा बराच माल जायचाय् म्हणाले.

भाऊ अपर्णा एकाद्या व्यापाऱ्याकडे महेश साधी सुधी नोकरी करत असेल

अस वाटत नाही तुमच्या घराकडे पाहून. खरं सांगू अपर्णा – महेश कसलं काम करतो ?

अपर्णा : मला काही माहीत नाही – तुझी शप्पथ माहीत नाही – मी त्यांच्या व्यवहारात पडायचं नाही असं यानी पक्कं बजावून ठेवलंय्. पूर्वी आम्ही गरिबीत दिवस काढले, पण तेव्हा मी आनंदात होते. आज हे सारं वैभव दिसतंय् – पण चैन पडत नाही – कारण हे काय चाललंय् तेच मला कळत नाही!

भाऊ : कळत नसलं तर मी सांगतो. आम्ही दूर रहातो अपर्णा, पण या गोष्टी आमच्याही कानावर आल्याशिवाय रहात नाहीत. कधीकधी जवळच्या माणसापेक्षा लांबच्या माणसालाच अधिक माहिती असते

अपर्णा काय म्हणायचंय् तुला ?

भाऊ : महेशचे व्यवहार सरळ नाहीत, अपर्णा. कुठल्याही सरळ व्यवहारात पैसा इतक्या सहजासहजी, इतक्या थोड्या वेळात मिळत नाही.

अपर्णा काय – काय करतात हे ?

भाऊ : त्यांचा हा मुजावरभाई स्मगलिंग करत असला पाहिजे – आणि महेश त्याचं काम करतो! स्मगलिंगचं! आज तू गप्प बसून हे सारं पहातेयस्! तो आणतो त्या उंची वस्तू वापरतेयस्! पण हा शोभिवंत संसार उद्या रस्त्यावर यायला वेळ लागणार नाही! विचार कर – आज ना उद्या महेश पकडला जाईल! मग तुझी जगात काय पत राहील ? विवेकचं काय होईल ? विचार कर! अपर्णा विचार कर –

(फटाके फुटतात. संगीत.)

अपर्णा महेश –

महेश काय हवंय तुला आता ?

अपर्णा मला कांही नकोय् महेश. मला फक्त तुम्ही हवे आहात.

महेश : मी तुझाच आहे –

अपर्णा नाही महेश. पूर्वी तुम्ही माझे होता. आता तुम्ही फक्त माझे नाही. विवेकचे नाही. तुमच्यावर सत्ता चालतेय् पैशाची! ते देणाऱ्या मुजावरची!

महेश वेड्यासारखं बडबडू नकोस.

अपर्णा : आजवर तुम्ही मला कधीच कळू दिलं नाहीत की तुम्ही चोरट्या व्यापाराला मदत करता! तुम्ही चोर आहांत! गुंड आहांत! (तो तिच्या थोबाडीत मारतो )

अपर्णा नुसतं एवढं म्हटलं म्हणून तुम्ही माझ्या थोबाडीत मारलीत! पण किती जणांची थोबांड तुम्ही बंद ठेवणार ? बाहेर लोक बोलताहेत!

महेश : तुला कुणी सांगितलं ?

अपर्णा : कुणीही असेल. आतां सगळ्यांनाच ठाऊक झालं आहे!

महेश . समजलं! तुझा मावसभाऊ तुला या नवीन ज्ञानाची भाऊबीज घालून गेलेला दिसतोय्!

अपर्णा कुणी कां सांगेना. पण ते खरं आहे, होय ना ?

महेश : समज असलं, मग ?

अपर्णा : पण कां हे सारं महेश ? कां ?

महेश : विचारायची गरज नाही. मला पैशानं मिळणारं सारं काही हवंय्. आणि त्यासाठी पैसा हवाय् – माझ्यासारख्या जेमतेम मॅट्रीक झालेल्या माणसाला आणखी कशात एवढा पैसा मिळणार आहे ?

अपर्णा : प्रामाणिकपणाचं जेवढा पैसा मिळेल. त्यात नाही का भागवता येणार आपल्याला ?

महेश : नाही अपर्णा. प्रामाणिकपणाची किंमत आजच्या बाजारात फारच थोडी आहे. त्या किंमतीत काही खरेदी करता येत नाही.

अपर्णा : जगात पुष्कळ माणसं आहेत. ती गरिबीतच दिवस काढतात – पण गुंडगिरीच्या वाटेनं जात नाहीत! त्यांचं चालतंय् ना ? मग आपल्यालाच कशाला हवी जगातली सगळी चैन ?

महेश तुझा स्वभाव वेगळा आहे अपर्णा. माझा वेगळा आहे. तो तसा का झाला ठाऊकेय्. माझे वडिल अतिशय प्रामाणिक होते .. कुणी खोटं बोललं की त्यांना अतिशय चीड यायची. एवढेसे खोटे सांगितले तरी ते मला फोडून काढायचे. ते शाळेत शिक्षक होते . . शिक्षकाचा पगार तो केवढा – माझी आई सुगरण म्हणून कसा तरी कोंड्याचा मांडा करून आम्हाला वाढवायची – परिस्थितीची झळ लागू द्यायची नाही. आप्पांच्या तत्वांचा त्रास तिला होतच असे – पण ती कधी बोलत नसे. एके दिवशी आप्पांच्या प्रिन्सिपॉलशी कशावरून तरी खटका उडाला. गांवातल्या कुठल्या तरी श्रीमंताच्या मुलाला वाटतं ते पास करायला सांगत होते. आणि आप्पांना ते पसंत नव्हतं. तडकाफडकी आप्पांना नोकरी सोडावी लागली. घरात शिल्लक दमडीभरही नव्हती. आमची दोन वेळच्या अन्नाची पंचाइत झाली. तशात मी आजारी पडलो. फणफणून ताप आला. आप्पा उघड्या डोळ्यांनी पाहात बसले. माझ्यावर त्यांची माया नव्हती असं नाही, पण खिशात औषधासाठी दमडी नव्हती डॉक्टर बोलावणं परवडत नव्हतं ... माझा ताप चढत होता आई आप्पांच बोलणं माझ्या कानावर येतच होतं . त्याची असहाय अवस्था मला कळत होती .. त्या तापात ते सारं दुःख अधिकच अजस्त्र होऊन माझ्या डोक्यात घुमत होतं. डोळ्यावर गुंगी येत होती. त्या गुंगीत आप्पांचे शब्द भयानक आकार घेत होते. "कुठून आणायचे पैसे ?" आई म्हणत होती – "पोराला मरू का द्यायचंय ?" आणखी पुष्कळ ते बोलत होते. पण माझ्या डोक्यात मात्र हीच दोन वाक्यं पुन्हां पुन्हां फिरत होती – "कुठून आणायचे पैसे ?" "पोराला मरू का द्यायचं ?" मला वाटतं आईनं नंतर कुठून तरी काही तरी व्यवस्था केली त्या आजारातून मी बरा झालो . पण दरिद्र्याविषयीची चीड माझ्या मनात जाऊन बसली ती कायमचीच. अजून ते शब्द माझ्या डोक्यात

घुमतात ... "पोराला मरू का द्यायचंय् ?" मी ठरवलं की काय वाटेल ते झालं तरी माझं पोर दारिद्र्याच्या रोगानं मरणार नाही ... माझा मुलगा सुखात वाढेल – माझा मुलगा –

(वाद्यावर एक आघात – हॉस्पिटलमधील – संवादाला जोडणारा)

अपर्णा . आज त्यांचा मुलगा त्यांच्या या विचाराचीच फळं भोगत पडलाय् डॉक्टर1 ! त्याला वाचवा डॉक्टर – बापाचं पाप त्याच्यावर यायला नको ! हे तर आता सुधारण्याच्याच पलिकडे गेलेत ! मी सुरुवातीला विरोध करून पाहिला – त्यांना सोडून जाण्याची धमकी दिली ! पण ते मला साधलं नाही ! ज्या कुणा बायकांना ते साधत असेल त्यांना असूदे, पण मी तरी दुबळी ठरले ! नुसती तोंड मिटून गप्प बसले ! फार दुबळी आहे हो मी डॉक्टर ! – फार दुबळी !

डॉक्टर : वाईट नका वाटून घेऊ अपर्णाबाई ! तुमच्यासारख्या असहाय ठरलेल्या बायका थोड्या नाहीत.

अपर्णा : माझा विवेक मोठा होईल, आणि बापाच्या नावाला लागलेला कलंक पुसुन टाकील, एवढीच मला आशा आहे ! तो जगला पाहिजे डॉक्टर – तो जगलाच पाहिजे !

(काही वेळ संगीत चालू राहाते. मग, मुजावरच्या ऑफिसात –)

मुजावर : रतनलाल, कारंजकराचा लडका जगला पाहिजे !

रतनलाल : हां बॉस, नाय तर कारंजकरचा दिल कामामधून एकदम उडून जाईल !

मुजावर : असा होऊन नाय चालेल ! कारंजकर कामाला एकदम हुशार गडी हाये !

रतनलाल : कामाला असेल बॉस, पण आजकल त्याचा काय खरा नाय ! आज नही तो कल, ये कारंजकर इन्फॉर्मर बननेवालाही है ।

मुजावर : क्या बकवास करते हो !

रतनलाल · बकवास नही बॉस ! कुणाकुणाकडे तो बोलत असतो – म्हणतो, ये काम छुट जायेगा तो अच्छा, उसकी औरतको पसंद नही आता, ऐसा लगता है ।

मुजावर : इंपॉसिबल ! अरे औरत लोगला तर कपडा मिळाला, आराम मिळाला, पैसा मिळाला की झाला. तेला आणखी काय पायजे ? ते तर एकदम हॅपी राहते !

रतनलाल बहुतेक बायका राहातात बॉस, पण ये कारंजकरची औरत थोडी डिफरन्ट हाय ! तिच्यासाठी कारंजकर ये धंदा छोडायला मागतो !

मुजावर : देन ही इज ए फूल ! वो समझता नही की जो आदमी इस लाइन मे आता है वो जान छुटनेके बादही छुटकारा पाता है । रतन, कारंजकरपर कडा वॉच रखना – कभी वो पोलिसके पास जायेगा ऐसा हुवा तो उसके पहिले उसकी छुट्टी होनी चाहिए ।

रतनलाल : वो आया –

मुजावर : गुड इव्हनिंग कारंजकर !

महेश : आज की खास बात –

मुजावर : खास बात तुम्हे मालूम है। आज रात कुलाबामे मेसेज आनेवाला है।

महेश : आप बिनधास्त रहिये। ये काम हमारे लिये बिलकुल आसान है। दुसरा कुछ –

रतनलाल : दुसरा जो मॉर्निंग पेपर्स मे आया है वो याद रखना। पोलिसना एकदम स्ट्रिक्ट इन्स्ट्रक्शन्स मिळालेल्या आहेत! स्मगलर्सभोवती पोलिस नेट पडणार हाय! नोबडी इज सेफ्!

महेश : अरे पोलिस की ऐसी तैसी! आय डोन्ट केअर! और कुछ –

मुजावर : कारंजकर – एक बहुत बुरी न्यूज है! आजका इव्हिनिंग पेपर पढा तूने ?

महेश : नाही – काय झालं ?

मुजावर : युवर सन हॅज अटेम्प्टेड सुइसाइड!

महेश : कोण ? विवेक ? ओ नो!

मुजावर : तेचा म्हणे स्कूल बॉइजने टीज् केला की 'स्मगलर का लडका' करके. तो उसने तिसरी मंजिलसे कुदी मार दी! ही इज इन द् हॉस्पिटल!

रतनलाल : कारंजकर, शाळेतल्या लडके लोगतक ये पहुच गया – धिस् इज् नो गुड् पब्लिसिटी फॉर अस्!

महेश : बॉस – आज कुलाबा में कोई दुसरा आदमी जा सकता है ?

मुजावर : क्यूं ?

महेश : मला हॉस्पिटलमधे जायला पाहिजे बॉस.

रतनलाल : असं कसं करता येईल कारंजकर ? कमिटमेंट इज कमिटमेंट.

महेश : पण रतनलाल – तुला समजत कसं नाही ? हा ॲक्सिडेंट आहे. कमिटमेंट बदलायला हवी – मला जायलाच हवं – ताबडतोब – कदाचित माझा मुलगा मला भेटणार सुद्धा नाही.

मुजावर : जाने दो उसको रतनलाल. दूसरे किसीको कुलाबा भेज देना।

महेश : बहुत बहुत शुक्रिया बॉस. गुडनाइट्.

रतनलाल : पाहिलंत बॉस – मी सांगतो ते हे! त्याची औरत, त्याचा लडका – और उसके बाद अपना 'जॉब'!

मुजावर : एक बात ध्यान रखो. उसके पिछे रहना. देखना कि वो पुलिस के पास नही जाय! अगर गया तो –

(संगीत.) (हॉस्पिटलमध्ये.)

महेश : डॉक्टर –

डॉक्टर : कोण आहे ?

महेश : मी कारंजकर. माझ्या मुलाला इथं ठेवलंय् – होय ना ? कसा आहे तो ?

डॉक्टर : आता बरा आहे. शुद्धीवर आलाय्. पण ठिकठिकाणी लागलंय् त्याला. अजून बरेच दिवस इथंच काढावे लागतील.

महेश : थँक्यू डॉक्टर. तुमच्या शब्दांनी थोडा धीर आला. नाहीतर इथवर

कसा आलो ते माझं मला ठाऊक! कुठं आहे डॉक्टर तो ? मला बघायचंय् त्याला.

डॉक्टर : थांबा कारंजकर. बसा जरा. तुम्ही धावतपळत आलेले दिसताय्.

महेश : तर काय!

डॉक्टर : मला तुमच्याशी थोडं बोलायचंय् कारंजकर. बिफोर यू सी युअर सन्!

महेश : बोला ना –

डॉक्टर : तुम्हांला कल्पना आहे कारंजकर तुमच्या मुलानं आत्महत्येचा प्रयत्न कां केला ?

महेश : होय डॉक्टर. आय् एम् टेरिबली सॉरी.

डॉक्टर : नुसतं वाईट वाटून फारसं काहीच साधणार नाही कारंजकर. कारण त्यामुळं तुम्ही आपला आयुष्यक्रम बदलाल असं मला वाटत नाही. आपलं आयुष्य कुणीच कुणासाठी बदलत नाही. परक्यासाठी नाही – की पोटच्या पोरासाठीही नाही.

महेश : डॉक्टर!

डॉक्टर : तुम्हाला वाटत असेल कारंजकर की मला असं बोलण्याचा अधिकार काय ?

महेश : नाही – असं कसं वाटेल ? तुम्हीच तर विवेकचे प्राण वाचवलेत. तुम्ही जरूर बोला.

डॉक्टर : प्राण कुणामुळं वाचलेत याचं महत्व नाही कारंजकर. पण कुणामुळे जे जाणार होते, याचा विचार तुम्ही करायला हवा. आपण आपल्या सुखामागे धावत असतो – पण, त्या कोवळ्या जिवांवर त्याचा काय परिणाम होतो –

महेश : हे चांगलं माहीत आहे डॉक्टर मला. मी स्वतःच ते अनुभवलंय्. घरच्या गरिबीचा माझ्यावर इतका भयंकर परिणाम झाला की मी आज या मार्गाला लागलो.

डॉक्टर : आणि तुमच्या श्रीमंतीला विटून तुमच्या मुलाला जीव नकोसा झाला. यात तुम्ही काय मिळवलंत कारंजकर ? कसलं सुख विकत घेतलंत ?

महेश : डॉक्टर, माणसानं स्वतःची गरिबी दूर करणं हा गुन्हा आहे का ?

डॉक्टर बिलकुल नाही. पण त्यासाठी आपण जो मार्ग निवडतो तो चुकीचा असून चालत नाही. काय सांगू कारंजकर, लहानपणी माझी स्वतःची परिस्थिती तुमच्यापेक्षाही अधिक वाईट होती. तुम्हांला निदान आईबाप होते. माझी रवानगी एका खाष्ट मामाकडे झाली होती. चार घरची काम करून मी शाळेचा खर्च काढायचा. स्कॉलरशिपवर शिकून मी डॉक्टर झालो. गरिबीचा मला तिटकारा होता. माझ्या आयुष्यातून मी गरिबीला हाकलून दिलं पण माझ्या मार्गानं. अशा मार्गानं की ज्यातून चार लोकांचं झालं तसं भलंच होईल एनी वे कुणी कुठला मार्ग घ्यावा हे दुसरं कोण कसं ठरवणार-? एवढंच लक्षांत ठेवायला हवं की प्रत्येक गोष्टीची एक किंमत असते. माणसाला सर्व काही हवं असतं. पण त्याची किंमत देणं मात्र त्याच्या जीवावर येतं.

(अपर्णा.)

अपर्णा : अगबाई – तुम्ही कधी आलांत ?

महेश : अपर्णा, विवेक कसा आहे ? मला घेऊन चल त्याच्याकडे.

अपर्णा : डॉक्टर, नेऊ यांना ?

डॉक्टर : न्या.

(विवेकच्या बिछान्याजवळ –)

महेश : विवेक –

अपर्णा : विवेक – तुझे बाबा आलेत.

महेश : विवेक – बोल ना –

अपर्णा : विवेक – बाबांशी बोलायचं नाही का ?

महेश : अपर्णा – तो नाही बोलणार माझ्याशी.

अपर्णा : असं नका काहीतरी समजू. विवेक – बोल ना – हे बघा तो अजून नीटसा शुद्धीवर नाही. शुद्धीवर आला की बोलल्याशिवाय नाही राहाणार.

महेश : तू माझी समजूत घालतेयस् अपर्णा – तो शुद्धीवर आहे – चांगला शुद्धीवर आहे – पण त्याला माझा तिरस्कार वाटतोय् – त्याला माझ्याशी बोलायचं नाही – विवेक – एकदा तरी बोल ना माझ्याशी – "बाबा" म्हण –

विवेक : (प्रयासाने) बाबा –

(एकदम त्याच्या कानात आवाज घुमू लागतात;
"विवेकचे बाबा स्मगलर आहेत ..."
"विवेकचे बाबा चोर आहेत .. "
"विवेकच्या बाबांना पोलिस पकडणार आहेत ..."
"विवेकच्या बाबांना फाशी देणार आहेत –")

विवेक : (भ्रमात ओरडल्याप्रमाणे) नाही – बाबा चोर नाहीत. कोण म्हणतं त्यांना स्मगलर पुढे या ... नाही एकेकाला लोळवले जमिनीवर –

महेश : विवेक – तू त्रास करून घेऊ नकोस – यापुढे तुला माझा त्रास होणार नाही –

अपर्णा . कुठं निघालात –

महेश : आपला विवेक जगला पाहिजे अपर्णा – अब्रूनं जगलं पाहिजे ..

अपर्णा : महेश !

डॉक्टर : कुठं चाललात कारंजकर ?

महेश : मी स्वतःहून पोलिसांच्या स्वाधीन व्हायचं ठरवलंय् डॉक्टर. मला माझ्या मुलाचं सुख हवंय् – त्याची किंमत मला मोजायलाच् पाहिजे

(वाद्यावरती काही आघात.)

महेश : (खाली आलेला.) टॅक्सी ऽ

(टॅक्सी थांबते.)

ड्रायव्हर : किधर जाना है साब ?

महेश : नजदिक के पोलिस स्टेशन चलो.

ड्रायव्हर : अच्छा – तो तू पोलिस के पास जाही रहा है ?

(पिस्तुलाचे बार होतात. मोटर स्टार्ट होते.)

महेश : रतनलाल ! –

डॉक्टर : सिस्टर – प्लीज ब्रिंग हेल्प. हॉस्पिटलसमोर रक्ताच्या थारोळ्यात कारंजकर पडले आहेत ... (संगीताची वाद्यगत.) कारंजकर – कारंजकर –

महेश : डॉक्टर – मी जातो. आमच्या गँगपैकीच एकानं मला ... डॉक्टर ... अपर्णाला – विवेकला माझा निरोप द्या ... तुमचं बरोबर होतं डॉक्टर ... प्रत्येक ... गोष्टीची किंमत असते ... मला हवी होती त्या प्रत्येक गोष्टीची किंमत ... मी चुक केलीय् डॉक्टर ! (मरतो.)

# गाणे दाणापाण्याचे

(निवेदक येतो)

निवेदक : सूर छेडतो ओळखिचे पण तरिही लोभसवाणे
आणिक गातो तुमच्यासाठी तुमचे-अमुचे गाणे
एका चिमण्या घरट्यामधली ऐका एक कहाणी
चिमणा-चिमणी दोघे जेथे जमवित दाणापाणी
अजून नाही घरट्यामध्ये चिवचिव चिलापिलांची
आहे त्यावर नजर परंतु मातेच्या ममतेची

(माधवची आई निवडीत बसलेली. करपेमास्तार येतात.)

करपे : काय आई, नोकरी काय म्हणत्येय सुनेची ?

आई : बसा करपेमास्तर ! बसा. चहा ठेवते.

करपे : राहू दे एवढयात. मला घाई नाही. बसा तुम्ही.

आई तुमचे बरीक उपकार झाले हो ! पोरीला नोकरी लावून दिलीत. फार त्रास काढला हो पोरीनं नोकरी शोधण्यापायी. मला कल्पनासुद्धा नव्हती आजकाल हे एवढं कठिण झालं असेल याची. आमच्या वेळी म्हणजे मुलगी फायनल असली न् जरा चुणचुणीत असली की मास्तरणीची नोकरी चालत यायची.

करपे · (हसून) माधवच्या आई, आता काय राहिलंय तुमच्या वेळचं ? नशीब, सुनेला नोकरी लावली म्हणून मला शिव्या दिल्या नाहीत !

आई : शिव्या बरी देईन ?

करपे नाही – म्हणजे तुम्ही म्हणणार, सुनेला नोकरी लावून दिलीत – आता घरातलं सगळं काम पडलं माझ्यावर ! निवडणं-टिपणं करायलासुद्धा सून घरात नाही.

आई : तुम्ही काय मास्तर, भांडणं लावायला आलाय आम्हा दोघींच्यात ? (करपे हसतात.) तरी बरं, मीच हट्ट धरला तिच्या नोकरीसाठी! त्यातनं माझी सून कामाला डरत नाही हो! रात्रीचं जेवण तीच करते, इतकी थकून आल्यानंतरसुद्धा! किती सांगितलं, पण ऐकत नाही! मग मीसुद्धा जास्तीच्या पोळ्याबिळ्या सकाळीच करून ठेवते. म्हणजे भात टाकला की होतं काम!

(मीना येते.)

आई : आलीस ? बसा मास्तर. चहा ठेवते. सगळ्यांनाच होईल.

मीना : तुम्ही बसा आई. मी आणते चहा.

आई : अग, तू घे हातपाय धुऊन. साडीबिडी बदल. तोवर होईल चहा.

(जाते.)

मीना : करपेमास्तर, कुठली माझी पुण्याई म्हणून मला अशी सासू मिळालीय!

करपे : म्हंजे मी लग्न जमवलं त्याचं क्रेडिट काहीच नाही वाटतं ?

मीना : तुमचे उपकार तर या जन्मात फिटायचे नाहीत मास्तर! तुम्ही होता म्हणून आज मी सुखात आहे. नाहीतर ऐकते ना ऑफिसात एकेकीचं!

(तिघीजणी येतात. दुपारचे जेवणाचे डबे खात बसतात. करपे गेलेले )

पहिली · केव्हा सोडीन अस्सं झालंय ही जळ्ळी नोकरी!
उजाडायच्या आधी उठते
पाणी भरते, केर काढते
जेवण रांधून, झाकपाक करते
कश्शीबश्शी लोकल गाठते
संध्याकाळी गेल्यानंतर
कामं आहेतच समोर हजर
त्यातून यांचा स्वभाव हौशी
रात्री सुटका होईल कैशी

(तिघीही हसतात.)

माझ्या भाळी लिहिलीय अशी कायम सक्तमजुरी
केव्हा सोडीन अस्सं झालंय ही जळ्ळी नोकरी!

दुसरी छोकरा माझा जातो शाळेत
शिकतो आता वरच्या यत्तेत
त्याचा अभ्यास मागं पडतोय
संगतीपायी फुक्कट जातोय
घोर लागला, कुणाबरोबर फिरते माझी छोकरी
केव्हा सोडीन अस्सं झालंय ही जळ्ळी नोकरी

तिसरी सासू म्हणते झालं वय

घरची काय ती बघावी सोय
सगळी कामं तूच कर
मी आहे का तुझी चाकर
उकिरड्याची कळा घराला आली आहे खरी
केव्हा सोडीन अस्सं झालंय ही जळ्ळी नोकरी !

मीना खरंच ग बाई फार त्रास पडतो तुम्हा सगळ्यांना मला तसं काही नाही कारण आईपेक्षा अधिक करणारी सासू आहे. आणि अजून तरी मुलाबाळांचा त्रास नाही. पुढं कठिण झालं की सोडीनदेखील नोकरी !

(तिघीही हसतात.)

पहिली : नाही ग बाई ! एकदा नोकरी करायला लागलं की पुढं ती कधीच सोडता येत नाही.

दुसरी : सिंदबादच्या म्हाताऱ्यासारखी नोकरी आपल्या मानगुटीलाच बसते. आणि मग पुढं या मगरमिठीचीच सवय होते.

तिसरी अडचणीतून नोकरी करतो पैशासाठी. पुढं पैसा असला तरी वाटतं, इतक्या अडचणीतून निभावलं; आता कशाला नोकरी सोडा ?

तिघी उतू नको मातू नको
घेतला वसा टाकू नको
महिन्याकाठी पैसा देते
अश्शी नोकरी सोडू नको
आज ना उद्या सोडीन म्हणता सरली उमर सारी
केव्हा सोडीन अस्सं झालंय ही जळ्ळी नोकरी !

मीना खरंय तुमचं ! मी आत्ताच लागल्येय नोकरीला. पण विचार केला की वाटतं, आपण चूक तर केली नाही ना ? संसार सुखाचा व्हावा म्हणून नोकरी करायची. पण आमची दोघांची भेट होणार रात्री. तेव्हा सुखाचे चार शब्द बोलण्याइतकीसुद्धा शक्ती राहिलेली नसते. अलिकडे तर मला इतकं थकल्यासारखं होतं –

पहिली : कानविंदे, अग काय झालं ?

मीना मला . जरा चक्कर आल्यासारखं .

(खाली कोसळते. त्या तिघीही तिला वारा घालतात, पाणी देतात. शुद्धीवर आणण्याचे प्रयत्न करतात. ती हळूहळू उठून बसते.)

पहिली : बरं वाटलं ?

मीना हूं.

पहिली घरी जातेस ?

मीना नको.

दुसरी मी येते हवं तर सोबत. तेवढंच मला लौकर जायला निमित्त !

मीना : नको. चक्कर आल्याचं कळलं तर सासूबाई घाबरतील मला बरं वाटतंय आता. जाईन मी रोजच्यासारखीच

(त्या जातात. माधव येतो.)

माधव : असं पुन्हा कधी करू नकोस. चक्कर आली तर घरी निघून यायचं कुणाची तरी सोबत घेऊन. निदान मला फोन तरी करायचास.

मीना : आणि तुम्ही धावत माझ्या ऑफिसात आला असता ! म्हणजे उद्या सगळयाजणींनी चिडवून खाल्लं असतं मला !

माधव : त्यांचं काय जातंय चिडवायला ? बायकोच्या तब्येतीची काळजी नवऱ्यानं घ्यायची नाही तर कुणी ?

मीना : (हसत) अहो, त्यांनाही नवरे आहेत !

(दोघे फिरतफिरत येऊन वाळूत बसलेली.)

माधव : खरंच मीना, अलिकडे मला तुझी काळजीच वाटायला लागलीय. किती फिकुटल्यासारखी दिसतेस ! शरीर हाडकत चाललंय. तुला झेपत नसेल तर सोड बरं ती नोकरी !

मीना : परवाच म्हणत होती की सगळी देणी देऊन व्हायला अजून सहा महिने तरी लागतील !

माधव : तू मला काय निर्दय राक्षस समजलीस ? घरात पैसा यावा म्हणून तुझा बळी देऊन मी –

मीना : इतकं काही अगदी नाटकातल्यासारखं बोलायला नको. घर माझं सुद्धा आहे. देणी आहेत ती तुम्हाला एकटयालाच नाही ! आपल्याला दोघांनाही !

माधव : अग, पण आजारी पडलीस तर सोडावीच लागेल ना नोकरी ? तितकी वेळ येण्याच्या आधीच सोडलीस तर ? तू नको करूस पैशाची काळजी. मी बघेन कुठं पार्ट-टाइम बिझनेस सुरू करता येतो का ते.

मीना : खरं सांगू ? मला काळजी तब्येतीची वाटत नाहीयै. दुसरीच वाटत्येय.

माधव : म्हणजे ?

मीना : आपण काय ठरवलं होतं ? अजून सगळं नीट लागेपर्यंत दोनतीन वर्षं तरी मूल नको असं –

माधव : बाप रे !

मीना : तसलं काही असलं म्हणजे ?

माधव : पण आपण काळजी घेतोय ना ?

मीना : एखादवेळी काहीतरी चूक झाली असेल.

माधव : उद्या डॉक्टरकडे जाऊ या आपण.

मीना : एवढे घाबरून काय गेलात एकदम ? मी आपली नुसती शक्यता सांगितली.

माधव : नाही – घाबरून नाही गेलो –

मीना : मग शांत रहा पाहू. उद्याची काळजी उद्या !

माधव : पण अजून आपलं सगळं ठाकठीक लागायचंय.

मीना : आत्ता कुठे रात्र झाली – जागा अजून किनारा
नको एवढयात चंद्रा उगवू रे – थांब जरा

कसा खेळशील खेळ वाळूसंगे तापलेल्या
झुलताना वाऱ्यामध्ये – नुकत्या नारळी झोपल्या
किरणांचे शीतल हात गळयात टाकून त्यांना
नको उठवू रे बाळा आपसूक जागू दे ना
मग दाखव मुखडा लख्ख साजरा लाजरा
नको एवढयात चंद्रा उगवू रे – थांब जरा

रात्र अजुन बाळा थोडी रंगू दे रंगू दे
शांत सागराची नीज पुरती होऊ दे
सूर शांतीचा घुमू दे निळया धुंद वातावरणी
मग दुड-दुड येई धावत तू नभांगणी
तोवरी रे माझ्या राजा थोडा तरी धरी धीरा
नको एवढयात चंद्रा उगवू रे – थांब जरा

(मीना, माधव, लता जेवायला बसलेली. आई वाढते आहे.)

आई अशी मुक्यानं का जेवताय तिघंही ? मग मी बोलले की मला म्हणता 'बडबडी'.

लता मी सांगू आई, वहिनी का बोलत नाही ते ?

माधव लता !

लता किनई, वहिनीची तब्येत ठीक नाही.

माधव : लता, तू जा बरं जेवण झालं असलं तर !

लता : नाही झालेलं. मी अजून एक पोळी खाणारेय !

आई · खरं का ग, तब्येत बरी नाही ?

मीना बरी आहे की !

आई नसली तर वेळीच डॉक्टरकडे तरी जाऊन या.

लता गेली होती आज दोघं.

आई : मग ? डॉक्टर काय म्हणाला ?

(पलिकडे डॉक्टर)

डॉक्टर : कॉंग्रेच्युलेशन्स मिस्टर कानविंदे ! आता तुम्ही बाबा होणार आहात !

माधव : (गोंधळून) नक्की ?

आई काय म्हणाला ?

माधव : काही नाही. मटकी वाढ.

आई तू नाही ! डॉक्टर काय म्हणाला ?

डॉक्टर : (पलिकडूनच) आत्तापासून तब्येतीची मात्र काळजी घ्यायला हवी हं ! म्हणजे काय आहे की, यांना ॲनिमिक टेंडन्सी आहे !

आई · फार थकते ही अलिकडे. माझं मत विचारशील ना माधव, तर हिला नोकरी अजिबात झेपत नाही.

डॉक्टर : कसल्याही प्रकारचे श्रम यांनी घेता कामा नयेत.

लता : म्हणून बोलत नाही बरं का आई वहिनी ! बोलण्याचेदेखील श्रम होतात.

डॉक्टर : या नोकरी करतात का ?

आई . ते काही नाही ! उद्यापासनं संध्याकाळचा स्वैंपाक मी करीन. तू झोपून रहा ऑफिसातून आल्यावर. नाहीतर लोक म्हणतील, सासू सुनेला राबवते. तो मेला हापिसातला साहेब राबवतो असं कुणी म्हणायचे नाहीत.

डॉक्टर : ओ आय् सी. पण यांना या परिस्थितीत नोकरीदेखील करू देणं धोक्याचं आहे.

माधव (आईला) तशी नंतर रजा घ्यायचीच आहे नोकरीवरनं.

डॉक्टर ती वेगळी. आय ॲम नॉट टॉकिंग अबाउट मॅटर्निटी लीव्ह. यांनी अगदी उद्यापासून रजेवर जायला हवं.

आई एवढं आहे तर उद्यापासूनच राहू दे हिला घरी.

माधव अशी उद्यापासून रजा कोण देणारेय आई तिला ? आत्ताआत्ता तर नोकरी लागली !

डॉक्टर परिणामांविषयी मला काही सांगता येत नाही. त्यातून पहिलीच खेप आहे. वीकनेसही भलताच आहे. काळजी घ्यायला हवी !

मीना : मी काळजी घेईन आई. तुम्ही नका चिंता करू. हवं तर घरातलं कामसुद्धा बसूनबसून होईल तेवढंच करीन. मग तर झालं ? तुम्ही अगदी काही वाटून घेऊ नका !

(हात धुवायला जाते.)

आई : बघ रे बाबा ! कसलं टॉनिकबिनिक असलं तर घेऊन ये. त्या गोळ्या पण असतात ना शक्तीच्या, त्या आण. यासाठी या सुना नको होतात. लोकाची पोर आणायची, आणि आपल्या जिवाला घोर व्हायचा !

मीना (हात धुताधुता तिला चक्कर येते. ती कशीबशी हाक मारते.) लता ! (पडते. लता धावत जाते. तिच्यापाठोपाठ आई आणि माधव.)

(क्षणभर काळोख. मग माधव एकटाच उभा दिसतो.)

माधव : आज ना उद्या – याची चर्चा होणार
ऑफिसात रस्त्यात जो तो बोलणार
आता हे टळत नाही – आता हे टळत नाही
टाळायाचे कसे तेसुद्धा कळत नाही.

(माधवचा मूड भलताच विषण्ण. रात्री एकटाच, जीव द्यायला निघालेल्या हिंदी सिनेमातल्या नायकासारखा. प्रकाशयोजनाही तशीच – गूढ, सिनिस्टर. मारेकरी हळूहळू जमा व्हावेत तशी माधवच्या ऑफिसमधील माणसे जमा होतात. एकमेकांत कुजबुजतात.)

काहीजण : कानविंदेचं कळलं का ? कळलं ?

आणखी काही : काय हो ? काय एवढं घडलं ?

एकजण ऐकलं आहे की, कानविंदेच्या मिसेसना आहेत दिवस !

दुसरा : म्हणत तर होता की करतो प्लॅनिंग
झालेले दिसते ओम् फस् !

तिसरा : बाळा जराशी झालीच घाई
अजून नाही लग्नाला वर्ष झालं
म्हणाव आता करशील दुपारी
थकशील भरताना नंतर बिल

पहिला हे तरी जमतं कितीजणांना ?

दुसरा समजला बर का तुमचा टोमणा
आमचं बरं, पण तुमच्यासारखा
वर्षावर्षाला नकोच पाळणा !

काहीजण उखाळ्यापाखाळ्या विसरून भांडण
कानविंदेंचे करू अभिनंदन !

सगळे : अभिनंदन मिस्टर कानविंदे
कॉंग्रॅच्युलेशन्स अभिनंदन !

माधव यांचे अभिनंदन कसे मी घ्यावे
पोटातल्या पोटात संकटाला भ्यावे

आमच्या नशिबी नाही राहणे आनंदी
आम्ही पडलो साले कर्मदळिद्री

सगळे कॉंग्रॅच्युलेशन्स कानविंदे कॉंग्रॅच्युलेशन्स !

माधव आमच्या जिण्यातहि येतो
कधि प्रसंग हा एखादा
की आनंदाने कोणी
होऊनी जावा वेडा
आमचं परंतु तोंड
असणार आंबट कायमचं
लागणार आनंदाला
विरजणही सदा चिंतेचं
साले आम्ही कर्मदळिद्रीच !

डॉक्टर : (प्रकाशझोतात येऊन) तुम्ही चिंता करू नका. पण काय आहे की, आधी सांगितलेलं बरं असतं मिसेस कानविंद्यांची सगळी सिस्टीमच इतकी नाजुक आहे, की गर्भ वाढायला हवा असेल तर त्यांनी अजिबात श्रम करता कामा नये इतर बायकांची गोष्ट वेगळी. पण निदान यांच्या बाबतीत तरी सगळे श्रम एकदम बंद !

माधव साक्षात बाप होणार
याचा ना मोद मनाला
हो बजेट सारे अपसेट
पोटात म्हणोनी गोळा
साले आम्ही कर्मदळिद्रीच !

डॉक्टर : माझं ऐका कानविंदे, तुम्ही बायकोला नोकरीवरून चक्क वर्षभर रजा घ्यायला सांगा. ते शक्य नसलं तर नोकरी सोडायला सांगा. नाहीतर काय होईल याची गॅरंटी मला देता येणार नाही

माधव : लग्नाची देणी थकली
तेवढयात खर्च मुलाचा
त्यावती कडी कराया
विकनेस् हिचा यायाचा
साले आम्ही कर्मदळिद्रीच !

(बाकीचे गेलेले. मीना येते.)

मीना : रागावलात माझ्यावर ?

माधव : नाही. रागवेन कशाला ?

मीना : तरी पण . दोष माझाच आहे !

माधव : नाही ग. खरंच नाही. पण उगाच जीव चिडचिडल्यासारखा झालाय एवढं खरं. जाऊ दे ! यातूनही काही मार्ग निघेल !

मीना : कसला मार्ग ? वर्षभर रजा मिळणं तर शक्यच नाही. मॅटर्निटी लीव्ह लागू व्हायला अजून सहा महिने आहेत. तोवर माझ्या क्रेडिटला एक दिवससुद्धा रजा नाही.

माधव : भडकमकर काही करू शकणार नाहीत ?

मीना : नाही हो ! ते इतके चांगले आहेत ! इतकं संभाळून घेतात ! काम राहिलं तरी संध्याकाळी लौकर सोडतात. पण रजेचे नियम ते तरी कसे बदलणार ? डॉक्टरांचं ऐकायचं म्हंजे राजीनामाच द्यायला हवा !

माधव : मग ? देतेस ?

मीना : कशी देऊ ? इतक्या प्रयासांनी मिळालीय ही नोकरी ! नशीब तरी कसं बघा ! नोकरी मिळाली तर हे ! खरं तर पहिलं मूल म्हंजे किती आनंद व्हायला हवा ! पण दोन्ही आनंदाच्या गोष्टींनी जसा काही एकमेकींना छेद दिलाय !

माधव : मला एक उपाय ठाऊकाय. पण .. सांगितला तर रागावशील !

मीना : सांग तरी !

माधव : बघ हं. मग रागवायचं नाही. तसा म्हणजे माझ्या डोक्यातून नाहीच निघालेला. ऑफिसातल्या मित्रानं सांगितलाय.

(ऑफिस कंपनीपैकी एकजण येतो.)

एकजण . अच्छा ! म्हंजे यासाठी तू काळजीत आहेस तर ! छोड दो यार ! आपल्याकडे आहे उपाय !

माधव : कसला उपाय ?

एकजण : आता तुला कदाचित पटायचा नाही. कारण पहिलीच खेप. तेव्हा तू भलताच हळवेपणा करशील –

माधव : आता सांगतोस की नाही ?

एकजण . हे बघ, सध्या वहिनींची परिस्थिती नाही ना नोकरी आणि गर्भारपण दोन्ही तोलण्याची ? मग तू सरळ ॲबॉर्शन का नाही करून घेत त्यांचं ?

माधव काय म्हणालास ?

एकजण   मला वाटलंच, तू दचकणार म्हणून! शब्द थोडासा भयंकर वाटतो. पण अरे, सुरुवातीच्या स्टेजला इतकं काही कठिण नसतं ते!

माधव :   असं म्हणतोस ?

एकजण   तू वहिनींची समजूत काढ. तात्पुरत संकट आलंय; ते सहत निभावून जाईल. पुढं पैशाची परिस्थिती जरा स्थिरस्थावर झाली, वहिनींची तब्येत जरा बरी झाली, की मग होतीलच की मुलं!

माधव :   तिला ... सांगून पहातो मी.

एकजण :   वहिनी समंजस आहेत. त्यांना नक्की पटेल.

माधव :   म्हणा अजून कुणाला फारसं माहीत नाही. घरातदेखील सांगितलेलं नाही आम्ही. पण कठिण वाटतं रे!

एकजण :   काही कठिण नाही! भरवशाचा डॉक्टर सांगतो. चापनेरकर म्हणून आहे! अरे रीघ असते त्याच्याकडे! याच विषयात एक्स्पर्ट म्हणून ख्याती आहे त्याची. मी चिठी देतो हवं तर.

(एकजण गेलेला. माधव मीनाला चिठी दाखवतो.)

माधव :   ही चिठी आणलीय चापनेरकरांसाठी. जायचं त्यांच्याकडे ?

मीना :   दुसरा मार्गच नसेल तर –

माधव :   नोकरी सोडणं हा एक मार्ग आहे.

मीना :   ते शक्यच नाही! हा चापनेरकर ... भरवशाचा आहे ना ?

माधव :   त्याची काळजीच नको! फार प्रख्यात आहे तो!

मीना :   (जिवावर येऊन) तुम्हाला काय वाटतं ? तुम्ही सांगाल ते ऐकेन मी.

माधव :   मी खूप विचार केला. वाटतं, हाच सगळ्यात सोपा मार्ग आहे!

मीना :   मग माझी तयारी आहे. जाऊ या चापनेरकरांकडे.

माधव :   शाब्बास!

मीना :   पण ... पण ते काय असेल हो ? मुलगा ? की मुलगी ?

माधव .   आता एकदा ठरवलंयस ना तू ? मग हवेत कशाला हे विचार ?

मीना :   बरोबर आहे तुमचं. आता आपण ... तो विचारदेखील डोक्यातनं काढून टाकायला हवा!

शांत निळे होते नभ व्याकळून गेले
कुठं शोधू चंद्रा मेघ दाटुनिया आले

एकएकलासा भासे सुना हा किनारा
नारळीवनी सुस्कारे उदासला वारा
अंधारली हळवी रात्र सागरास बोले
माझ्या बाळचंद्राला का कुणी रागावले

दिशादिशांत काहूर चितेचे वाढले
कुठं शोधू चंद्रा मेघ दाटुनिया आले

(ती दोघे जातात. आई आणि लता.)

लता (कावरीबावरी) आई!

आई : काय झालं ग ?

लता : आई, मला भीती वाटते ग!

आई : असं काय करतेस लता ? अग कसली भीती ? बोल ना! (लता रडू लागते.) रडू नकोस. सांग मला काय झालं ते.

लता : आई, वहिनीची तब्येत हल्ली ठीक नसते.

आई : म्हणजे – तसलं काही आहे की काय ? (लता मान डोलवते.) अग पण त्या दिवशी म्हणत होती की अजून तीन वर्षं तरी मूल व्हायचं नाही. माधवदेखील म्हणाला –

लता : व्हायचं नाही म्हणजे (एकदम हुंदका देऊन) आता व्हायचं नाहीच!

आई · म्हणजे ग काय ?

लता . आमच्या वर्गातली दळवी रहाते ना, तिच्यासमोर एक डॉक्टर आहेत आई. चापनेरकर का कायतरी असं नाव आहे त्यांचं. तर ते ... ते मूल नको असलं तर (हुंदका येतो.)

आई : काय सांगतेस काय ?

लता : होय आई! दळवी सांगत होती की, काल दादाला न् वहिनींना तिनं बघितलं त्या डॉक्टरकडे.

आई . खरं म्हणतेस ?

लता हो ती ओळखते त्यांना लग्नात आली होती ती.

आई मला नव्हती कल्पना ही दोघं असं काही ... दिसतात साधी .. पण खरं नाही ग वाटत आता येऊ देत दोघं . की विचारते

(मीना आणि माधव येतात.)

आई (ओरडून) दारात थांबा! आत येऊ नका!

माधव काय झालं आई ?

आई : घरात पाऊल टाकू नका!

माधव : अग पण आई

आई बाहेरच्या बाहेर जा दोघं – अन् रहा कुठं ती! मी आणि लता जातो, नि मग या,ह्या घरात परत!

माधव पण आई, झालं काय ते सांगशील ?

आई माणसं हवीयत कुठं तुम्हाला ? उद्या आमच्यावर खर्च होतो म्हणून आमचा खून करायला मागंपुढं पहाणार नाही तुम्ही!

मीना (अजीजीने) आई, आत येऊ द्या ना. चाळीची वस्ती लोकं बघायला लागलीयत.

आई या. (ती दोघं आत येतात.) पण मी मात्र आता तुमच्यासारख्या खुनी माणसांबरोबर इथं राहून पाणीसुद्धा प्यायची नाही!

माधव : पण आई, नीट काय ते सांगशील ? कुणी खून केला ? कुणाचा ?

आई तुम्ही दोघं त्या अजून जन्माला न आलेल्या पोराचा प्राण घेताय! स्वतःच्या पोराचा! राक्षस – राक्षस आहात तुम्ही दोघं! तुम्हाला वाटलं

की, लपवून ठेवलं म्हंजे मला काही कळत नाही! कशाला करताय त्या नोकऱ्या, नि कुणाच्या मढयावर घालणार आहात तो पैसा ? एका तान्ह्या बाळाचा खर्च तुम्हाला झेपत नाही! त्यासाठी तीनतीन वर्ष थांबावं वाटतं! त्या येऊ-येऊ म्हणणाऱ्या बाळाच्या नरडीला नख लावावं लागतं! अरे, आम्ही तेल आहे तर मीठ नाही न् तूप आहे तर पीठ नाही असल्या परिस्थितीत तुम्हाला वाढवलं, ते आम्हाला नसतं आलं तुम्हाला ठार मारून टाकता ? तेव्हाच केलं असतं ते तर आज हा दिवस तरी बघावा लागला नसता! आणि तू ग ? हा एक वेळ पुरुषमाणूस – याच्या मनात माया नाही! पण तू ... तू त्या पोराची आई होणार – आणि आज त्याला मारून टाकायला निघालीस ?

माधव . पैशासाठी नाही करीत आम्ही हे आई. पण हिला नोकरी संभाळून मुलाला –

आई : बाकीच्या बायका नोकऱ्या संभाळूनच वाढवतात ना मुलांना ? की सगळयांनी आपली मुलं मारून टाकली ? आणि हिला कशाला संभाळावं लागणाराय मूल ? मी आहे ना एवढी धडधाकट ! एक मूल संभाळायला होत नसेल तर माझा मेलीचा उपयोगच काय आहे ? पण तुम्ही जर कुणाला काही न विचारता, न सांगता –

माधव तसं नाहीयै आई. हिला डॉक्टरांनी सांगितलंय की, मूल व्हायला हवं असेल तर नोकरीचे श्रम झेपायचे नाहीत.

आई : म्हणून तुम्ही मुलाच्या जिवावर उठलात! अरे, हे पाप आहे पाप! असली पापं करून कधी वंश वाढायचा नाही! मेल्यांनो, मी मनाशी हजार वेळा म्हणत्येय की, माझं नातवंड कसं असेल मी त्याला कशी न्हाऊमाखू घालीन .. कशी लाडानं वाढवीन कसं मोठं करीन . आणि तुम्ही माझ्या नकळत . माझी सगळी स्वप्नं . मातीत गाडायला निघालात! (ओक्साबोक्शी रडू लागते.)

मीना (स्वतःचं रडू आवरून) रडू नका आई! आमचं चुकलं! आम्ही विचार केला तो फक्त आमचा. तुमचाही करायला हवा होता. पण तुमच्याआमच्या मनासारखंच होईल आई. डॉक्टरांनी उद्या बोलावलं होतं. उद्याच काय तो निकाल लागायचा होता. पण आम्ही जाणार नाही!

शांत व्हा आई. माझं चुकलं! आई होणार असून मी विचार केला नाही आईसारखा.

आई (हसतरडत) तू काही काळजी करू नकोस बघ मीना. सगळं ठीक होईल! मी आहे ना! चांगले तुला अळिवाचे लाडू करून घालते बघ! काही घाबरू नकोस बाळंतपणाला. असली खूप बाळंतपणं पाहृयलीत मी. मग तो डागदर काहीही सांगू दे!

मीना . खरंच आई! तुम्ही बोललात नि हायसं वाटलं. मीदेखील वागत होते ते मनाविरुद्धच! आता एकदम उजाडल्यासारखं वाटतंय!

(निवेदक येतो )

निवेदक : खरं तर सगळं जैसे थे होतं. आणि होतं तसंच दुसऱ्या दिवसापासून चालू राहिलं. माधव-मीनानं ॲबॉर्शन न करण्याचा निर्णय घेतला. आता या निर्णयांन काही अडचणी संपल्या असं झालं नाही. त्या होत्या तशाच राहिल्या. पण आपण काहीतरी एक निर्णय घेतला असं उगाचच वाटलं.

अजून तरी प्रश्न कुठलाच नव्हता सुटलेला
तरी त्यांचा जीव जरा सुखावून गेला.
केवढा असतो मनावरती अडचणीचा भार
वाटतं केव्हा एकदा होईल मार्गातून दूर
बरेच दिवस अडचण तशीच; आपणही तिथेच
मग सवय होते, वाटते, तिने असावेच!
अडथळाच मग होतो रस्ता, वाटत नाही त्रास
नाहीतरी करायचा असतो कुणा प्रवास ?
अधिक यत्न कशासाठी ? राहू जमेल तशात
आपण मधली माणसं सदा फिरू वर्तुळात!

(निवेदक जातो. मीनाच्या ऑफिसातल्या मुली येऊन मीनाला घेरतात.)

पहिली : कानविंदे, अग कळलं म्हटलं!
दुसरी : असं काय लपून थोडंच रहातं ?
तिसरी : सांगितलं नाही म्हणून कळणार का नाही ?

(मीना सुखावलेली. चेहेरा आनंदाने फुललेला.)

सगळ्या सांग! आता सांग सांग! तुझ्याच तोंडानं सांगून टाक!
मीना : नको बाई! मला लाज वाटते!
सगळ्या : सांग कशानं रूपडं हे गोजिरवाणं खुललं ?
मीना चंद्र यायचा आभाळी त्याचं चांदणं सांडलं
साऱ्या पूर्वदिशेवर पाणी तेजाचं चढलं
सगळ्या : (भोवती फेर धरून)
पहिल्या मासी मासुळा – नारीचा रंग पिवळा
पिंड घडवतो सावळा – जू बाळा जू जू
मीना : गेलं भरून आभाळ वर्खानं ग या चंदेरी
ढगाढगांना लाभल्या आणि रुपेरी किनारी
सगळ्या . दुसऱ्या मासी पदर बंद – हिरव्या चोळीवरती चांद
आईबापाला अत्यानंद – जू बाळा जू जू
मीना पाणी सागराचं झालं त्याला भेटाया आतुर
लाटा उसळल्या आला त्याच्या मायेलागी पूर
सगळ्या : चवथ्या मासी कुसवा चढं – अन्नपाणी लागंना गोड
पिकल्या पानाचं बांधावं विडं – जू बाळा जू जू
मीना झाल्या नारळी सावध सज्ज त्याच्या स्वागताला
त्याच्या वाटेकडे लागे साऱ्या किनाऱ्याचा डोळा

ळया   सहाव्या मासी सायास करती – चोळी पातळ इच्छापुरती
पोटी पुत्र ती मागून घेती – जू बाळा जू जू
ना :   रात्र म्हणे उरात या नक्षत्रदिवे लागले
कधी येशील रे चंद्रा डोळे वाटुली बनले
गळया   ओटी भरा ग ओटी भरा – तिची ओटी भरा
फुलांचा सारा शृंगार करा
वाट्या खिरीनं दोन्ही भरा
एकीत अंगठी एकीत रुपया
मुलगा की मुलगी हे विचारा

म. वं. ग्रं. सार्व. वाचनालय ठा
ना. क्र. २३०२२ नों दि २५/५
वि. ७११.९३ क्र. ........

(सगळया हसतात )

झोक्यावरचं ? मग नावेमधलं ?
तळयाकाठचं, की बागेतलं ?
नको ? बरं मग हॉपिसातलं ?
साहेबाच्या खुर्चीला मखर करा
बढतीची इच्छा पुरी करा
मुलगा झाला तर होईल कलेक्टर
मुलगी झाली तर श्रीमंत सासर
इच्छा तिची सारी पुरी करा
ओटी भरा ग ओटी भरा
खणानारळानं ओटी भरा
हळदीकुंकवानं ओटी भरा
पिवळया हळदीनं ओटी भरा
तांबडया कुंकवानं ओटी भरा
लाल लाल कुंकवानं ओटी भरा
लाल लाल कुंकवानं ओटी भरा

(सगळीकडे तांबडालाल प्रकाश पसरलेला. ओटी भरण्याचा कार्यक्रम भयानक होत गेलेला मुलींचा फेर थांबतो, तेव्हा मध्यभागी अस्तावस्त पडलेली मीना.)

(दुसरीकडे माधवला ऑफिसातले त्याचे मित्र गाठतात )

पहिला .   कानविंदे, समजलं बरं का ?
दुसरा   कानविंदे, सेलिब्रेशन हवं !
तिसरा :   कानविंदे, तारीख कधीची ?
दुसरा :   कानविंदे, पेढे नंतर. पण आज मिसळ तर मागवाल ?
शिपाई :   खरंच कानविंदे, सांगासची का मिसळ ? पाच सांगतो.
माधव   सांग. (शिपाई उत्साहाने मिसळ सांगायला जातो. फोन वाजतो पहिला फोन घेतो. दुसरीकडे मीनाची मैत्रीण बोलते.)
मैत्रीण :   हॅलो ! कानविंदे आहेत का ?

पहिला : प्लीज होल्ड ऑन. – कानविंदे, फोन आहे! गोड आवाजातला आहे. लकी आहात बुवा!

माधव : (फोन घेऊन) हॅलो! मी कानविंदे बोलतोय.

मैत्रीण : हॅलो! मीनाची तब्येत भयंकर बिघडलीय! आय ॲम अफ्रेड ,समथिंग टेरिबल हॅज हॅपन्ड! आम्ही डॉक्टरना बोलावलंय. तुम्ही लगेच निघून या!

माधव : ओः गॉड! आलोच मी! (फोन ठेवतो. मित्रांना) मी मिसेसच्या ऑफिसात जाऊन येतो. साहेबांना सांगा, तासाभरात येतो.

(निघतो. एवढयात दारात शिपाई मिसळवाल्या पोऱ्याला घेऊन येतो.)

शिपाई : साहेब, चालला कुठं ?

माधव : जाणाऱ्याला कुठं म्हणून विचारू नये.

शिपाई : पण साहेब, मिसळ तरी खाऊन जा.

माधव : नको मला. तुम्हीच घ्या खाऊन ... माझ्या नावावर मांडायला सांगा. (जातो.)

(धावतच येणाऱ्या माधवला डॉक्टर भेटलेले.)

डॉक्टर : आय ॲम सॉरी टु टेल यू मिस्टर कानविंदे, शी हॅज लॉस्ट द चाइल्ड. मूल तर गेलंच; पण मिसेस कानविंद्यांची तब्येतही चिंताजनक आहे.

माधव : डॉक्टर!

डॉक्टर : मी आधीच सांगितलं होतं तुम्हाला. त्यांना संपूर्ण विश्रांतीची गरज होती. त्याशिवाय गर्भ जीव धरूच शकणार नव्हता. पण तुम्ही माझं ऐकलं नाही. मिसेस कानविंदे नोकरीवर जातच राहिल्या. मग दुसरं काय होणार ?

माधव : सॉरी डॉक्टर. पण कसंही करून .. मीनाला वाचवा!

डॉक्टर : त्याच्यासाठीच धडपड चाललीय. पण माझ्या हातात फारसं काही नाही.

(मीनाच्या बिछान्याशी माधव, शिरधनकर, करपे आणि मीनाची एक मैत्रीण अशी मंडळी उभी. मीनाला सलाइन दिले जात आहे. कोणीही बोलत नाही. फक्त घडयाळाची टिकटिक ऐकू येते.

मग एकदम दुसऱ्या बाजूला माधवच्या आईचा हंबरडा. तिचे सांत्वन करणारी लता.)

आई : परमेश्वरा, वाचव रे बाबा पोरीला! हवं तर मला म्हातारीला घेऊन जा. खूप पाहिले जगातले सोहाळे! आता काही इच्छा राहिली नाही तिचं अजून सगळं व्हायचंय. तिला वाचव रे बाबा. मल्हारी, पोरीला वाचव! गावी येऊन जोडीनं पूजा बांधतील तुझी! (करपे येतात.) मास्तर, बघा हो काय झालं ते! डॉक्टर म्हणतात, पोरीची आशा नाही. जळ्ळी मेली ती नोकरी! या नोकरीपायी पोरीचे माझ्या हालहाल झाले! बघा हो! हे झालं तेदेखील तिथंच! बाहेर दहा लोकांमध्ये! तिथनंच हॉस्पिटलमधे

पोचवली. मला बघताही येत नाही. सगळे म्हणतात, तू तिथं तमाशा करशील म्हणून येऊ नकोस हॉस्पिटलात. (शिरधनकर येतात.) शिरधनकर, तुम्ही म्हणाला, आम्ही पोरीला कामाला जुंपली. तिचे हाल केले! म्हणा! तुम्हाला अधिकार आहेच म्हणायचा! आम्ही हट्ट धरला नोकरीचा! पण खरं सांगते शिरधनकर, गणपतीची शप्पथ! पण यातनं एकदा निभावली ना पोर, की सांगणाराय तिला, बस्स झाली तुझी नोकरी! स्वतःची तब्येत संभाळलीस म्हंजे खूप झालं!

शिरधनकर : शांत व्हा आई! किती त्रास करून घेता स्वतःला ?

(प्रकाशझोत पुन्हा दुसऱ्या बाजूला. मीनाच्या उशाशी बसलेला माधव.)

माधव : मीना .. मी आहे ... माधव ..

मीना : (संपूर्णपणे भ्रमात) कोण आहे ? चिरपुटकर ? सासूबाईंनी की नाही घरच्या तुपाची बरणी ठेवलीय फडताळात. रोज घरचं तूप वाढतात मला एकटीला. लतावन्सं, तुमचं लग्न आपण खूप थाटात करू. वरातसुद्धा काढू. झालंच तर जुन्या फॅशनचे बाजूबंद असतात ना ... मला खूप आवडायचे .. तसले करू ...

माधव : मीना ... मीना ... मला ओळखलंस ?

मीना : मामा, परतपरत काय रे हाका मारतोस ? मी नाही यायची माहेरी परत. माझी सगळी मायेची माणसं इथंच आहेत. या ऑफिसात. कितीतरी मुलींच्या डब्यात कोबीची भाजी असते. आणि कोबी तरी स्वस्त मिळतो का या दिवसांत ?

माधव : मीना, जरा गप्प पडून रहा.

मीना : पाणी ... पाणी . . (माधव तिला पाणी देतो. ती एकदम घाबरल्यासारखी होते.) माधव – माधव, मला भीती वाटते! ते लोक ओढून नेताहेत त्याला. मारताहेत फटक्यांनी! . . रक्ताची चिळकांडी उडाली! माधव, रक्त! रक्तच रक्त! मला भीती वाटते. कुणीतरी खोलखोल ढकलतंय ... अहो! तुम्ही कुठं आहात ? मला धरून ठेवा ना! (किंचित शुद्धीवर येत) आता बर वाटलं! अहो, तुम्ही आहात ना ? जाऊ नका हं मला सोडून.

माधव : नाही मीना. मी कुठं जात नाही तुला सोडून.

मीना : खूप मोठं वादळ झालं हो! . वाळूच वाळू उडाली! नारळीची झाडं गदगदा हलली. आणि चंद्र एकदम मावळला हो! चंद्र एकदम मावळला! (रडू लागते.)

माधव : मीना – मीना, मला सोडून जाऊ नकोस. मीना, तू मला हवीयस मीना!

(निवेदक येतो.)

निवेदक : डॉक्टरांना पाच टक्केसुद्धा आशा वाटत नव्हती. आई देवाला साकडं घालूनघालून थकल्या. लताचे डोळे रडरडून सुजले. बापडया माधवला

तर काही सुचतच नव्हतं. आईचं न ऐकता तेव्हाच नीट ॲबॉर्शन करून घेतलं असतं तर ? . किंवा डॉक्टरांचं ऐकून मीनाला रजा घ्यायला लावली असती तर ? . . आपलं कुठं चुकलं हेच त्याला कळत नव्हतं. म्हणा आता चूक कुणाची हे ठरवण्यात काय अर्थ होता ? प्रसंग तर कठिण येऊन ठेपला होता!

(डॉक्टर येतात.)

डॉक्टर (निवेदकाच्या खांद्यावर हात ठेवून) डोन्ट वरी! प्रसंग टळला. ती आता शुद्धीवर आलीय.

निवेदक · तुमचे उपकार आहेत डॉक्टर.

डॉक्टर : आमचे कसले उपकार ? त्या पोरीचीच जगण्याची जिद्द चिवट! शरीर झगडत राहिलं मरणाशी. शेवटी जिंकलं! आता भराभर रिकव्हर होईल पहाल तुम्ही!

(माधव येतो निवेदक गेलेला.)

माधव : डॉक्टर, तुमचे आभार कसे मानायचे तेच कळत नाही

डॉक्टर मिस्टर कानविंदे, अजून मी सांगतो ते ऐका. आता मागल्या वेळेसारखी चूक पुन्हा होऊ देऊ नका. एवढयात दिवस रहाता नयेत. पण राहिलेच तर मात्र तिनं लगेच विश्रांती घ्यायला हवी. नाहीतर गर्भ तोलण्याइतकी शक्ती नाही. म्हणून तो पुन्हा असाच गळून पडेल. त्यात तिच्या जिवाला धोका आहेच. शिवाय शरीरालाही अशी सवय लागलेली चांगली नाही!

माधव : मी काळजी घेईन डॉक्टर.

डॉक्टर : यू बेटर ... ! (जातात. माधव आणि मीना )

माधव . मीना, बरं वाटतंय ?

मीना : हो.

माधव : विचार करीत बसू नकोस. विश्रांती घे

मीना आपलं बाळ ... गेलं ना हो ?

माधव : असं म्हणू नकोस मीना. अग, अजून त्याला काही आकारसुद्धा नव्हता!

मीना : नसेल. पण त्याला समजत होतं. त्याला समजलं की आपल्याला ते नको आहे.

माधव : असं काय म्हणतेस ?

मीना . नकोच होतं ते आपल्याला. म्हणून तर चापनेरकरांकडे जाणार होतो आपण. त्याला काढून टाकण्यासाठी म्हणून ते गेलं. आपणहून गेलं!

(अगदी हलकेच रडू लागते.)

माधव : असं नको बोलूस मीना. त्या वेळी आपण वेगळया कारणासाठी

मीना कारण कुठलंही असेल. पण आपण त्याच्या मरणाची इच्छा धरली म्हणून ते खरंच गेलं आपण जसं काही आपल्या इच्छेनं त्याला मरणं भाग पाडलं! आपल्या इच्छेनंच त्याचा प्राण घेतला!

माधव मी नाही त्याचा विचार करीत मीना. तू जिवंत आहेस यातच सारं भरून

पावलं ! मला दुसरं काही नको ! मला फक्त तू हवीस !

मीना : असं आपण नुसतं म्हणतो. पण प्रत्यक्षात – प्रत्यक्षात आपल्याला आणखी खूप हवं असतं, नाही का ?

(आई, लता, शिरधनकर, करपे माधवही येऊन त्यांच्यांत बसतो संथपणे येऊन मीना दुसऱ्या बाजूला बसते.)

आई : माधव, माझ्या मल्हारीनंच दाखवला हो हा दिवस ! बरं का रे, हिला जरा बरं वाटलं की गावाला जा, आणि जोडीनं पाया पडा मल्हारीच्या. हिच्या आजारपणात मी बोलून चुकल्येय !

(भडकमकर येतात.)

भडकमकर: (दारातूनच) काय मिसेस कानविंदे, बरं आहे ना आता ? फार घाबरवून सोडलं होतंत म्हणे सगळ्यांना.

मीना : बरं आहे आता. पहिल्या तारखेपासून येणारे ऑफिसला.

भडकमकर: डोन्ट वरी. तुमची रजा फुल पे होईल असं बघतोय मी.

मीना : थँक्स.

आई : साहेब, बोलले तर राग मानू नका. मी अडाणी बाई ! इतके दिवस मीच हट्ट धरला होता हिनं नोकरी करावी म्हणून. पण साहेब, आता वाटतं, हिनं सोडावी नोकरी. ज्यांना जमेल त्यांनी करावी. पण हिचं पाहिलंत ना काय झालं ? अहो, इतकं स्वतःच्या जिवाकडे न बघता कशाला करायची म्हणते ती नोकरी ?

भडकमकर: बरोबर आहे आई तुमचं. बायकांना नोकरी करायला त्रासच होतो. कुठं तब्येतीची अडचण – कुठं घराकडे बघायची पंचाईत. पण काय करायचं ? चालेल तितके दिवस चालवायच. मग अंगवळणी पडतं.

आई . मी म्हणते, चार चैनी कमी कराव्यात. थोडं अडचणीत रहावं. पण हे काय असलं उपयोगी ? उगाच जिवाला घोर ! मी सांगते तुम्हाला साहेब, मी आता हिला सांगणारेय, चांगली विश्रांती घे नि खाऊनपिऊन धट्टीकट्टी हो ! नोकरीबिकरी दे सोडून !

भडकमकर: मीनाला ... नोकरी सोडायला सांगणार ?

माधव माझी हरकत नाही तिला सोडायची असली तर.

आई : हरकत नाही म्हणजे ? तू लावच तिला सोडायला.

लता : वहिनी, नोकरी करीत नसतीस तर आपलं बाळ (तिच्याने बोलवत नाही.)

माधव खरंच मीना ! आज ना उद्या हाही निर्णय घ्यायलाच हवा.

(काही क्षण शांतता. मग –)

मीना मी मी घेतलाय निर्णय. मी नोकरी सोडणार नाही कुठल्याही परिस्थितीत. आई, माझ्या घराकडे बघायला तुम्ही आहात. ऑफिसात भडकमकरांसारखा समजुतदार बॉस आहे. ज्या मुलींना यातलं कुठलंच सुख नसतं त्याही जिवापाड खपून नोकरी टिकवतात. मग मलाच ते का

नाही जमणार ? नुसत्या चैनीसाठी नाही म्हणत मी आई. पण खरंच, अजून खूप करायचंय घराचं. लतावन्संचं लग्न होईल – त्याच्यासाठी पैसे साठवायचेत. खूप पैसे जमवू आपण – आणि खूप श्रीमंत मुलगा शोधू त्यांच्यासाठी. डॉक्टर, इंजिनीअर . चिक्कार पैसे कमावणारा ... वन्संना सुखात ठेवणारा! त्यांना कधीच नोकरी करावी लागणार नाही मग! आमच्यासारखी दगदग करावी लागणार नाही. पण तेवढयासाठी तरी मला हवीच ना नोकरी करायला ?

(बाकीची मंडळी गेलेली. निवेदकाचा प्रवेश.)

निवेदक : मीनानं कुणाचं काही चालू दिलं नाही. पहिल्या तारखेला ती सरळ कामावर रुजू झाली. पूर्वीसारखीच आनंदात राहू लागली. आपल्यावर हे एवढं आभाळ कोसळलं होतं, हे कुणालाही कळू न देता.

(मीना ऑफिसला निघालेली. आई तिच्या मागून येते.)

आई : आणि डब्यात तो मेथीचा लाडू दिलाय, तो खाल्ल्याशिवाय राहू नकोस. कडू म्हणून खायची नाहीस. पण शक्ती भरायला चांगला तो!

(मीना मान डोलवून हसतहसत जाते.)

निवेदक : इतुके संकट निवारले पण कथा संपली नाही
इथे संपली तरी घरोघर फिरूनी घडतच राही

त्याचं काय आहे मंडळी,

तुमच्याअमुच्यामधेच असतो एक निखारा जळता
चूल कुणाची पेटावी यासाठी तो धगधगता
अतिक्षुद्र माणसे वाटते घराघरांतुन जगती
रणांगणे रोजची लढविण्या परी शूर ती होती
संकट येता प्राणपणाने ज्यांना ठावे लढणे
त्यांच्यासाठी गात रहावे तुमचे-अमुचे गाणे.

# चतुर-सारिकेचा वग

(राजा आणि प्रधानजी प्रवेश करतात.)

राजा : प्रधानजी, राज्याची सगळी व्यवस्था ठीक आहे ना ?

प्रधान : एकदम चोख बंदोबस्त सरकार! आपण बिलकुल काळजी करू नये. आपण राजे आणि मी प्रधान असल्यावर कारभारात ढिलाई होणार कुठून ? घाबरू नका. जनतेला दिलेली वचनं आपण पाळीत आहोत; आणि जनतेचा उठाव होण्याची काहीच शक्यता नाही.

राजा : ते जाऊ दे. सगळ्यांना पोटभर खायला मिळतंय ?

प्रधान . होय महाराज.

राजा : ल्यायला मिळतय ?

प्रधान होय महाराज.

राजा : रहायला मिळतंय ?

प्रधान : होय महाराज.

राजा : आपली प्रजा सुखी आहे ?

प्रधान बिलकुल सुखी सरकार! काळजी करण्यासारखी परिस्थिती फक्त एकोणीस महिने होती. आता सगळीकडे अवघा आनंदी आनंद! महागाई, बेकारी, झोपडपट्ट्या, काळा बाजार वगैरे चिल्लर प्रश्न सोडले तर बाकी सगळी आबादीआबाद आहे.

राजा : मग वर्तमानपत्रं आमच्याविरूद्ध का बरं लिहू लागली आहेत ?

प्रधान : त्यांच्यावरची सेन्सॉरशिप आता उठलीय सरकार. मग त्यांनी लिहू नये तर काय करावं ?

राजा : प्रजेची नीतिमत्ता कशी आहे ?

प्रधान : उत्तम! कितीही धंदेवाईक सिनेमा-नाटकं काढा, कितीही अश्लील मजकूर

छापा, आपण ती वास्तवता समजतो. त्यामुळे प्रजेची नीतिमत्ता बिघडत नाही. मध्यंतरी आपण चित्रपटातून हिंसाचाराला बंदी केली होती सरकार. पण आता असं म्हणतात की, चित्रपटातून हिंसाचार दाखवून नीतिमत्ता अजिबात बिघडत नाही. फार फार तर चित्रपट बिघडतो. तेव्हा सांगायचं तात्पर्य असं की, आपली नितिमत्ता एकदम ठणठणीत!

राजा : तुमची नीतिमत्ता मला ठाऊक आहे! इतरांविषयी बोला.

प्रधान : इतरांविषयीच बोलतोय महाराज. राजकारणातल्या लोकांच्या नीतिमत्तेविषयी कसं बोलेन ?

(महाराजांचा खास सेवक चतुर येतो.)

चतुर : महाराज, बातमी फार भयंकर आहे.

राजा : कसली ?

चतुर : या नीतिमत्तेबद्दलचीच!

प्रधान : आता आणखी कसली बातमी ?

चतुर : महाराज, बातमी अशी आहे की, राज्यातल्या स्त्रिया दिवसेंदिवस अधिकाधिक व्यभिचार करू लागल्या आहेत.

प्रधान : (चपापून) आमचा याच्याशी काही संबंध नाही सरकार. आम्ही कडकडीत ब्रह्मचारी आहोत.

राजा : तुमचा संबंध आहे असं कोण म्हणतंय ? पण चतुर, तू म्हणतोस ते खरं असेल तर मी बातमी कुणाला कळता कामा नये. तुला कुठून कळली ?

चतुर : आत्ताच दूरदर्शनवर मी संध्याकाळच्या बातम्यांमध्ये पाहिली.

राजा : हरे राम! दूरदर्शनपर्यंत पोचली ? मग सगळ्यांनाच ती ठाऊक झाली असणार! आणि तिथं व्यभिचाराचं नुसतंच वृत्त सांगितलं की छायाचित्र-देखील दाखवली ?

चतुर : छायाचित्रं दाखवली! पण ती बहुतेक काळोखातलीच असल्यामुळं नीटशी दिसली नाहीत.

प्रधान : (सुस्कारा सोडून) हे बरं झालं.

राजा : काय बरं झालं ?

प्रधान : हेच – म्हणजे छायाचित्रातले लोक ओळखू आले नाहीत हे.

राजा : पण मला समजत नाही, आपण देऊ त्याच बातम्या दूरदर्शननं सांगायच्या असं ठरलं असताना ही बातमी मधेच कशी आली ?

चतुर : मी विचारलं तर ते म्हणाले की जुनीच टेप परत लावली.

राजा : (चमकून) म्हणजे ही बातमी जुनी आहे ? आपल्या राज्यातल्या स्त्रिया व्यभिचार करतात ही ? मग अजूनपर्यंत मला कशी एखादी ... (जीभ चावून) मला कशी मिळाली नाही ? – बातमी ?

प्रधान : काही कल्पना नाही सरकार. पण हे समानतेचं युग आहे. यात काहीही होईल. पूर्वी पुरुष स्त्रियांबरोबर व्यभिचार करीत; आता बायका पुरुषां-बरोबर व्यभिचार करू लागल्या आहेत. मला विचाराल तर या दोन्हींमधे फारसा फरक नाही.

राजा : ते काही नाही. या गोष्टीचा बंदोबस्त झालाच पाहिजे!

प्रधान : बरोबर आहे महाराज. व्यभिचाराचा बंदोबस्त झालाच पाहिजे!

चतुर : बरोबर आहे. व्यभिचार झालाच पाहिजे – आपलं, बंदोबस्त झालाच पाहिजे!

राजा : मग तो आम्ही स्वतःच करायचं ठरवलंय.

चतुर : तुम्ही स्वतःच व्यभिचार करायचं ठरवलंय महाराज ?

प्रधान : हो. महाराजांनी एकदा मनात घेतलं तर त्यांना काय कठिण आहे ?

चतुर : तरी पण महाराज, एकदा राणीसाहेबांना विचारून मगच –

राजा : मूर्ख! मी कसा करीन व्यभिचार ? मी म्हटलं, मी बंदोबस्त करायचं ठरवलंय.

चतुर : तरी मला वाटलंच! तुम्हाला कसं शक्य आहे व्यभिचार करणं ?

प्रधान : (लगेच लिहून घेत) '... बंदोबस्त करण्याचे सरकारने मनावर घेतले असून येत्या पंचवार्षिक योजनेमध्ये निदान सदतीस टक्के अर्धवेळ व्यभिचारी स्त्रियांचा, आणि एकोणचाळीस पूर्णांक सात-दशांश पूर्णवेळ व्यभिचारी स्त्रियांचा बंदोबस्त होईल, असा अंदाज आहे. यांत वृद्ध पतीशी विवाह केलेल्या तरुण स्त्रियांचा समावेश नाही.'

राजा : अहो काय बडबडताय काय ?

प्रधान : 'समाचार' ला पाठवण्यासाठी वृत्त लिहितो. 'येत्या पंचवार्षिक योजनेत. .'

राजा : व्यभिचाराचा बंदोबस्त पाच वर्षांनी होऊन काय उपयोग ?

चतुर : हो, निदान पावणेपाच वर्षांत –

राजा : (ओरडून) ताबडतोब व्हायला हवा!

प्रधान : विचार करा महाराज. हा महत्त्वाचा प्रश्न आहे. तो असा घाईघाईनं सोडवून कसं चालेल ?

चतुर : हो. सगळे महत्त्वाचे प्रश्न आपण आजवर सावकाशच सोडवत आलो आहोत.

प्रधान : निदान यावर लोकसभेत उलट-सुलट चर्चा होऊ द्या, वर्तमानपत्रांतून वाद केले जाऊ द्यात, आकाशवाणीच्या महिला मंडळातून परिसंवाद होऊ द्यात. मिल मजदूर संघ आणि नाट्यपरिषद यांचा पाठिंबा मिळू द्या. त्याला दलित पँथरकडून मुहतोड जबाव येऊ द्यात. शिवाजी पार्कवर सभा भरू द्यात, मोर्चे येऊ द्यात, उपोषणं होऊ द्यात. दोनतीन मंत्री संशोधनासाठी परदेशी जाऊ द्यात. एवढंच नाही तर चाळ कमिट्या मीटिंगा घेऊ द्यात मगच आपण समजू की, बंदोबस्त करायची वेळ येऊन ठेपलेली आहे.

राजा : ते काही नाही! व्यभिचाराचा बंदोबस्त झालाच पाहिजे आणि तोदेखील –

चतुर : आजच्या आजच!

राजा (चमकून) आज ?

चतुर : मग ? उद्या सगळे व्यभिचारी सावध होतील. मग पकडणार कुणाला ?

आणि बंदोबस्त कुणाचा करणार ? महाराज, मी सांगतो तुम्हाला : आजची रात्र चांदणी असून व्यभिचाराला फारच नामी आहे. तुम्ही आज केल्याशिवाय राहूच नका.

राजा : छे छे ! रात्र चांदणी असो की कशीही असो, मी व्यभिचार कधीच करीत नाही.

चतुर : नाही – पण आज कराच !

राजा : (विचार करून) असं म्हणतोस ?

चतुर : हो. आज बंदोबस्त कराच व्यभिचाराचा.

राजा : हां ! असं म्हणतोस ?

प्रधान : होय महाराज. चांदणी रात्र म्हणजे व्यभिचारी लोकांना पर्वणीच ! तेव्हा आपण आज वेश्यान्तर करावं –

राजा : काय म्हणालास ? वेश्यान्तर ?

चतुर : ते नेहेमी करतात. दररोज निरनिराळी वेश्या.

प्रधान : हरामखोर ! वाटेल ते बोलतोस ? मी म्हटलं, महाराजांनी आज वेशान्तर करून रात्री राज्यात फिरावं. आणि जे कुणी व्यभिचार करताना सापडतील त्यांना कडक शिक्षा करावी.

चतुर : कडक शिक्षा करावी. जसे चोरी करणाऱ्याचे हात तोडतात, तसं व्यभिचार करणाऱ्याचं –

प्रधान : आणि अशा रीतीनं आपल्या राज्यातल्या गलिच्छ सवयींचं उच्चाटन करावं. म्हणजे पुढच्या पंचवार्षिक योजनेत –

राजा : (ओरडून) ठीक आहे. आकडे सांगू नका. आम्ही आज रात्री जातीनंच शहरात फिरतो आणि व्यभिचाऱ्यांचा बंदोबस्त करतो. मात्र हे या कानाचं त्या कानाला कळता कामा नये. नाहीतर व्यभिचारी सावध होतील.

प्रधान : जशी आज्ञा महाराज.

राजा : राणीलादेखील हे कळता कामा नये. हो ! तिच्या तोंडात तीळ भिजत नाही म्हणतात. कुठं फटकन बोलून बसायची.

चतुर : पण महाराज, राणीसाहेबांनी विचारलं की, महाराज आज झोपायला का आले नाहीत ? तर काय सांगायचं ?

राजा : तर सांग दुसरीकडे गेलेत म्हणून.

चतुर कोण दुसरी म्हणून विचारलं तर ?

राजा गाढवा, दुसरीकडे म्हणजे दुसऱ्या कामात आहेत म्हणून सांग. क्रिकेटची मॅच बघायला गेलेत म्हणून सांग.

चतुर : क्रिकेट रात्री खेळत नाहीत.

राजा मग रात्री खेळण्यासारख्या एखाद्या खेळाचं नाव सांग. – पळ ! (तो जाऊ लागतो.) आणि माझ्या वेशान्तराचे कपडे ?

चतुर कुठला वेश हवा महाराज ?

राजा अजिबात ओळखू येता कामा नये. नेहेमीपेक्षा अगदी वेगळा हवा. एखादा

बदमाष, चोर –

चतुर तो नेहेमीपेक्षा वेगळा वाटणार नाही, महाराज.

राजा रात्रपाळीचा पोलिस ?

चतुर . एका ठिकाणी झोपून रहावं लागेल. रात्रपाळीवर काम करताना पाहिलं तर संशय येईल.

राजा वार्ताहर ?

चतुर खोट्या बातम्या मिळतील.

राजा मग कुणाचा वेश घेऊ ?

चतुर . एखाद्या सज्जन साधूचा घ्या. म्हणजे नेहेमीपेक्षा वेगळे वाटाल.

राजा चालेल. साधूचे कपडे –

चतुर आज सकाळी एकजण आला होता वाड्यावर.

राजा मग त्याच्यासारखे कपडे घालतो.

चतुर : जमायचं नाही.

राजा : न जमायला काय झालं ?

चतुर साधू दिगंबर-पंथाचा होता महाराज.

राजा . मग दुसऱ्या एखाद्या साधूचा वेष आण.

चतुर : आणतो महाराज. कालच एक साधू वाड्यावर आला होता. त्याच्या अंगावर कुत्रा धावून गेला. कुत्र्यानं त्याचा वेष खेचून घेतला. तो आणतो महाराज. (जातो.)

(राजा अंगावरचे कपडे उतरू लागतो.)

प्रधान . महाराजांना बंदोबस्ताची फार घाई झालेली दिसत्येय.

राजा : शुभस्य शीघ्रम्! असं आम्ही नेहेमी म्हणतो. घाई लागली की.

(चतुर एक भगवी लंगोटी घेऊन येतो.)

चतुर : हे घ्या महाराज. या कपड्यांत तुम्हाला कुणीच ओळखणार नाही. म्हणजे राणीसाहेब सोडून!

राजा : पण हे – हे काय ? साधूचे कपडे ना आणायला गेला होतास ?

चतुर : एवढेच कपडे होते महाराज त्या वेळी साधूच्या अंगावर. कुत्रा म्हणाला, तेवढे तर तेवढेच. साधूच्या हातची लंगोटी.

प्रधान : पण कुत्र्यानं हे काढून घेतल्यावर साधू गेला कसा ?

राजा : हां! तोही एक प्रश्नच आहे.

चतुर : गेला कसा ? म्हणजे पळतच गेला असणार बहुतेक.

राजा : पण मला हे कसं चालेल ?

चतुर : न चालायला काय झालं ? फ्री साइझ आहे.

प्रधान : तसं नाही. पण महाराज जर हे घालून फिरले तर हा वग भलताच अश्लील होईल. तेव्हा त्यांना खऱ्या साधूचे कपडे आणून न देता, नाटकातल्या साधूचे आणून दे.

चतुर : हात्तेच्या! मग हे आधी का नाही सांगितलंत ? नाटकातले कपडे इथे विंगेतच आहेत. (लगेच विंगेतून आणून देतो.) हे घ्या. आता आत

जाऊन बदला. नाहीतर पहाणाऱ्याला वगात अश्लीलता दिसेल. (राजा कपडे घेऊन विंगेत जातो.)

प्रधान : काय रे, महाराजांना असं आजच्या आज बाहेर पडायला का लावलं ?

चतुर : का म्हणजे ? व्यभिचाराचा बंदोबस्त करायला.

प्रधान : मग ? तुला काय वाटतं ? करतील का ते आज बंदोबस्त ?

चतुर : थोडाफार करतील.

प्रधान : म्हणजे ?

चतुर : म्हणजे लांबलांबचा करतील. जवळजवळचा राहून जाईल.

प्रधान : काय म्हणालास ?

चतुर : म्हटलं, माणसाला नेहमी बंदोबस्त दूरचा करता येतो. जवळचा नाही.

प्रधान : म्हणजे मला नाही कळलं.

चतुर : म्हणजे कळल्यासारखं दाखवायचं नाही म्हणा की !

प्रधान : आपल्याला नाही या असल्या भानगडी समजत. आपण कडकडीत ब्रह्मचारी आहोत !

चतुर : म्हणूनच मी चांगलं ओळखतो आपल्याला. माझा पहिला मालक कडकडीत ब्रह्मचारीच होता ! रोज संध्याकाळ झाली की म्हणायचा, 'चतुर, पान घेऊन ये !'

प्रधान : मग त्यात काय झालं ?

चतुर : असंतसं पान नाही. आमच्या गाववाल्या पानवालीकडचं, मदनमस्त पान ! एकदा खाल्लं की बघायला नको ! पानवालीच्या बापाची परिस्थिती !

प्रधान : का ? तो काय करायचा ?

चतुर : स्टेशनमास्तर होता. रात्रभर गाड्यांना सिग्नल द्यायचा. तोच गुण त्याच्या पोरीच्या पानात उतरलेला. तर ते पान मी माझ्या मालकाला आणून द्यायचा ! पान खाल्लं की म्हणायचा, 'चतुर, पान आणून दिलंस. आता सुपारी दे.''

प्रधान : मग ?

चतुर : मग काय ? मी सुपारी द्यायचो. न् काय ? गावातल्या झाडून सगळ्या फुटाण्यांना सुपारी दिली होती मी.

प्रधान : मग ? आज काय विचार आहे ?

चतुर : पान आणून देऊ ?

प्रधान : पानाची गरज नाहीयै मला.

चतुर : मग सुपारी देऊ ?

प्रधान : कुणाला देशील ?

चतुर : आता तुम्ही कडकडीत ब्रह्मचारी. त्यातून एवढे राजाचे प्रमुख प्रधान. मग सुपारी तुम्हाला शोभेलशी नको ?

प्रधान : म्हणजे कुणाला ?

चतुर : बरं. बक्षिसी द्याल ती कमीत कमी तीन-आकडी पाहिजे. आणि रोख पाहिजे ! – हो ! तुमचा चेक परत आला तर पंचाईत ! कबूल ?

प्रधान : सगळं कबूल. पण कुणाला बोलावणार आहेस तू ?

चतुर . अहो महाराज जाणार ना व्यभिचाराचा बंदोबस्त करायला ? मग दुसऱ्या कुणाला सुपारी देणार मी ? राणीसाहेबांना, आणि कुणाला ?

प्रधान · (दचकून) काय म्हणालास ? राणीसाहेबांना ?

चतुर (त्याची नक्कल करीत) 'काय म्हणालास ? राणीसाहेबांना ?' एवढं जुन्या नाटकातलं ॲक्टिंग कशाला ? तुम्हीच तर कितीदा मागे लागला होता की, एकदा राणीसाहेबांना बसायला बोलाव म्हणून !

प्रधान (ओशाळून) अरे म्हणजे ते बसायला वेगळं ! ते आपलं चहा-फराळाला वगैरे ! पण म्हणजे तू खरंच (उत्साहाने) खरंच राणीसाहेबांना . (हात चोळीत)

तू म्हणजे चतुर असा आहेस ! .. (हसत) म्हणजे आज राणीसाहेब (आणखी मोठमोठ्याने हसत) अरे, पण हे कसं शक्य आहे ? (हसत सुटतो.) राणीसाहेब काय म्हणतील ?

चतुर : म्हणणार काय ? त्यांनीच तर सांगितलं की, आज काही झालं तरा प्रधानजींची भेट झालीच पाहिजे !

प्रधान (गुदगुल्या होऊन) असं म्हणाल्या राणीसरकार ?

चतुर म्हणाल्या, कित्ती छान आहेत प्रधानजी !

प्रधान (हसत) खरंच असं म्हणाल्या ?

चतुर : म्हणाल्या, त्यांच्या डाव्या गालावरचा तो तीळ – मुके घेऊन भिजवावासा वाटतो !

प्रधान : आणि महाराज म्हणाले की, राणीच्या तोंडात तीळ भिजत नाही !

चतुर मी म्हटलं, प्रधानजींचं ब्रह्मचर्य भलतंच कडक आहे !

प्रधान . हे कशाला सांगितलंस ?

चतुर तर म्हणाल्या, मी बघतेच किती कडक आहे ते !

प्रधान . वा वा ! छान छान ! आणखी काय म्हणाली – माझी राणी ?

चतुर . म्हणाली – आपलं, म्हणाल्या की, प्रधानजीना तरी त्यांच्या या म्हातारपणात कोण आहे विचारणारं ?

प्रधान : हे – हे मात्र चतुर तू पदरचं सांगतोयस हां !

चतुर मग म्हणाल्या, महाराज रात्री बाहेर जातील असं काहीतरी कर !

प्रधान . म्हणजे . यासाठी तू महाराजांना

चतुर हो ! म्हटलं, राज्यात व्यभिचारिणी स्त्रिया फार वाढल्यायत. जा जरा बघून या – लांबच्या ! जवळच्या नाहीत !

प्रधान : कमाल आहे चतुर तुझ्या चातुर्याची. पण हे महाराजांना कळलं तर –

चतुर : काही नाही कळत. महाराज म्हणजे अगदी साधे, भोळे साधुपुरुष आहेत

(साधूच्या पोशाखात राजा येतो.)

हा कोण साधू आला ? चल, चालता हो ! भलत्या वेळेला राजवाड्यात भिक्षा मिळत नसते.

राजा : असं काय करतोस चतुर ? मी महाराज नाही का ?

चतुर : महाराज ? क्षमा असावी हुजूर. पण वेष इतका बरोबर जमलाय, की मी

आपल्याला ओळखलंच नाही.

राजा : हं, हे घे माझे नेहमीचे कपडे. मी येईपर्यंत संभाळून ठेव. जातो मी माझ्या कामगिरीवर. कुणाला पत्ता लागू देऊ नका हं. ओळखू येत नाही ना माझं वेषान्तर ?

प्रधान : बिलकुल नाही. कुठं आत्ताचा हा सात्विक भाव आणि कुठं नेहेमीचा तुमचा –

राजा : बरं, येतो. मी येईपर्यंत काही लागलंसवरलं तर राणीसाहेबांकडे लक्ष ठेवा.

प्रधान : काही काळजी करू नका. मी आहे. तुमची उणीव मुळीच भासू देणार नाही. (राजा जातो.) हं, आता लौकर! मी घरी जातो. आमच्या वाड्यातल्या सगळ्या नोकरांना रजा देतो. तोवर तू राणीसाहेबांना निरोप दे.

चतुर : देतो साहेब. पण ते तेवढं लक्षात असू द्या. बक्षिसीचं. आणि रोख पैसेच द्या. नाहीतर इन्कम टॅक्सला माझी पंचाईत होते.

प्रधान : अरे बक्षिस कुठं पळतंय ? तू काम तर फत्ते कर! (पुन्हा हात चोळीत) काय म्हणाली रे ती ? माझ्या डाव्या गालावरचा ती ऽ ळ! .....

('माळयाच्या मळयामंदी कोण ग उभी' गुणगुणत जातो.)

चतुर : चला! प्रधानजींकडून बक्षिस लागू झालं. तसच बक्षिस आता राणी-साहेबांकडून मिळवावं. – अरे! राणीसाहेब म्हटल्याबरोबर राणीसाहेब हजर! (राणी येते.) हुजूर, आपल्याकडे एक काम होतं.

राणी : बोल, कसलं काम होतं ?

चतुर : सरकार, आपण कधीपासून म्हणत होता की, प्रधानजींचा रंगमहाल आपल्याला पहायचा आहे, पहायचा आहे –

राणी : इश्श!

चतुर : नाही – म्हणजे त्यांनी रंगमहालाला नुकताच नवीन रंग काढून घेतला आहे. तो फार पहाण्यासारखा आहे म्हणतात.

राणी : पहायलाच हवं एकदा. त्यातून तो ब्रह्मचारी माणूस! हवंनको काही पहायला घरात बाईमाणूस नाही. घर कसं ठेवत असेल कोण जाणे!

चतुर : हो ना! फार गैरसोय होते म्हणतात! म्हणून तर त्यांना आपली एकसारखी आठवण होते. म्हणत असतात, राणीसाहेबांसारखी बाई मिळाली असती तर कशाला ब्रह्मचारी राहिलो असतो ?

राणी : खरंच ?

चतुर : आणि म्हणतात, राणीसाहेबांच्या उजव्या गालावरचा तो तीळ – रात्रंदिवस स्वप्नात येतो.

राणी : इश्श! माझ्या उजव्या गालावर कुठं तीळ आहे ?

चतुर : नाही – ते झालंच! पण प्रेम आंधळं असतं, राणीसरकार.

राणी : इतकं प्रेम आहे त्यांचं माझ्यावर ? आंधळं होण्याइतकं ?

चतुर : तर हो! तुम्ही पाहिलं नाही त्यांना चाचपडत चाचपडत चालताना ?

राणी  मी कसली पहाते ? राजवाड्यात असताना परपुरुषांकडे पहायची सोय तरी आहे का ? आता त्यांच्याच रंगमहालात गेलं की गोष्ट वेगळी. रंगमहाल त्यांचा स्वतःचाच असल्यावर ते कसे परपुरुष ? तेव्हा तिथंच जावं म्हणते एकदा. पण महाराज असताना ते कसं जमणार ?

चतुर  ते माझ्याकडे लागलं. पण बक्षिसी पाहिजे.

राणी : ती नको काळजी करूस.

चतुर : हो. आणि बक्षिस रोख पाहिजे. उगाच एखादा दागिनाबिगिना दिलात, तर त्याचे पैसे करताकरता पुरेवाट व्हायची! बरं, आज चांदणी रात्र आहे. महाराज क्रिकेटची मॅच किंवा असाच कुठलातरी खेळ बघायला जाणार आहेत. तेव्हा प्रधानजींचा तुम्हाला निरोप आहे की, आज रात्रीच त्यांच्या रंगमहालात गुपचुप यावं.

राणी : त्यांचा निरोप आणलायस! चतुर, मेल्या चांडाळा, पाजी, हरामखोरा! किती रे चांगला आहेस तू! या निरोपाबद्दल लगेच बक्षिसी देणार होते. पण पर्स विसरून आले.

चतुर : असू दे असू दे. पण जाताना बुरखा पांघरून जायला विसरू नका.

राणी : हो, असंच करते. म्हणजे वाड्यातून बाहेर पडताना कुणी ओळखायला नको.

चतुर : आणि रात्री मधेच कुणी आलं तर पंचाईत व्हायला नको. राणीसाहेब आपल्या स्वतःच्याच बिछान्यात झोपल्यायत असं वाटलं पाहिजे. त्यासाठी काय कराल ?

राणी : त्यासाठी – त्यासाठी असं करते : माझी दासी सारिका विश्वासातली आहे. तिलाच माझ्या जागी झोपवून जाते.

चतुर : मग मी तुमची संमती कळवतो प्रधानजींना. पण ते बक्षिसीचं लक्षात ठेवा.

राणी  मेल्या राक्षसा! तुझे उपकार मी जन्मात विसरणार नाही! (चतुर जातो.) सारिके . . अग ए सारिके! (सारिका येते.)

सारिका  काय बाईसाहेब ?

राणी  अग, तू कधीपासून म्हणत होतीस ना, की महाराजांच्या पलंगावर तुला एकदा झोपायचं आहे म्हणून ?

सारिका  इश्श! भलतंच काय ? मी कधी म्हणाले असं ? हं – परवा सकाळी देवळातून परत येताना मी असं म्हणाले असं जर ती सटवी मल्लिका म्हणाली असेल, तर ते साफ खोटं आहे.

राणी : नाही – पण तू एकदा बघच झोपून माझ्या जागी.

सारिका : मी नाही बाई! महाराजांचा पलंग  म्हणजे तो कसा असेल कुणास ठाऊक!

राणी : कसा असणार ? चारचौघांसारखाच असणार नि काय ? महाराजांचा म्हणजे काही तो वेगळा का असणार ?

सारिका  नको. भीती वाटते

राणी : अग एकदा झोपून तरी बघ. एकदम मऊमऊ आहे. अजिबात त्रास होणार नाही.

सारिका . आता तुम्ही सांगता म्हणजे अनुभवानंच सांगत असणार. पण महाराजांची संमती आहे का या गोष्टीला'?

राणी अग त्यांच्या संमतीचा प्रश्नच कुठं येतो इथं ?

सारिका ते खरंच म्हणा. संमती तुमचीच हवी. त्यांचं काय, त्यांना सगळं चालत असेल.

राणी तसं नाही. ते बाहेरच गेलेत.

सारिका : इश्श ! मग कशाला मी झोपू त्यांच्या पलंगावर ?

राणी म्हणून तर झोपायचं. माझ्या जागी.

सारिका आणि तुम्ही कुणाच्या जागी झोपाल ?

राणी त्याच्याशी तुला काय करायचंय ? (लाजत). एखादवेळी रात्रभर जागंच रहावं लागेल मला.

सारिका : झोपताना मी काय घालायचं ? माझेच कपडे की तुमचे ?

राणी झोपताना कपड्यांचं काय मोठंसं ? त्यातून काळोखच असेल. पण तरी माझेच कपडे घातलेस तर बरं. – हो ! म्हणजे संशयाला जागा नको

सारिका : संशय ? अग बाई ! आणि आवाजावरून कुणी ओळखलं तर ?

राणी कोण येतंय ओळखायला ? तू काही बोलूच नकोस म्हणजे झालं. तेवढीच वेळ आली तर नुसतं 'हुंहू-हुंहू' कर.

सारिका बरं.

राणी : एवढं काम केलंस तर भरपूर बक्षिसी देईन. बरं, काम म्हणजे काही नाही. नुसतं माझ्या जागी झोपून रहायचं. एक मात्र लक्षात ठेव; काय वाट्टेल ते झालं तरी कुणाला कळू द्यायचं नाही, की मी महालाबाहेर गेले !

सारिका तुम्ही निर्धास्त रहा, सरकार. आता तसं म्हणाल तर मला दुसऱ्याच्या बिछान्यावर झोपायची अजिबात सवय नाही. पण तुम्ही म्हणता तर नेईन वेळ निभावून !

राणी बरं तर. मी जाते. (जाते.)

सारिका : राणीच्या गादीवर मी ? मला खरंच वाटत नाही ! राणीच्या पोशाखात मी ? किती गंमत !

(जाते.)

(राजाचे कपडे घातलेला चुतर येतो.)

चतुर महाराजांनी पोशाख दिला. ते परत येईपर्यंत संभाळायला आता संभाळायचा म्हणजे तो काय ट्रंकेत का ठेवून देणार ? म्हणून अंगावरच घालून ठेवला. (आळोखेपिळोखे देत) लई पंचाईत होते या कपड्यां-मधे. अंग भारी आखडल्यागत होतं. कसे महाराज तो वापरत असतील कुणास ठाऊक ! जेवायला बसलं तर हाताची जर पानात जात असेल. कधी सुरवारीची नाडी बांधायची तर अंगरख्याचा घोळ होत असेल झोपायचं म्हटलं तर मानेवरचा कशिदा टोचत असेल आणखी काय करायचं तर आणखी काय होत असेल ! तुकाराम महाराजांनी म्हणूनच ठेवलंय, 'जया अंगी मोठेपण त्याची घट्ट पाटलोण !' (जांभई देऊन)

प्रधानजी मजा करीत असतील. आपणही जाऊन झोपावं झालं. (एकदम विचार सुचून) च्यायला! राजाचे कपडे घालून स्वतःच्या घरी झोपण्यात काय अर्थ आहे ? आं ? झोपायला पण राजवाड्यात जायला हवं. (एक फेरी मारून बिछान्याशी येतो.) आयला, काय गंमत आहे! इथं राजाच्या शयनमहालाशी आलो. पण कुणी अडवत नाही. उलट जो तो महाराज समजून सलाम करतो. आता झोपावं झालं – च्यायला! महाराज झोपताना कपडे घालून झोपत असतील की कपडे काढून ? मला वाटतं, राणीसाहेब नसल्या तर कपडे काढून झोपत असतील. – आं ? पण राणीसाहेब असल्या तर कपडे घालायची गरजच काय ? पण नसल्या तर मग . आयला, घोळ आहे. काय समजत नाही. आपण काय करतो बरं घरी बायकोसमोर ? कपडे काढतो की घालतो ? समजलं! उष्मा असला तर कपडे काढतो. थंडी असली तर घालतो. मग आता तेच करावं. लई उष्मा आहे. तेव्हा काढावेत कपडे. नाहीतर त्या जरीकामाच्या, कशिद्याच्या अंगरख्याची जर टोचूनटोचून आपल्याला काय रात्रभर झोप येणार नाही! बरं, कपडे उतरवायलाही हरकत नाही! कारण राणीसाहेब इथं नाहीतच! तेव्हा आता .. (कपडे उतरवू लागतो. एवढयात राणीच्या पोशाखात झोपलेल्या सारिकेकडे लक्ष जाऊन) आं ? राणीसरकार इथंच ? प्रधानजीकडे न जाता इथंच झोपून गेल्या का काय ? आता याला काय झोप म्हणायचं का काय ? सरळ आपल्या अपॉइंटमेंट विसरून म्हणजे इतकी धडपड-धावपळ करून आपली दोन्हीकडची बक्षिसी बुडाली! ते काही नाही. कामाच्या थकव्यानं झोप लागली असेल. तर त्यांना उठवून पाठवून दिलंच पाहिजे! नाहीतर प्रधानजी भलते चिडतील! . अहो राणीसरकार! उठा उठा! राणीसरकार राणीसरकार!

(सारिका खडबडून उठून बसते.)

सारिका (मुजरा करते.)

चतुर अरे! ही तर राणीसाहेबांची खास दासी! मग इथं झोपून राहिली बरोबर! राणीसाहेब म्हणाल्याच होत्या तसं!

सारिका : (पुन्हा मुजरा करते.)

चतुर : अरे, आणि ही मला मुजरा करते ? च्यायला कमाल आहे! म्हणजे ही मला समजते तरी कोण ? दुसरं कोण समजणार ? माझ्या अंगावर महाराजांचे कपडे आहेत म्हणजे महाराजच समजणार ! पण आता ही राणीचा पोशाख घालून झोपली म्हणजे मी हिला राणीच समजावं अशी हिची इच्छा असणार! म्हणजे आली का पंचाईत!

सारिका (स्वतःशी) महाराज बाहेर गेले होते ते एवढया लौकर का परत आले असतीस बरं ? क्रिकेटच्या मॅचला गेले होते म्हणे! सगळे खेळाडू पटापट आऊट झाले असतील. दुसरं काय ? पण आता काय करायचं ? राणी म्हणून वेळ मारून न्यायची दुसरं काय ?"

चतुर राणीसरकार!

सारिका : हुंहू. हुंहूं.

चतुर : आं ? हुंहू काय ? आमच्याशी बोलायचं नाही का ?

सारिका : हुंहू. हुंहूं.

चतुर : मग आज सगळं न बोलताच करायचं की काय ?

सारिका : हुंहू. हुंहूं.

चतुर . ठीक आहे – जशी तुमची मर्जी !

सारिका : (स्वतःशी) आता कायकाय करतात महाराज कोण जाणे ! पण आता नाही म्हणून कसं चालेल ? राणीसरकारांना सांगितलंय की, त्या इथं नसल्याचं महाराजांना बिलकुल कळू देणार नाही.

चतुर : बोलत का नाही ? (स्वतःशी) जास्त न बोलणं माझ्याही फायद्याचंच आहे. (उघड) काय, आज करणार ना आमच्या मनासारखं ?

सारिका . हुंहूं. हुंहू.

चतुर : तुम्ही काहीच बोलू नका. सगळं व्यवस्थित जमेल.

सारिका . हुंहूं. हुंहू.

चतुर : मग आमचा अंगरखा काढा जरा. लई टोचतो झोपल्यावर.

सारिका : हुंहूं. हुंहू. (त्याचा अंगरखा काढते.)

चतुर आता दिवा मालवायचा का ?

सारिका : हुंहू. हुंहू. (दिवा मालवते) क्षणभरानंतर पुन्हा प्रकाश पूर्ववत. साधूच्या वेषात राजा येतो.)

राजा : काय हे ! परत येईपर्यंत पहाट झाली ! रात्रभर झोप नाही. (जांभई देऊन) भलतीच झोप आली ! पूर्वीसारखी आता जागरणांची सवय राहिली नाही. जाऊन झोपावं झालं शयनमंदिरात गुडूप ! (जाऊ लागतो. पहारेकरी येऊन अडवतो.)

पहारेकरी . ए गोसावड्या ! तिकडे कुठं चाललास ? तिकडे महाराजांचं शयनमंदिर आहे !

राजा : शयनमंदिर आहे का ? मला वाटलं देवघर !

पहारेकरी चल – होतोस की नाही चालता ?

राजा : काय उर्मट आहे हा पहारेकरी ! नेहेमी कसा कंबर मोडेपर्यंत वाकून मुजरा करीत असतो. आणि आता नुसता पोशाख बदलल्यानंतर कुत्र्यासारखा अंगावर ओरडतोय !

पहारेकरी : अरे – पुन्हा चाललास आत ! निघतोस की नाही बाहेर ?

राजा : पहारेकरीभाऊ, देव तुमचं भलं करो. मी गरीब गोसावी. महाराजांकडे भिक्षा मागायला आलो.

पहारेकरी . एवढया पहाटेपहाटे काही नाही भिक्षा-बिक्षा मिळायची. साडेआठनंतर या.

राजा · पहारेकरीभाऊ, तुम्हाला माहीत नाही. इतर धंद्यांप्रमाणे भीक मागण्यात-सुद्धा भलतीच कॉंपिटिशन आहे. उशीरा येऊन कसं चालेल ? जो आधी येईल त्याला भीक मिळणार !

पहारेकरी : मग भीक मागायची तर देवडीवर ये. इथं शयनमंदिरात कशाला

शिरलास ?

राजा : झोपायला – आणि कशाला ?

(जांभई देतो.)

पहारेकरी : काय म्हणालास ?

राजा : अरे महाराज इथंच येतात ना झोपायला ? की आणखी दुसरीकडे कुठे जातात ?

पहारेकरी : वाटेल ते बडबडू नकोस. महाराज कसे जातील कुठं झोपायला ? ते साधुपूरुष म्हणून प्रख्यात आहेत.

राजा : मग झालं तर ! (जांभई) मला जाऊ दे आत. महाराजांनी सांगितलंय की उठल्याबरोबर ज्या साधूचं तोंड पहायला मिळेल, त्याला मी पाच हजाराचं बक्षिस देईन. (जांभई)

पहारेकरी : असं ? आधी कळलं असतं तर मीसुद्धा तुझ्यासारखा साधूचा ड्रेस आणि मेकप करून गेलो असतो.

राजा : (अनावर जांभया) छ्या ! भलतीच झोप आली आहे. ए बाबा, मला जाऊ दे आत.

पहारेकरी : छ्या ! रुल म्हणजे रुल !

राजा : मरो तुझा रुल ! (जांभया देत) अशानं तू एखादवेळी खरोखरीच्या राजाला बाहेर ठेवशील !

पहारेकरी : ठेवीनच ! लहानपणी आमच्या पुस्तकात धडा होता. किल्लेदारानं शिवाजीकडे गेटपास मागितल्याचा.

राजा : छे: ! आजकालच्या शिक्षणानं माणसं इतकी बिघडत असतील असं मला वाटलं नव्हतं.

पहारेकरी : आणि आत जाऊन काय करणार आहेस तू ? महाराज अजून झोपून उठलेच आहेत कुठं ?

राजा : नक्की उठले असतील. जा, जाऊन पाहून ये.

पहारेकरी : तसा नाही जाणार. फी पडेल.

राजा : ही घे रुद्राक्षाची माळ. नाटक कंपनीला विकलीस तर दोनचार रुपये सहज येतील.

(पहारेकरी माळ घेऊन जातो.)

कमाल आहे ! भ्रष्टाचार या थराला पोचला असेल असं वाटलं नव्हतं. यापुढं कारभारात अतिशय जागरूक रहायला हवं. (जांभई देऊन) आऽऽ ! अशी झोप येत्येय !

(पहारेकरी परत येतो.)

पहारेकरी . महाराज अजून झोपून उठले नाहीत.

राजा : (विलक्षण दचकून) काय म्हणालास ? महाराज झोपून उठले नाहीत ? (डुलकी देत) असेल असेल ! झोपच अशी अनावर . (एकदम

दचकून) पण असं कसं शक्य आहे ? महाराज झोपलेले ?

पहारेकरी  मग काय झालं ? महाराजांच्या बिछान्यात महाराज नाहीतर दुसरं कोण झोपणार ?

राजा :  तसं नाही .. पण ..

पहारेकरी . त्यातून आता त्यांचं वय झालं. उठायला वेळ लागतो.

राजा .  ते नाही मी म्हणत.

पहारेकरी : काल रात्री जागरण झालं असेल.

राजा :  होय हो! भलतंच जागरण!

पहारेकरी : तुला नाही म्हणत. महाराजांना.

राजा :  तेच म्हणतोय.

पहारेकरी : त्यामुळं उठायला उशीर झाला.

राजा  अशक्य! तू खोटं बोलतोयस! महाराज आतमधे असणंच अशक्य!

पहारेकरी : असं म्हणतोस ?

राजा :  म्हणतो म्हणजे ? माझी खात्रीच आहे तशी. महाराज आत असतीलच कसे ?

पहारेकरी · ठीक आहे. मी परत एकदा पाहून येतो. पण फी –

राजा :  हा घे कमंडलू. चोरबाजारात वीक. नीट पाहून ये पण! (पहारेकरी जातो.) उद्याच्या उद्या काढून टाकतो या पहारेकऱ्याला! रुल म्हणजे रुल म्हणे! आणि लाच घेतो! राजाचा नोकर असला म्हणजे काय स्वतःला सरकारी नोकर समजतो ? उद्यापासून सगळीकडे पाट्या लावून टाकतो : 'सरकारी नोकर हा जनतेचा सेवक.'

(पहारेकरी परत येतो.)

राजा :  आलास पाहून ?

पहारेकरी : हो.

राजा :  पटली खात्री ?

पहारेकरी  हो.

राजा :  मग ? मी काय सांगत होतो!

पहारेकरी : चुकीचं सांगत होता. महाराज आतमधे आहेत. आतमधे म्हणजे बिछान्यात. अजून झोपूनच आहेत.

राजा  (एकदम ओरडून) हरामखोऽर!

पहारेकरी : आता मी काय केलं ?

राजा :  तू नाही – तो!

पहारेकरी  कोण – महाराज ?

राजा :  नाही  मी नाही .. तो! कोण असेल हा नराधम ? मी नसताना माझ्या बिछान्यात शिरून राणीजवळ झोपणारा अधमाधमधम-धमधम-धम!

पहारेकरी  शांत हो गोसावड्या! शांत हो! हवं तर मी परत जाऊन महाराज आहेत का पाहून येतो.

राजा :  कशाला ? आता माझ्याजवळ फक्त ही छाटी आहे. तीही तुला देऊन

टाकली की मला नुसतं भगव्या लंगोटीवर फिरावं लागेल. त्यातून राजवाड्यातला कुत्रा पाठीमागं लागला म्हणजे पंचाईत! पण . . कोण असेल हा ? कोण असेल ? आणि तो कुणीही असला तरी राणीला त्याबद्दल काहीच वाटू नये ?

(राणी बुरखा पांघरून येते.)

पहारेकरी : ए बाई! चालली कुठं ?

राणी : कुठं म्हणजे ? या शयनगृहात.

राजा : राजाच्या शयनगृहात ? आणि दिवसा कशाला ?

राणी मेल्या गोसावड्या! तुझ्या जिभेला काही हाड ? मी राजाकडे जात नाहीयै. माझं राणीकडे काम आहे.

पहारेकरी : कोण ? कोण आहेस तू ?

राणी : मी राणीची खास दासी आहे. जाऊ दे मला. एकदम अर्जंट काम आहे.

राजा : (संशयाने) एवढं कसलं अर्जंट काम ? कुणाचा निरोपबिरोप आहे की काय ?

राणी . तुला रे मेल्या काय करायचंय ? काम राणीसाहेबांचं आहे. त्यांनाच सांगेन.

पहारेकरी पण राणीसाहेब अजून झोपल्याच आहेत. उठल्या नाहीत.

राणी : काहीतरी थापा नको मारूस नीट सांग.

पहारेकरी : पाहून येऊ का ?

राजा : अहो त्याला बघायला पाठवू नका. तो त्याची फी घेतो. आणि तुमच्याकडे तर बरंच आहे देण्यासारखं.

राणी आज उठायला एवढा उशीर ? नेहेमी तर सकाळी लौकर उठतात. (हळूच) रात्री बाहेर तर गेल्या नव्हत्या ?

पहारेकरी अहो त्या कशानं बाहेर जातात ? महाराजच बाहेरून उशीरा आले. मग सगळं आटपून झोपेपर्यंत मध्यान् रात्र झाली न् काय!

राणी : बरं बरं. जास्त बोलू नकोस. चहाटळ मेला!

पहारेकरी आता राजा-राणींबद्दल बोललं तर तुला काय झालं चिडायला ? अग, आपण नोकरमाणसं! समर्थांनी म्हटल्याप्रमाणं वागावं. आपणासी ठावे ते दुसऱ्यांशी सांगावे. मोठ्या माणसांची लफडी आपण सांगितली नाही तर जनतेला कशी कळणार ? सरकारी नोकर हा जनतेचा सेवक असतो. (राजाला) काय ?

राणी · बरं. मग मी आत जाऊ ?

पहारेकरी . थांबा. मी विचारून येतो.

राजा : (छाटी दोन्ही हातांनी गच्च पकडून) पण आता माझ्याकडे देण्यासारखं काही नाही.

पहारेकरी काही हरकत नाही. हिच्यासाठी मी फुकट काम करीन. (जाऊ लागतो.)

राजा · हरामखोर!

पहारेकरी : (वळून) मला काही म्हणालात ?

राजा : नाही. देवाचं नाव घेतलं. सकाळी-सकाळीच. डँबिस!

पहारेकरी : पुन्हा! – हं, देवाचं नाव असेल. (जातो.)

(राजा आणि राणी एकमेकांची नज़र चुकवण्याच्या प्रयत्नात. एवढ्यात डोळ्यांवर हात घेऊन पहारेकरी पळत येतो.)

रामा रामा रामा! सकाळी उजाडल्या-उजाडल्या ... राजा .. राणी ...! दोघंही ... जागी आहेत! पण ... झोपली आहेऽत!

राजा : (दातओठ खात) बदमाषानं शंकेला जागाच ठेवली नाही!

राणी : (स्वतःशी चडफडत) मेली पुरुषांची जात असलीच! राणी असो नाहीतर दासी असो! सोडायचे नाहीत!

राजा : (स्वतःशी) हिला गधडीला एवढं माणूस ओळखता येऊ नये?

'राणी : (स्वतःशी) आता भेटू देत – की काढते खरडपट्टी!

पहारेकरी : आटपलं असेल. मी बघून येतो! (राजा छाटी गच्च धरून ठेवतो.) फी नको. मी स्वतः होऊन जातो. माझं कामच आहे बघून येण्याचं. – खूप मजा येते! (जातो.)

राणी : (राजाला) तुम्हाला कुठंतरी पाहिल्यासारखं वाटतं.

राजा : शक्य आहे. माझ्याकडे पुष्कळ बाया येतात.

राणी : मी नाही जात कुठल्या बुवाकडे.

राजा : मग टीव्हीवर पाहिलं असेल. 'हास-परिहास'मधे!

पहारेकरी : (परत येऊन जोरजोरात घाम पुसतो.) भलतीच गरम झालीय आतली खोली!

राजा : राजा-राणी काय करताहेत?

पहारेकरी : काही करीत नाहीत. म्हणजे तसं विशेष काही करीत नाहीत. अगदी नेमकं सांगायचं तर ... महाराज राणीच्या पोलक्याची मागची बटणं लावत होते.

राजा : नेहमी – नेहमी हे इतकं नेमकं सांगता का तुम्ही सगळ्यांना?

पहारेकरी : कधीकधी सांगतो. जनतेचा सेवक!

राणी : आम्ही आल्याचं सांगितलंस?

पहारेकरी : सांगितलं. तशी दोघंही दचकली!

राजा : अरे चोरा!

राणी : चांडाळणीला मजा करायला हवी महाराजांबरोबर!

पहारेकरी : इतकी दचकली, की एक बटण वरचं खाली लागलं.

राजा : तपशील नकोयं. थोडक्यात सांगा.

पहारेकरी : मग महाराजांनी ते बटण पुन्हा –

राणी : भ्रष्टाकार ऽ र ग बाई!

पहारेकरी : महाराजांनी पुन्हा नीट लावलं. बटण! आणि म्हणाले, 'दासी का? वाः! येऊ द्या ना!'

राणी : हो! त्यांना काय? एकापरिस दोन!

पहारेकरी : पण गोसावड्याचं नाव ऐकताच म्हणाले, 'त्यांना म्हणावं थोड्या वेळानं

या!' तर आता जा – आणि थोड्या वेळानं या!

दोघेही · आम्ही नाही जाणार!

पहारेकरी : मग बसा इथंच! माझं काय जातंय ?

दोघेही . उद्धट कुठला! थांब! (वगैरे वगैरे बडबडत जातात.)

(काही क्षणांतच राजाच्या पोशाखातला चतुर दबकतदबकत बाहेर येतो. इकडेतिकडे कुणी नाही असे पाहून पळत सुटतो.)

पहारेकरी : (त्याला पाहून) महाराज – महाराज, असं पळत सुटायला काय झालं ? (त्याच्या मागून जातो.) पाठोपाठ दबकतदबकत सारिका बाहेर पडते. अंगावर राणीचा पोशाख. याच वेळी दुसऱ्या बाजूने राणी येते.)

राणी . चांडाळणी! कुठं फेडशील हे पाप ?

सारिका : राणीसरकार! (भीतीने थरथर कापू लागते.)

राणी · बोल बोल! आता का वाचा बसली ? प्रत्यक्ष महाराजांबरोबर झोपायला शरम नाही वाटत ?

सारिका : पण माझं काय चुकलं ? तुम्ही सांगितलंत तेच मी केलं.

राणी : काय ? काय सांगितलं मी ?

सारिका : तुमची जागा घ्यायला सांगितलंत.

राणी : सटवे! त्यांना एक लाज नाही. पण तू ? तू कसं ऐकलंस त्यांचं ? तुला बोलायला तोंड नव्हतं ?

सारिका : तुम्हीच सांगितलंत की बोलू नकोस. फक्त 'हुंहू' म्हण.

राणी . आता भेटू देत हे! मग पाहून घेते. व्यभिचारी ग मेले हे पुरुष! चल, बदल आधी कपडे. (तिला घेऊन आत जाते. दुसऱ्या बाजूने चतुर आणि राजा येतात. आता त्यांनी कपड्यांची अदलाबदल केलेली.)

राजा . तिला एक वेळ कळलं नाही. पण तुला काही लाज, शरम ?

चतुर · महाराज, पण माझं ऐकून तरी घ्या –

राजा : काही सांगू नकोस! आजपासून तू माझा सेवक नाहीस की ती माझी बायको नाही.

चतुर : तेच – तेच सांगतोय महाराज! ती तुमची बायको नव्हतीच.

राजा : म्हणजे ? म्हणतोस काय ?

चतुर : त्या राणीसरकार नव्हत्या महाराज.

राजा . खरं सांगतोस ?

चतुर नाहीतर मी असं कसं वागेन महाराज ? आपल्या मिठाला जागल्याशिवाय कसा राहीन ? शिवाय राणीसरकार केवढ्या, मी केवढा! सारिका त्या मानानं पुष्कळच तरुण!

राजा : म्हणजे राणीच्या बिछान्यात सारिका झोपली होती ? मग राणी त्या वेळी कुठं गेली होती ?

चतुर ते आपण त्यानांच विचारावं महाराज. या पहा, त्या आल्याच (सटकतो. दुसरीकडून राणी येते.)

राणी बरे सापडलात! आधी खुलासा द्या.

राजा खुलासा ? खुलासा कसला ?

राणी : रोज रात्री दहा वाजल्याबरोबर मला झोप आली म्हणून सांगता. आणि आज – आज पहाटेपर्यंत काय चाललं होतं ?

राजा : काय चाललं होतं ?

राणी : क्रिकेटची मॅच ?

राजा : मग काय झालं ? रेडिओवर ऐक. परदेशातली क्रिकेटची मॅच रात्रीच ऐकू येते.

राणी . आज जागरणाचा त्रास झाला नाही ?

राजा : झाला ना ! भयंकर ! अग रात्रभर झोप नाही !

राणी : नसायचीच ! ती सारिका होती ना –

राजा : हो ! तुझ्या मानानं ती पुष्कळच तरुण !

राणी · लाज नाही वाटत आमची तुलना करायला ?

राजा मी कुठं केली ? तो चतुरच मघाशी म्हणत होता !

राणी : चतुर ? चतुरला काय माहित ?

राजा : त्याला नाही तर कुणाला माहीत असणार ? तोच तर होता माझ्या जागी.

राणी . काय म्हणालात ? तो चतुर होता ?

राजा : मग कोण होतं ? मी ? मी तो गोसावडा होतो.

राणी : अस्सं ! तरीच मला चेहरा ओळखीचा वाटला. आणि काय हो, एवढी खोदूनखोदून चौकशी चालली होती – मी कुठून आले, कसला निरोप आणला ... तुम्हाला काय माझा संशय आला ?

राजा : म्हणजे बुरखा पांघरून तू आली होतीस ? व्वा ! मी काय फसलो ! माफ कर ! मी तुझा संशय घेतला ! राणीकडे कुठूनतरी निरोप घेऊन आलीस म्हणून ! मूर्ख आहे मी ! (जोरजोरात हसतो. हसताहसता एकदम ध्यानात येऊन) आं ? पण तू ... तू कुठून येत होतीस ?

राणी : (गडबडून) मी ... मी अशीच बाहेरून ...

राजा : सारिकेला बिछान्यात निजवून तू बाहेर गेली होतीस. कुठं गेली होतीस बोल !

राणी : मी . मी ना ..

राजा बोल ! माझा संशय घेतेस नाही का ? आता सांग, रात्रभर तू कुठं होतीस ?

राणी : मी. मी सुटका करायला गेले होते.

राजा . कुणाची ?

राणी . बालंतिणीची. म्हटलं, एवढ्या रात्री सुईण कुठून मिळणार ? बाई अडली आहे – जाणं भाग आहे. त्यातून बाळंतीण जवळची –

राजा कोण बाळंतीण ?

राणी . ती हो आपली ही हो .

राजा : तिला काही नावगाव ?

राणी : सांगते हो ! ओरडू नका. आपल्या चतुरची बायको हो.

राजा अस्सं ! चतुरची बायको !

राणी . (लाडिकपणे) आता पटली खात्री ?

राजा हो. चांगली पटली. राणीसरकार, आपल्या चतुरचं अजून लग्नच झालेलं नाही!

राणी नसेल. म्हणाला तरी बायकोच आहे म्हणून!

राजा : खोटं बोलू नका! आम्हाला कळलंच पाहिजे! काल रात्री तुम्ही कुठं गेला होता ? (राणी गप्प.) बोला, कुठं गेला होता ? (राणी अजूनही गप्प.) म्हणजे आम्ही असंच समजायचं का, की राज्यातल्या व्यभिचारी बायकांमधे प्रत्यक्ष आमची राणीदेखील आहे ? (ती गप्पच) बोला! कुणाबरोबर केलात व्यभिचार ? बोला! लगेच त्याचा शिरच्छेद करतो! नुसता समोर येऊ दे त्याला! -

(प्रधान येतो.)

प्रधान : महाराज, काल रात्रीचं आपलं साहस यशस्वी झालं ना ?

राजा : (चपापून) काय म्हणालात ? (सावरून) हो हो! म्हणजे व्यभिचाराचा बंदोबस्त! तो तर पक्काच झाला. मला नाही वाटत आपल्या नगरीतल्या बायका पुन्हा या फंदात पडतील असं!

राणी प्राण गेला तरी पडायच्या नाहीत.

राजा तुम्हाला काय माहीत ?

राणी आपलं – तुम्ही सांगताय त्यावरूनच.

सारिका (प्रवेश करून) महाराज – (लाजते.) महाराज! (पुन्हा लाजते.)

राजा आं ? आता हिला काय झालं लाजायला ?

राणी सारिके, सटवे! लाजत्येयस कशाला ?

सारिका महाराज, (पुन्हा लाजते.) इतके दिवस मी राणीसाहेबांची खास दासी होते. काल रात्रीपासून . आता तुम्ही मला आपली स्वतःची खास दासी कराल ना ?

राणी मेलीची ही हिंमत ?

राजा . कोण आहे ही ? मी तर हिला ओळखतही नाही!

सारिका साहजिक आहे महाराज! अंधारातली ओळख उजेडात कुठून पटणार ?

राजा : अरे, हे तर गळी पडणं झालं! बाई, मी आजवर कुठल्याही परस्त्रीला स्पर्शसुद्धा केलेला नाही!

सारिका : मग काय समजायचं मी ? महाराज मला अंतर देणार ? हाय रे परमेश्वरा! रात्रभर मला दिलेल्या वचनांचा क्षणात विसर पडला ना महाराजांना ? (रडू लागते.)

चतुर (प्रवेश करून) रडू नकोस सारिके. रात्रभर तुला वचनं देणारे हे नव्हते. मी होतो. हे त्या वेळी दुसऱ्या बिछान्यात – आपलं – दुसऱ्या कामात होते!

सारिका माझा नाही विश्वास बसत ते तुम्हीच होता यावर! एखादी खूण सांगा पाहू!

चतुर मोठ्यानं सांगू की कानात सांगू ?

सारिका : कानात सांगा. (तो सांगतो. तशी लाजून) चला! चावट कुठले!

राजा हाच होता ना ?

सारिका : हो.

राजा : (चतुरला बाजूला घेऊन) काय सांगितलंस तिच्या कानात ?

चतुर : तुमचं वय!

राजा : बदमाष!

चतुर : महाराज, मी राणीसरकारांकडे हिच्यासाठी मागणी घालायचं ठरवलं होतं.

राणी : खुशाल माग! मी आनंदानं देऊन टाकीन. म्हणे माझ्या मानानं तरुण आहे!

चतुर : मग राणीसरकार, लगेच आपला शब्द खरा करून टाका बरं!

राणी : करते. थोडा धीर धर चांडाळा. हुषार आहे मेला खवीस!

(राणी सारिकेचा आणि राजा चतुरचा हात एकमेकांच्या हातांत देतात.)

# गजांचे जग

(संपूर्ण काळोख.)

प्रकाश सावकाश उजळत जातो तो एका बंद दरवाज्यावर.

हा तुरुंगातल्या एका कोठडीचा दरवाजा. विंगमधून जेलर येतो.)

जेलर : गुड इव्हनिंग सर. आपल्याला काय जेल बघायचंय् म्हणता ? ठीक आहे. दाखवतो. बरेच लोक जेल बघायला नेहेमी येत असतात. आम्हीदेखील अगदी मनापासून, सगळी माहिती पुरवून त्यांना जेल दाखवतो. लोक तरी कायकाय आणि कसलेकसले प्रश्न विचारतात! कोठड्या किती, दारं किती, कड्या किती आणि कुलपं किती! जसं काही अगदी उद्या इथं यांना रहायला यायचंय्! आणि एक प्रश्न अगदी हटकून विचारतात : 'काय हो जेलर, तुमचा जर इतका कडीकोट बंदोबस्त असतो, तर कैदी पळून जातात कसे ?' आता हा काय प्रश्न झाला ? पण एकेकाच्या वर्मावर बोट ठेवायची सवयच यांना! मग आम्ही तरी काय उत्तर देणार ? सांगतो, 'कैदी पळून जातात कसे ? – अहो, गुपचुप! आवाज न करता!' रागावू नका. तुम्ही असलं काही मूर्खासारखं विचारणार नाही हे मला माहीत आहे. पण आपलं एक सांगितलं! (सिगरेट शिलगावून) बाकी – एक्स्क्यूज हं – पण तुम्हा लोकांच्या हौशीपणाचीदेखील कमाल आहे! अहो सगळं सोडून जेल बघायला कुठं येता ? जेलमधे असतं काय पहाण्यासारखं ? गज, दगड आणि त्यांच्या आत जनावरांसारखी कोंडलेली माणसं. त्यात काय पहायचं ? कुठं सुंदर निरभ्र आकाश पहावं, गरजणारा समुद्र पहावा, तर या कोठड्यांमधे बंद केलेली माणसं कसली पहाता ? म्हणा तुमचंहि बरोबर आहे. ही

आहे त्याला सात वर्षांची शिक्षा झालेली आहे. सहा वर्ष होऊन गेली. आता बिचारा अगदी गांजून गेलाय्!

कैदी (आतून दरवाज्यावर बुक्के मारीत) सोडा मला! सोडा! मला इथं रहायचं नाही! आणखी एक क्षणभरहि इथं राहिलो तर मी गुदमरून जाईन! मरून जाईन! (खचल्यासारखा खाली कोसळतो. काही वेळ तसाच रहातो. नंतर हळूहळू शांत होतो. हे चालू असताना जेलर प्रेक्षकांना –)

जेलर : 'आणखी एक क्षणभर'! हुं! बिचाऱ्याला अजून एक वर्ष काढायचंय् इथं. भेटा त्याला. चार गोष्टी करा सुखदुःखाच्या. बिचाऱ्याला तेवढंच बरं वाटेल. कुणीच येत नाही त्याला भेटायला. सुरुवाती-सुरुवातीला खूप लोक यायचे. पण हळूहळू एकेकजण यायचे बंद झाले. लोकांचं तरी काय चुकलं म्हणा ? (पहिल्या सिगरेटवर दुसरी पेटवीत) कुणालाहि झालं तरी चार दिवस कौतुक! महिनोमहिने, वर्षानुवर्ष एखाद्या माणसाची विचारपूस करायला इथं फुरसत आहे कुणाला ? दुसरं असं पहा, आपला मित्र तुरुंगात आहे ही तशी काही मोठी अभिमानाची गोष्ट नाही! तेव्हा तुरुंगातल्या कैद्याशी मैत्री ठेवणार कोण ? विशेषतः या असल्या – फ्रॉड करून आलेल्या! झालंच तर ही जागा – जेल, तुरुंग, कैदखाना, प्रिझन! इथं क्वचित् कधीतरी राणीची बाग पहायला येतात तसं यायला बरं. पण वरचेवर हो कोण येणार ? डोकं दुखतं या अंधारात. – काय म्हणालात ? याच्यासारखी माणसं वर्षानुवर्ष इथं रहातात त्यांचं काय ? त्यांचं डोकं नुसतं दुखून थांबत नाही; फुटतं आतल्या आत! तुकडे पडतात! भेगा पडून घराच्या भिंती कोसळतात, तशी ही माणसं नुसती घराच्या पहातापहाता ढासळतात. ढेकळासारखी विरघळून जातात. अहो माणसं माणसं रहातच नाहीत! आतल्या आत एकसारखे घणाचे घाव बसले, डोकं आतल्या आत फुटलं आणि त्याचा चक्काचूर झाला म्हणजे माणसाचं काय शिल्लक राहिलं, तुम्हीच सांगा ना! आता हाच माणूस बघा नंबर दोनशेसत्तर. इथं तो दोनशेसत्तर आहे. पण एका काळी त्यालाहि नाव होतं. तो केशव भाइंदरकर होता. बिचारा फ्रॉडच्या लफड्यात सापडला आणि इथं आला. तुम्ही म्हणाल, सात वर्षांच्या सजेचा, फ्रॉडवाला, भयंकर माणूस! अहो कुठला भयंकर ? गजांच्या आत माणूस भयंकर. बाहेर प्रत्येकजण सज्जन! तर ते सोडा. हा इथं भलताच त्रासून, खचून गेलाय्. रिकाम्या – अगदी रिक्काम्या दिवसांच्या लांबलचक वाटेवरून चालताचालता बिचारा थकून गेलाय्! मरगळून गेलाय्! हा एकटेपणा, रिकामेपणा असह्य झाला की तो काय करतो, ठाऊक आहे ? समोर नसलेली माणसं

समोर आहेतच असं समजून त्यांच्याशी बडबडत बसतो. सुख-दु:खाच्या गोष्टी! नव्हे, दु:खाच्या नाहीतच! भासांच्या दुनियेत नुसतं सुखच असतं. दु:ख असतं ते खऱ्याखुऱ्या दुनियेत! (थांबून) हाक मारून पाहू या. चटकन् जागा व्हायचाच नाही आपल्या तंद्रीतून. पण पाहू! (हाक मारीत.) नंबर दोनशेसत्तर! (उत्तर नाही. हसून) काय सांगितलं ? (पुन्हा हाक.) दोनशेसत्तर! (केशव भाइंदरकर उठून उभा रहातो. एकदम तंद्री खाड्‌दिशी उडावी तसा. भयभीत. श्रांत. टेन्स.)

केशव : काय झालं ?

जेलर : काही विशेष नाही. ही मंडळी जेल बघायला आली आहेत. पण यांना तुमच्याशी सहज चार गप्पा मारायला आवडेल. चांगली माणसं आहेत ही. (आपल्याला) या – आत या. बसा असे इथं. मी आलोच पाच मिनिटात.

केशव : हो ठीक आहे. थँक्यू.

जेलर कशाबद्दल ?

केशव : तुम्ही यांना आणलंत. मला भेटायला. त्याबद्दल. थँक्यू. थँक्यू व्हेरी मच्. (जेलर मान हलवून जाऊ लागतो.) जेलरसाहेब!

जेलर : काय ?

केशव : सिगरेट देता ?

जेलर : सॉरी. कैद्यांना काहीहि द्यायची परवानगी नाही. (कोठडीतून बाहेर पडतो. क्षणभर थांबून तोंडातली सिगरेट काढून जमिनीवर टाकतो, बुटाखाली चिरडतो व निघून जातो.)

केशव : मी दोनशे – सॉरी, मी केशव भाइदरकर. बरं झालं तुम्ही आलात. बरेच दिवसात मला भेटायला कुणीच आलं नव्हतं. (थांबून) कशी वाटली जागा ? (मग काहीतरीच विचारले असे वाटून) जेलरसाहेब काय सांगत होते माझ्याविषयी ? नेहेमी लक्ष ठेवून असतात. सगळ्या कैद्यांवर सतत नजर! झालंच तर इथला पहारादेखील अगदी कडक असतो! या जागेचं वाईट हेच! कुणीतरी सारखं नजर ठेवून असतं. प्रायव्हसी कशी ती नाहीच! एकान्त बिलकुल नाही. आणि तरीहि एकटेपणा मात्र भयानक! जीवघेणा! पण पहाऱ्याची इथं सवयच लागून जाते. कुणी पहात नसलं तरी भास होतो की कुणीतरी डोळे वटारून, नजर रोखून पहातंय्. भास – म्हणजे खराच तो! भास कुठला, खरं काय, हे समजणं कधीकधी फार मुष्किल होतं यार! (एकदम गप्प होतो. मग) तुम्हाला जेलचा दरवाजा कसा काय वाटला ? दरवाजा – गेट ? छान आहे नाही ? भव्य ? प्रचंड ? त्या कड्या, ती कुलपं थाट आहे नुसता! आणि किती वर्षांचा जुना आहे! त्यामुळं उघडताना कुरकुर करतो. सावकाश – अगदी सावकाश उघडतो. इथला प्रत्येक दिवस मरणाकडे जितका सावकाश जात असतो, तेवढा सावकाश हा दरवाजा उघडतो. क्वचितच उघडतो. आणि लगोलग बंद होतो. तुम्ही आत येताच तो

बंद झाला तुमच्या पाठीमागं. – घाबरू नका! तुमच्यासाठीं तो परत उघडेल! – काय म्हणता ? बंद होतानाचा आवाज तुम्ही ऐकला नाही ? अहो नाही कसा ? मी इथून ऐकला ना! छेः! माझी अजिबात चूक व्हायची नाही. कारण तो आवाज मी कधीच विसरू शकणार नाही. सहा वर्षांपूर्वी तो पहिल्यांदा ऐकला, आणि तेव्हापासून नेहेमीच, जागेपणी, झोपेत ... मला पछाडलंय् त्या आवाजानं.

बंद होणाऱ्या दरवाज्याच्या आवाजानं. ... आत्ता —

– या क्षणीदेखील मला तो ऐकू येतोय्. (दूरवर प्रचंड दरवाजा उघडल्याचा आवाज. त्याचे प्रतिध्वनी. विरतविरत हळूहळू शांत होतात.) तुम्हाला माझी दया येत असेल नाही ? माझ्या या एकटेपणासाठी. पण खरंच सांगतो, कुणी अगदी दया करावी इतकी वेळ नाही आलेली. तुम्हाला वाटतं तेवढा मी एकटा नाही. माझी बायको आहे, मित्र आहे. (डोळे मिचकावून) आणखीदेखील कुणीकुणी आहे. नाही – म्हणजे अलिकडे त्यांच्यापैकी कुणी येत नाही इथं. पण मीच भेटून येतो त्यांना अधूनमधून. इथनं बाहेर न पडताच. मघा म्हटलं ना तुम्हाला, भास काय, खरं काय – सगळी गल्लत आहे. पण ही अशी गल्लत होते ना, त्यातच गंमत आहे. खरं की नाही ? आमचं घर – एकदा न्यायला पाहिजे तुम्हाला – छोटंसंच आहे. पण आहे इतकं झक्क! त्याचं सगळं क्रेडिट आमच्या मिसेसला द्यायला पाहिजे. इतकी प्रेमळ, मनमिळाऊ गृहिणी तुम्ही पाहिली नसेल. (त्याने घराचा उल्लेख करताच प्रकाशात येतो एक रंगीत दरवाजा. छोटीशी पायरी. जवळ कुंडया. केशव दाराची बेल वाजवीत उभा. दार उघडते. दारात सुमन.)

सुमन : तुम्ही ?

केशव : होय सुमन. मी आलो.

सुमन : खरंच ? माझा विश्वासच बसत नाही. स्वप्नात असल्यासारखं वाटतंय्. आता परत नाही ना जाणार ?

केशव : जाणार आहे. पण लौकरच परत येईन. अगदी कायमचा!

सुमन : खरंच याल ना ? मला तर कधी एकदा तुम्ही सुटून याल असं झालंय्. रात्ररात्र काळजीनं झोप येत नाही. आणि काय दशा झालीय् तुमची! अगदी बघवत नाही!

केशव : अग चालायचंच! तुरुंग म्हणजे काही सासुरवाडी नाही! पण आता थोड्याच दिवसात –

सुमन : तुम्ही सुटून आलात ना, की आपण खूप मजा करायची! तुमच्या आत्ताच्या कष्टांची भरपाई व्हायला हवी! मी सांगू ? आपण काश्मिरला जाऊ.

केशव : काश्मिरला ? अग पण एवढे पैसे तरी आहेत का आपल्याजवळ ?

सुमन : विसरलात एवढ्यात ? तुमंच सेव्हिंग होतं थोडं बँकेत. शिवाय मी नोकरी करते. थोडीथोडी भर मीसुद्धा घातलीय सेव्हिंगमधे.

केशव : खरंच ? मग जमेल काश्मिर. काय गंमत येईल! निळेनिळे डोंगर, उघडं आकाश, हिरवंगार पाणी .. मी नुसता डोंगरावरून धावत सुटणार आहे. अडवायला कुणी नसेल तिथं. मोकळं, स्वच्छंद धावणार आहे; नाचणार आहे. स्वतःभोवतीच गरगर फिरणार आहे. रानातून – जिथं भिंती नाहीत, गज नाहीत, दारं नाहीत, अशा उघड्या माळावरून! तू – आणि मी! मी – आणि –

सुमन : आणखी एक माणूस विसरलात.

केशव : आणखी एक माणूस म्हणजे ..

सुमन : मघापासून वाट पहात्येय् तुम्ही विचाराल – विचाराल –

केशव : मला नाही कुणी आठवत.

सुमन तुम्ही गेलात तेव्हा मला पाच महिने (लाजते.)

केशव : अरे हो! एवढं कसं मी विसरलो ?

सुमन मुलगी झाली. नाव मोहिनी ठेवलं. तुम्ही नेहेमी म्हणायचा ना, मोहिनी नाव मला आवडतं म्हणून!

केशव कमाल आहे! म्हणजे आता चांगली मोठी झाली असेल ती!

सुमन : झोपली आहे. आत चला ना. बघायचं नाही का तिला ?

केशव चल. (जाऊ लागतो. मग थांबून) तू तिला ... माझ्याविषयी

सुमन जेल सोडून बाकीचं सांगितलंय्. तुम्ही किती चांगले आहात, वगैरे सगळं.

केशव : आणखी ?

सुमन : आणखी सांगितलंय् की तुम्ही गावाला असता. तिकडून थोड्या दिवसांनी येणार आहात. तिच्यासाठी मोठ्ठी बाहुली घेऊन.

केशव : (भारावून) सुमन! (थांबून) मी नाही आत येत. कदाचित् जागी झाली तर काही सांगता यायचं नाही. मी सुटून आल्यानंतरच तिला भेटेन. बाहुली घेऊन.

सुमन : लौकर या पण तिच्यासाठी – आणि माझ्यासाठी. मी – वाट पहात्येय् हो तुमची ! (प्रकाश हळूहळू मंदावत जातो. अखेरीस घराचे दृश्य पूर्ण काळोखात जाते व तुरुंगाचा भाग उजळत जातो.)

केशव : पाहिलंत ? तुम्ही मला वेडा म्हणाल. करंटा म्हणाल. अशी सोन्यासारखी बायको, इतका प्रेमाचा संसार असताना कसल्यातरी लफड्यात गुंतून इथं येऊन पडलो, म्हणजे मी कमनशिबी तर खराच! पण त्याहून अधिक बेजबाबदार, नालायक! पाच महिने झालेल्या बायकोला वाऱ्यावर सोडून आलो. कसे दिवस काढीत असेल बिचारी! खरी दुर्दैवी तीच! स्वतःचा काही दोष नसताना केवळ माझ्यासारख्या नादान नवऱ्यापायी बिचारीला वनवास! कसली बुद्धि आठवली आणि हातातला परीस फेकून देऊन चकाकणाऱ्या खोट्या सोन्यामागं धावलो! पैसा! अधिक पैसा! रात्रंदिवस हाच विचार होता त्या वेळी डोक्यात. पण त्यात मी एकटाच नव्हतो. माणिकलाल देखील होता. निरनिराळ्या योजना एकसारख्या तो माझ्या कानाशी गुणगुणायचा. शेवटी फिरलं माझं डोकं! केला

अविचार! माणिकलाल... माणिकलाल! (तुरुंगावरचा प्रकाश कमीकमी होत उजळून उठते ती एक पेढीसारखी जागा. गादी पसरलेली. जवळच डेस्क, एक फोन इत्यादि)

माणेकलाल . जय गोपाळ! – आं ? अरे केशवभाई, तूं क्यारे आव्या ?

केशव आत्ताच आलो. तुझा शेवटचा निरोप घ्यायला.

माणेकलाल : एने सूं ? तुजा मतलब मी नाय समजला.

केशव : थोड्याच दिवसात मी जेलमधून सुटणार आहे माणेक.

माणेकलाल : बालाजीनी कृपा! केशवभाई, रिलीजचा दिन बोलून ठेव. आमी लोक हारतुरा घेऊन येल जेलवर.

केशव : हारतुरे नकोत माणेक. मी काही एखाद्या आंदोलनातला राजकीय कैदी नाहीयै. आणि तू तर जेलवर बिलकुल फिरकू नकोस. तू माझ्याबरोबर या असल्या लफड्यात होतास, असा लोकांना संशयदेखील यायला नको.

माणेकलाल : सच्ची केशवभाई. तुजीसारखा माणूस मीनी बगितला नाय. कोर्टमंदी तू माजा नाव घेतला नाय. तेच्याखातर आमी बालीजीच्या मंदिरला एक हजार अने एक रुपयाचा पायरीबी चढवला. पण जेलमंदीबी तू माजा नाव नाय घेतला – सच्ची नाय घेतला ?

केशव : वेडा आहेस तू माणेक! अरे मला शिक्षा झाली म्हणजे साऱ्यांनाच शिक्षा व्हायला हवी का ? तुला काय वाटलं ? पैशासाठी फ्रॉड केला म्हणजे दोस्ती विकून टाकली का मी ?

माणेकलाल : अरे नाय नाय! असा कोण बोलेल ? तुझा मला पहिलेपासून भरोसा होता केशव. अरे दोस्त म्हणजे दोस्त! (त्याला मिठी मारतो.)

केशव . (प्रयासाने त्याच्या मिठीतून सुटत) आपली दोस्ती तशीच राहील माणेक! पण जेलमधून सुटल्यानंतर मी मात्र तुला भेटायचं नाही असं ठरवलंय्.

माणेकलाल : असा नको करा केशवभाऊ! अरे एका फ्रॉडमंदी पकडला तो काय जाला ? आणखी लई फ्रॉड पचवून जायेल. असा डरून कसा चालेल ?

केशव : मी डरत नाही माणेक. पण मला लबाडीचा, गुन्हेगारीचा कंटाळा आलाय्. मला चारचौघांसारखं, साधं, सुंदर आयुष्य हवंय्. उजळ माथ्यानं जगायचंय् मला.

माणेकलाल : जय बालाजी! सारा डिसीजन छे. घे – मिठाई घे. (जवळ ठेवलेले मिठाईचे उघडे बॉक्स पुढे करीत) केशवभाई, तुझा डिसीजन मला लई आवडला. आमीलोक तर येच धंद्यामंदी जलम गमावला. पण तू तर चांगला जिंदगी गुजार. तुझी बायडी हाये, पोरी हाये. तू असला रिस्क नको घेऊ. पुन्हा जेलमंदी नको जाऊस. – काय, आवडला मिठाई ? स्पेशल सौराष्ट्रचा हाये.

केशव तुझ्याकडचा माल म्हणजे तो चांगलाच असायचा. तुझी खाण्यापिण्यातली टेस्ट मला माहित आहे ना!

माणेकलाल  तुला आयडिया नाय केशवभाऊ. अरे तू होता म्हणून आज मी इथं बसून असा मिठाई खाते. बालाजीची कसम, हर दिवस तुझा नाव घेऊन मी खाते. अरे तू कोर्टमंदी माजा नाव बोलला असता, म्हंजी मी सात नाय, सतरा बरस जेलमंदी जाता होता! पण तू गेला जेलात. मी बाहेर कमावला. पण तू काय गम नको करा. मी दोन्हीचाबी शेअर कमावते हाय!

केशव : दोघांचा शेअर ? म्हणजे ?

माणेकलाल . तुला काया वाटला ? तू जेलमंदी गेला म्हंजे दोस्ती खतम् ? (डेस्कच्या खणातून नोटांचे पुडके काढून) हा घे. पहिले फ्रॉडचा तुजा हिस्सा.

केशव : (विश्वास न बसून) माझा हिस्सा ?

माणेकलाल : हां हां! तुजाच तर खरा. अरे बगत काय बसला ? मोजून घे – मोजून घे.

केशव : नको – मोजून नको घ्यायला. विश्वास आहे तुझ्यावर.

माणेकलाल अने हे बघ, (डेस्कमधून आणखी एक बंडल काढीत) हेबी समदा तुजा!

केशव · काय आहे ?

माणेकलाल : (वेडावीत) काय हाये ? अरे गांडा, तू शेअर सर्टिफिकेट नाय समजते ?

केशव : शेअर्स ? माझे ?

माणेकलाल : तुजा नाय – टाटाचा! अरे थोडा इन्व्हेस्टमेंट केला तुज्या नावावरती. जेलमधीसून बाहेर येऊन नवी जिंदगी सुरू करायची वार्ता करते तू. पयले असा सोच की, खायेल काय ? खाक ? तेच्यासाठी थोडी तर इन्व्हेस्टमेंट पायजे. घाटी कुठला!

केशव : (भारावून) माणेक, माणेक, मला कल्पना नव्हती तू माझ्यासाठी इतकं करशील याची.

माणेकलाल : अरे तुज्यासाठी नाय; पण भाबीसाठी तर करायला पायजे. तुज्या पोरीसाठी – अने आपल्या दोस्तीसाठी पण!

केशव : माणेक, तू हे सारं करशील असं वाटतच होतं. तू हाडाचाच दिलदार आहेस! पण – पण जेलमधे राहून माझा माणसांवरचा विश्वासच उडालाय् रे! कुणी कुणासाठी काही करील हे खरंच वाटत नाही. तुला ठाऊक नाही माणेक, जेलमधे आमचा जेलर साधी सिग्रेटदेखील देत नाही! (प्रकाश हळूहळू मंदावत जातो. फक्त केशव प्रकाशात.)

काहीकाही माणसांचं नशीब असं असतं की त्यांच्यावर माया करणारी माणसं त्यांना उगाच भेटत जातात. मी हा असा! बायकोची किंमत न कळणारा. दोस्ती न समजणारा, गुन्हेगार माणूस पण कां कोण जाणे, माझ्यावरहि माया करणारी माणसं आहेत. सांगायला कसंतरीच वाटतं. म्हणजे एवढा चांगला संसार, एवढी प्रेमळ

बायको, पणं . (ओशाळून) असाच कधीकधी फिरताफिरता शांताशी संबंध आला. नेहेमी जात नसे मी तिच्याकडे. पण जायचा तेव्हा मन शांत शांत होऊन जायचं . (हा वेळपर्यंत ज्या भागावर प्रकाश पडला आहे, तिथे एक सोफासेट, उंच उभा दिवा इत्यादींची आकर्षक रचना. शांता गोव्याच्या बाजूच्या मुलींसारखी – रेखीव, वेधक.)

शांता : तू – आलास ?

केशव न पहाताच कसं कळलं तुला ?

शांता आपलं माणूस येतं तेव्हा सगळं वातावरणच बदलतं. बस ना. उभा कां ? खूप दमलेला दिसतोय्स. काय झालं ? सांग ना मला. (त्याच्या केसातून हात फिरवीत) बरं वाटतं आता ?

केशव खूप खूप बरं वाटतं.

शांता : तरीदेखील वाळल्यासारखा वाटतोस तू विश्वास.

केशव : विश्वास ? माझं नाव विश्वास नाही.

शांता : माहीत्येय् मला. पण तू माझा विश्वासच आहेस. तुला पाहिल्यावर नेहेमी मला वाटतं की तुझं नाव विश्वासच आहे. शोभतं तुला ते नाव. आता सांग, कुठं होतास इतके दिवस ? आजारी तर नव्हतास ?

केशव : नाही ग ! विशेष सांगण्यासारखं काही नाही

शांता : इथं येणारे सगळे आपण कायकाय विशेष केलं याच्या बढाया मारीत असतात. तूच तेवढा वेगळा आहेस त्या सगळ्यांच्यापेक्षा. सांगण्यासारखं काही नाही म्हणणारा. पण राजा, काहीतरी झालंय् – कसलातरी त्रास होतोच आहे तुला. होय ना ?

केशव : नाही ग ! तसं म्हटलं तर तू वरचेवर भेटत नाहीस, एवढाच त्रास !

शांता : अस्सं ! मग भेटतो तेवढा वेळ तरी आनंदात घालवू. कधीकधी – बरं का विश्वास, मला फार भीति वाटते. वाटतं, क्षणाचा भरवसा नाही. कुठल्या क्षणी आपण संपून जाऊ, राखेला मिळू, मातीला मिळू – कुणाला सांगता येत नाही. पण तू भेटलास की आधार वाटतो. हे असले विचार मागं पडतात. – जाऊ दे ! आज बऱ्याच दिवसांनी आलायस् आजची रात्र तुझी आहे विश्वास. आजची रात्र आनंदाची आहे. सुखाची आहे.

केशव . मलादेखील इथं आल्यावर सगळं जग विसरायला होतं ! काळोखाचं, जुलुमाचं जग ! बंदिस्त करून ठेवणारं, गुदमरवून टाकणारं जग ! भिंतींचं, गजांचं जग ! इथं आल्यावर वाटतं की आपण कापसाच्या म्हातारीसारखं हवेत तरंगतोय्. हालचाल न करता कमळाच्या पानासारखं पाण्यावर पहुडलोय्.

शांता : काय म्हणतोय्स तू ? मला तर त्याचा अर्थहि कळत नाही.

केशव : याचा अर्थ एवढाच शांता, की तुझ्यासारखं माणूस सबंध दुनियेत शोधून सापडणार नाही !

शांता : विश्वास ! (तो तिला जवळ घेऊ लागतो. प्रकाश मंदावत जातो पुन्हा

केशव प्रकाशात येतो.)

केशव . अशी माणसं मिळायला भाग्य लागतं. या तीनच माणसांचा जरी विचार केला तरी जग आपलं वाटतं. जेलमधून बाहेर पडण्याची, नवीन आयुष्य सुरू करण्याची उमेद वाटते. (थांबून) आता ही तिघंच राहिली. पूर्वी बरीच माणसं होती. पण एकेक करताकरता सगळी गेली. आठवणीतूनहि गेली. (थांबून) निघालात ? बरं, येत जा अधूनमधून. तेवढंच बरं वाटतं. म्हणा आता सातआठ महिन्यात मी सुटणारच! (प्रकाश मंदावत जातो संपूर्ण काळोख. संगीत. जेलर प्रकाशात येतो.)

जेलर : गुड इव्हनिंग सर. काय म्हणता, ओळखलं नाहीत ? बस्स् काय ? सातआठ महिन्यात ओळख विसरलात ? अहो तुम्ही आमचा जेल बघायला नव्हता का आलात ? ऑक्टोबरमधे हो. म्हणजे झाले त्याला आठेक महिने. – कोण म्हणालात ? केशव भाइंदरकर ? कमाल आहे बुवा! भलतीच शार्प दिसत्येय् तुमची स्मरणशक्ति. त्याचं काय व्हायचं ? अहो गेल्याच महिन्यात सुटला तो. आता एकदम मोकळा! फ्री ॲज् अ बर्ड! तुम्हा लोकांना काय कळणार आहे स्वातंत्र्यांची किंमत ? तुमचा वेळ नेहेमी भराभर चाललेला असतो – खाण्यात, पिण्यात, हसण्यात, प्रेम करण्यात, गाणी ऐकण्यात, फुलांचा वास घेण्यात, झोपा काढण्यात, पैसे खर्च करण्यात नुसता अत्तराखारखा उडून जात असतो. आजूबाजूची प्रत्येक गोष्ट एकसारखी बदलत असते. पण तुरुंगात . हे जगच मुळी करड्या सावल्यांचं, कंटाळ्याचं, दुःखाचं, पश्चातापाचं, एकटेपणाचं! इथं काळ अगदी हळूहळू पुढं सरकतो. जशा काही त्याच्या पायातदेखील मणामणाच्या बेड्या असतात. पुढंपुढं तर जसा काही तो सरकेचनासा होतो. पणं एक दिवशी तोदेखील मुक्कामाला पोचतो, आणि शिक्षेची मुदत संपते. विश्वास बसत नाही, पण सुटकेचा हुकूम येतो. (दरवाजा उघडतो.) नंबर दोनशेसत्तर! दोनशेसत्तर!

केशव · (धडपडत उठून) काय झालं ? काय केलं मी ?

जेलर तुम्ही सुटलात.

केशव : मी – सुटलो ?

जेलर · हो. खरंच सुटलात. चांगल्या वागणुकीबद्दल एक आठवडा सूटदेखील मिळाली.

केशव . मी – मी सुटलो ? आज ?

जेलर असं काय करता ? भानावर या. तुम्ही सुटलात. यू आर फ्री. फ्री ॲज् अ बर्ड! (केशव दारातून बाहेर पडून सावकाश चालत पुढे येतो.)

केशव मी सुटलो खरंच सुटलो तुरुंगाच्या दाराचा तो आवाज एरवी मला इतका भयानक वाटायचा! पण तोच दरवाजा माझ्या पाठीमागं बंद झाला, तेव्हाचा त्याचा आवाज मला विलक्षण गोड वाटला! मी सुटलो! एक भयंकर स्वप्न संपलं! म्हणा स्वप्न कोणतं ? आणि

सत्य काय ? (हळूहळू चालत केशव मघाच्या रंगीत दरवाज्यापाशी पोचला आहे. त्या भागातच फक्त प्रकाश. केशवच्या हातात आता एक मोठी बाहुली आहे. त्याने बेल वाजवताच दार उघडते. दारात सुमन उभी.)

सुमन : कोण पाहिजे ?

केशव : सुमन! तू मला ओळखल नाहीस ?

सुमन : चांगलं ओळखलंय् आता मी तुम्हाला!

केशव : सुमन! मी सुटलो. आजच तुला आनंद नाही झाला ? बोल ना! काहीच वाटलं नाही तुला ?

सुमन : आज हे विचारताय्! तुरुंगात गेलात तेव्हा काय वाटलं हे नाही विचारलंत ?

केशव . मला माफ कर सुमन.

सुमन त्याची काही जरूर नाही. आपला काही संबंध नाही राहिलेला.

केशव · म्हणजे ? सुमन ...

सुमन आता मी तुमची पत्नी नाही.

केशव : म्हणजे ?

सुमन पाच वर्षापूर्वीच मी बोरकरांबरोबर रहायला लागले.

केशव बोरकर ?

सुमन : हो. तुमचा पूर्वीचा मित्र. ज्यानं तुम्हाला माणेकलालच्या नादी लागून हे असले धंदे न करण्याचा उपदेश केला होता, तोच बोरकर! तुम्हाला त्याचा उपदेश पटला नाही, आणि दोघे एकमेकांचं तोंड पाहीनासे झालात.

केशव तुला मात्र उदार आश्रय दिलेला दिसतोय् त्यानं.

सुमन उदारपणा आहेच त्यांचा! माझं आणि आपल्या मुलाचं काय होईल याचा विचारसुद्धा न करता तुम्ही चालते झालात. कुणाच्या तोंडाकडे पाहून आम्ही दिवस काढायचे ?

केशव कां ? तू नोकरी करीत होतीस.

सुमन नुसती नोकरी करून एकट्या बाईचे प्रश्न संपत नाहीत. एकट्या तरुण बाईनं दिवस काढणं सोपं नसतं. मग मी स्वतःच बोरकरांच्या आधाराला गेले.

केशव : मला वाटलं, बोरकरनं माझा विश्वासघात केला. एकूण तूच मला फसवलंस तर!

सुमन : फसवलं ? कुणी कुणाला फसवलं ? मी तुम्हाला की तुम्ही मला ?

केशव पण मी अधिक पैसे मिळवायचा प्रयत्न करीत होतो, तो काय फक्त स्वतःसाठीच ?

सुमन हो! स्वतःसाठीच तुम्हाला रातोरात श्रीमंत व्हायचं होतं चारचौघे करतात तसे कष्ट न करता. आडमार्गानं. मजा करायची होती. चैन करायची होती!

केशव · असेल. पण तुझादेखील विचार मी केला होता सुमन

| | |
|---|---|
| सुमन | असं आता म्हणताय्. बेत फसले तेव्हा – तुरुंग दिसला तेव्हा! खरोखरीच पैसा मिळता, तर मात्र जाऊन तिची भर केली असतीत! शांताची! |
| केशव · | सुमन! |
| सुमन : | मला काही ठाऊक नाही असं वाटतं ? मला ठाऊक होतं. पहिल्यापासूनच ठाऊक होतं. चोरटेपणाला लागते तेवढी हुषारी तुमच्या अंगात असती तर तुम्ही शेवटीदेखील पकडले गेला नसतात आता बोला, विश्वासघात केला ? फसवलं कुणी ? कुणाला ? |
| केशव | तरीदेखील माझं प्रेम होतं तुझ्यावर. |
| सुमन : | माझंहि होतं. पण आता नाही! तुम्ही नुसती पैशांचीच अफरातफर केली नाहीत; प्रेमाचीहि अफरातफर केलीत. हे – हे शांताचं नसतं तर .. तर कदाचित् मी सात वर्षदेखील एकटीनं कशीबशी काढली असती. पण कुठल्या विश्वासावर थांबायला हवं होतं मी ? सांगा ना! सात वर्षानंतर तुम्ही माझ्याकडे परत याल याचा काय भरवसा होता मला ? |
| केशव : | मला तुझी – फार गरज आहे सुमन! |
| सुमन : | गरजेची वस्तु आधीपासूनच संभाळावी लागते. आमचं हे रहातं घर. माझ्या वडिलांचं आहे. नाहीतर आज मी उघड्यावर पडले असते. खात्री आहे माझी! मालकी हक्क सांगून तुम्ही मला बाहेर काढलं असतंत. |
| केशव : | नाही सुमन. मी तसा नाही. तुला कल्पना नाही, तुरुंगात मी तुझी किती आठवण काढीत असे. |
| सुमन | जा तुम्ही. असल्या थापांवर विश्वास ठेवण्याइतकी भोळी मी आता राहिलेली नाही. |
| केशव . | मला समजून घेण्याचा प्रयत्न कर सुमन. प्लीज! |
| सुमन | गरज काय त्याची ? कर्तव्य काय मला तुमच्याशी ? आता लौकर जा इथून. यांचा जरा डोळा लागलाय्. उठले आणि बाहेर आले तर तुमचा आणखी अपमान करतील. |
| केशव | जातो आता इथं माझं आहेच काय ? (जाऊ लागतो. मग थबकून) जाण्याआधी मला एकदाच पहायचं होतं तिला. |
| सुमन : | कुणाला ? |
| केशव | आपल्या मुलीला. मी बाहुली आणली होती तिच्यासाठी मला एकदाच पहायची होती – मोहिनीला. |
| सुमन | मोहिनी ? (हसून) आपल्याला मुलगी झालीच नाही. मुलगा झाला. मोहन! बाहुल्यांशी खेळत नाही तो. |
| केशव : | (हा धक्का पचवून, क्षणभराने) मुलगा झाला ? मला बघायचं होतं. मी आत येऊ का ? फक्त एक मिनिटभर! |
| सुमन : | नको. त्यानं 'तुम्ही कोण' असं विचारलं तर पंचाईत होईल. |
| केशव : | माझ्याविषयी – काही सांगितलं नाहीस तू ? |

सुमन सांगितलं (थांबून) तुम्ही जिवंत नाही असं सांगितलं. शाळेत बोरकरांचं नाव लावतो तो. (सुमन वळते व दरवाजा लावून घेते. केशव क्षणभर बंद दरवाज्याकडे पहातो. हळूहळू तिथला प्रकाश मंदावत जातो.)

केशव मोहन1 ! माझा मुलगा ! तो बोरकरचं नाव लावतो ! कारण मी – मी या जगातच नाही ! मी जिवंत आहे असं सांगायची त्याच्या आईला लाज वाटते ! मला वाटलं, शिक्षा भोगून झाली म्हणजे माझ्या गुन्ह्याला प्रायश्चित मिळालं. पण नाही ! जगाच्या लेखी मी जन्मभर गुन्हेगारच आहे ! त्या तुरुंगातून सुटलो, आणि या मोठ्या तुरुंगात येऊन पडलो ! शिक्षेला आत्ता कुठं सुरुवात झाली ! बेमुदत शिक्षा ! या तुरुंगातून सुटका नाही ! माणेकलाल, सत्यानाश – सत्यानाश केलास तू माझ्या आयुष्याचा ! (तो हे म्हणेपर्यंत माणेकलालच्या पेढीचा भाग प्रकाशात. डेस्कशी बसलेला माणेकलाल.)

माणेकलाल : (वर न पहाताच) जय गोपाळ ! आं – तमे कोन ?

केशव : मला ओळखलं नाहीस माणेक ? मी केशव.

माणेकलाल : केशव ? केशव कोन ?

केशव : केशव भाइंदरकर. मी कैदेतून सुटून आलो.

माणेकलाल . असा ? मग आता तू इकडे कशाला आला ?

केशव तुला भेटायला आलो माणेक.

माणेकलाल हां. तसा नुसता भेटला तर चालेल. पण बाकी पैसाबैसा नाय मिळेल हं ! सांगून ठेवते. जेलसून आलेले माणसपर आपला काय भरोसा नाय ! (जवळ ठेवलेल्या बॉक्समधून अधूनमधून मिठाई खातो.)

केशव मला पैशाची फार गरज आहे माणेक. मी आत्ताच तुरुंगातून सुटलो. काही काम मिळेपर्यत तर पैसे हवेत ! मला तुझ्या मदतीची फार गरज आहे माणेक !

माणेकलाल मदत ? अरे असा रस्त्यावरचा हरेक माणस येल. त्याला माणेकलाल मदत करेल काय ?

केशव : मी रस्त्यावरचा माणूस नाही माणेक ! एका काळी आपण जिवलग मित्र होतो. हा शेवटचा फ्रॉडदेखील आपण दोघांनी मिळून –

माणेकलाल : फ्रोड ? जय बालाजी ! सूं वार्ता करो छो ? आपणजेवी नेक माणस फ्रोडचा नाम नाय लेते !

केशव माणेक ! तू माझ्याकडे सभ्यपणाचा आव आणतोयस ? हा – हा सगळा पैसा तुझ्याकडे आला कुठून, हे काय मला माहती नाही ? दुर्दैवानं मी सापडलो, आणि तू मोकळा सुटलास ! गबर होऊन बसलास ! नंतरदेखील तुरुंगात मी तुझं नाव घेतलं नाही म्हणून तू अजूनपर्यंत मोकळा राहिलास ! आजसुद्धा माणेक, मी जाऊन पोलिसांना सांगितलं की तुझा त्या फ्रॉडमध्ये हात होता –

माणेकलाल (संथपणे) तू – मला – ब्लॅकमेल करते ? अरे तू कशाला जाते पोलिसकडे ? मीच करते ना पोलिसला फोन. ब्लॅकमेकर आला हाये

असा म्हणजे तू जिकडसून आला तिकडे ते लोक तुला परत पोचवून देल! (डायल फिरवू लागतो.)

केशव
माफ कर माणेक! ब्लॅकमेल करायचा हेतु नव्हता माझा. पण मी काय म्हणतो ते समजून घे! आपण दोघांनी एका वेळी एकत्र काम केलं. आणि आता – आता मी उपाशी मरतोय् रे! तुझ्याशिवाय – दुसरं कोण आहे मला ?

माणेकलाल
आ जो – काय नाव बोलला ? हां, केशवभाई – एक टाइमचा बात अलग! त्या टाइमला आपली पहचान असल थोडाथोडा. पण आता आपुन असला लफडा करते नाय! जय बालाजी! आपला लाइफ – काय समजला – एकदम स्ट्रेट हाय! आ डेस्क बघते ना, तेच्यासारखा. कुठे टेढा नाय, बाका नाय. एकदम स्ट्रेट! कुठेबी काय वांधा नाय! आपली वाइफ हाय, दोन पोरं हाय. आपला कम्युनिटीमंदीबी एकदम वट हाय. बालाजीनी मेहेरबानी! अवे आपुन फॅमिलीवाला, बिजनेसवाला माणस. तुजेसारखा जेलवाला, लफडेवाला माणूससांगाती कसा फ्रेंडशिप ठेवेल, तूं बोल!

केशव
फ्रेंडशिप नको ठेवू माणेक. पण मला निदान काहीतरी कामधंदा –

माणेकलाल :
सॉरी के-केशवभाय! आपुन कायबी नाय करू शकते. अरे आपुन नेक्स्ट इलेक्शन काँग्रेसचे तिकिटउपर कॉन्टेस्ट करते. तुजीसारका माणूससाठी काय लटपट केला तर पब्लिक काय बोलेल ? आपला कम्युनिटी काय बोलेल ? जय बालाजी! आता तू मला माफ कर आणि अधिक टाइम नको घे! बरा, जय गोपाल! नमस्ते! जय बालाजी! (प्रकाश मंदावत जातो. केशव पुढे येतो.)

केशव
हलकट साऽला! मिठाई खातो! जय बालाजी! हुषारी करतो! पण कसा गंडवलाय्! (खिशातून मिठाईचा तुकडा काढून) मारला त्याचं लक्ष नसताना! मी – मी सरळ चोऱ्या करायला लागलोय्! भुरट्या चोऱ्या! पण मी तरी काय करू ? पोटात नुसती आग पेटली होती. आणि हा माणूस समोर बसून मिठाई खात होता! (खात) किती दिवसांनी खाल्ली मिठाई! (एव्हाना शांताच्या घराचा भाग उजळलेला. शांता बसलेली आता थकलेली. वय उतरलेली. डोळ्याला चष्मा. कपडे मळकट. चुरगळलेले.)

शांता
काय हवंय् तुला ?

केशव
मला – मला थोडं पाणी हवंय्. भयंकर तहान लागलीय्. 'मिठाई खाल्ली ना, म्हणून.

शांता
(पाणी ओतून देत) पण तू आहेस कोण ?

केशव
तुला नाही आठवत ? तेव्हा आपलं एकमेकांवर गाढ प्रेम होतं.

शांता
(आठवण्याचा प्रयत्न करीत) असेल! खूपजणांना असंच वाटायचं कधीकधी मला आठवतं थोडंसं. काही चेहेरे, काही शरीरं, काहींच्या सवयी ... काही शब्द सुगंधी शब्द नानारंगी, फुलपंखी शब्द जडावाचे शब्द अर्थहीन शब्द तसं म्हटलं

तर खूप आठवतं मला. पण तुझा चेहेरा नाही आठवत हा थकलेला, ओढलेला. चेहेरा ...

केशव : नाही आठवायचा. कारण तेव्हा मी तरुण होतो, अधिक रुबाबदार होतो. सात वर्षांपूर्वी ... तूसुद्धा तेव्हा किती देखणी होतीस. आता काय दशा झालीय् तुझी! काळानं माणूस किती पालटतं!

शांता : हो ना! (किंचित् दूर होत) आपल्याला वाटतं त्याहून खूपच.

केशव : तू मला विश्वास म्हणायचीस.

शांता : इथं येणाऱ्या प्रत्येकालाच मी विश्वास म्हणत असे

केशव : (निराश होऊन) असं ?

शांता : सगळे माझे विश्वासच होते. विश्वास! खरा विश्वास एकच होता. मी ज्याच्यावर सारं काही पणाला लावून प्रेम केलं, त्या पहिल्याच पुरुषाचं नाव होतं विश्वास! त्याचं माझ्यावर प्रेम नव्हतं म्हणा. तो गेला. त्यानं लग्न केलं. माझ्यापेक्षा खूपच चंगली बायको मिळाली त्याला. नंतर खूप पुरुष भेटले मला. त्यांच्यापैकी कुणालाच मन दिलं नाही मी. फक्त शरीर दिलं. तेदेखील त्यांना विश्वासच समजून!

केशव : मग मी – मी तुझ्या लेखी कुणीच नव्हतो तर ?

शांता : तू – आणि उरलेले सारेच! आठवणींच्या एका प्रचंड ढिगाऱ्यामधले कण आहात तुम्ही! त्यातल्या कुणा एकालाहि माझ्या लेखी अस्तित्वच नाही!

केशव : प्लीज, शांता! मला आठवण्याचा प्रयत्न कर.

शांता : आता उपयोग काय त्याचा ? मी तरी पूर्वीची कुठं राहिल्येय् ? देहाचं सारं सौंदर्य गेलं. बरं वाटतं हेहि. रूपाबरोबर पापदेखील धुऊन गेल्यासारखं वाटतं.

केशव : गेल्या सात वर्षात – माझंहि पाप धुऊन गेलं .

शांता : त्या एका दिवसात माझं सारं आयुष्य बदलून गेलं ... ज्या दिवशी तो तिच्याबरोबर निघून गेला ... आणि तीदेखील त्याला बिलगून

केशव : विसर – विसर ते सारं! ते सगळं भूतकाळात जमा झालंय्.

शांता : त्या दिवसापासून मी ठरवलं : कुठल्याहि विश्वासवर प्रेम करायचं नाही.

केशव : जाऊ दे ते सारं! फक्त आजचा दिवस महत्त्वाचा! जुनं सगळं संपलं! मीदेखील भूतकाळ विसरायलाच पहातोय् शांता. आपण भविष्यकाळाचाच विचार करायला हवा.

शांता : भविष्य ? मला ? तुला ? विनोदच आहे हा!

केशव : तू बदललीयस् शांता.

शांता : खरं आहे. सारं स्वप्नासारखं वाटतं. मी बदलले फार पिण्यानं – आणि भीतीनंदेखील.

केशव : कसली भीति वाटत्येय् तुला ?

शांता : एक दिवस – एक दिवस सगळं नाहीसं होणार आहे! – त्या दिवसाची तुला नाही वाटत ? रात्रीअपरात्री गडद काळोखात भीतीनं किंचाळून

जागं व्हायला नाही होत तुला ?

केशव नाही. मी मरणाचे विचार नाही करीत. मला जगायचय्. पण कसं तेच समजेनासं झालंय्.

शांता . हा भयाण एकटेपणा . . . काळोख . . कुणी आपलं म्हणायला नाही.

केशव . तसं वाटायचं. मलादेखील.

शांता : आपल्याला कळत नाही. पण कुणीतरी वाट पहातंय् . . त्या क्षणाची. एकदा का तो क्षण आला की सुरुंग उडणार आहे. मोठा स्फोट होणार आहे. आगीच्या ज्वाळा आपल्याला वेढून टाकणार आहेत. राख होऊन जाणार आहे साऱ्यांची! चिंधड्या चिंधड्या होणारेत! भीति वाटते मला. भयंकर!

केशव शांत हो – शांत हो शांता!

शांता : हो. शांत व्हायचंय् मला. तुझ्याकडे आहे काहीतरी प्यायला ?

केशव : नाही ग! मलाच तहान लागली आहे.

शांता समोर एक अड्डा आहे. तिकडे मिळेल. आणतोस थोडीशी ?

केशव . माझ्याकडे पैसे नाहीत.

शांता . मघा म्हणालास, मिठाई खाल्ली म्हणून.

केशव : ती – ती – तिला पैसे नाही पडले.

शांता नालायक! नादान! जवळ पैसे नसून आलास तू इथं ? आधी चालता हो इथून! जा आधी! (शांताच्या घरावरील प्रकाश मंदावतो, आणि केशव पुढे येतो.)

केशव तिच्या लेखी मी जिवंत नव्हतो. तुरुंगात निदान मला नंबर तरी होता. दोनशेसत्तर! पण आता मी कोण आहे ? कुणीच नाही! दोनशेसत्तर नाही की केशव भाइंदरकर नाही! मला कुणी ओळखतच नाही! (एक मध्यमवयीन माणूस. लॉजिंग-बोर्डिंगचा मालक. हातात केशवची सूटकेस घेऊन येतो.)

मालक मिस्टर! ही बॅग घ्या तुमची आणि चालते व्हा इथून!

केशव . चालता होऊ ? कालच तर मी आपल्या लॉजिंगमधे खोली घेतली!

मालक : दुसऱ्या माणसानं दिली तुम्हाला. मी तुमच्यासारख्यांना उभं नाही करीत. आमचं लॉजिंग चोर-लफंग्यांसाठी नाही! काय समजलात ?

केशव पण मी – मी शिक्षा भोगून परत आलोय्!

मालक . पराक्रम केलात! आता काय डाके घालायचे ते दुसरीकडे जाऊन घाला! हे सभ्य माणसांचं लॉज आहे. समजलात ? तुमच्यासारखी चोरट्यांची, गुंडांची गिऱ्हाइकं घ्यायला लागलो; तर उद्या धंदा बंद करावा लागेल मला! उचला ती बॅग आणि करा काळं! का पोलिसाला बोलवू ? (त्याच्यावरचा प्रकाश मंदावतो.)

केशव : माणसं! माणुसकी! जग! दुसऱ्याला पायदळी तुडवून स्वतःला जपणारं! पडलेल्याला लाथा मारणारं! वर उठू न देणारं! वाटतं, तोंड बघू नये एकाहि माणसाचं! कुठंतरी . काळोखात दडून बसावं! जिथं कुणी आपल्याला दिसणार नाही. आपण कुणाच्या नजरेला

पडणार नाही. पण कुठं ? कुठं दडून बसणार ? (बॅग उचलीत) कुठंहि गेलं तरी आपल्यावर कुणाचीतरी नजर रोखलेलीच आहे! कुठंच एकान्त नाही! तरीहि एकटेपणा मात्र सगळीकडे भरून राहिलाय्! विलक्षण एकटेपणा! जो तो आपल्या कोठडीत बंद! सगळ्यांना वाटतंय् की या कोठडीत आपण सुरक्षित आहोत! जो तो आपली स्वतःची कोठडी संभाळण्यात दंग! कोठडीची किल्ली कुणाजवळ आहे हे कुणालाच माहीत नाही. कधी सुटका होणार, कुणाला ठाऊक नाही! (प्रकाश हळूहळू तुरुंगाच्या दरवाज्यावर येतो. केशव हळूहळू चालत दरवाज्यापाशी बाहेरच्या बाजूने येतो.) बॅग बाजूला फेकून देत) मला आत येऊ द्या! परत येऊ द्या! दार उघडा! मला मोकळं रहायचं नाही. मला बाहेर रहायचं नाही! इथं एक क्षणभरहि राहिलो तर मी गुदमरून जाईन! दार उघडा! . मला आत येऊ द्या! .. (मोठमोठ्याने ओरडत दरवाजा ठोठावीत रहातो. अखेरीस थकून खाली कोसळतो एका बाजूने सावकाश चालत जेलर येतो. केशवला उठवतो. केशव ओळख नसल्यासारखा त्याच्याकडे पहात रहातो.)

जेलर · (खिशातून सिगरेटचे पाकिट काढून त्याच्यापुढे करीत, हसून) सिगरेट हवी ? – घ्या ना!

(पडदा)

(कल्पना परकीय)

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा..
वा. क्र. २३०२८ नों दि २९/२/९८
वि. नाटक

IRBK-0123024

या संग्रहातील कुठल्याही एकांकिकेचा प्रयोग करण्यापूर्वी खालील पत्त्यावर अनुमती घेणे आवश्यक :

सौ. प्रतिभा मतकरी

राधा निवास, टिळक रोड, मुंबई ४०० ०१४